पाक्षिक

# द पीपल्स पोस्ट

समाज आणि राष्ट्राच्या नवरचनेसाठी

www.peoplespost.in

वर्ष : १ । अंक पंधरावा । मराठी पाक्षिक । मूल्य :२५ ₹ । दिनांक १ ते १५ एप्रिल २०१९



# मूलतत्त्ववाद्यांना उखडून टाका !





विशेष संपादकीय

भाजपला का निवडायचं नाही? ही घ्या ५० कारणे...



न्या. पी. बी. सावंत

अन्यायी राजवटीला निवडून देताना विचार करा.



: मल्लिकार्जून खरगे

काँग्रेसने देश घडवला भाजपा सरकारमुळे लोकशाही धोक्यात!

# YuZen Consultancy Services

YuZen Shaping Career

## JOB & EDUCATION OPPORTUNITIES IN JAPAN

**Starting Technology Training in IT, Automotive Design(Mechanical), Electrical & Electronics and Civil Engineering from 26-Jan-2019.**

**FREE JLPT N5 Level Coaching for students who opting for Tech Training.**

1 Million Jobs in Japan for all the sectors with 200,000 jobs in IT sector available in next 5 years...

OUR STUDENT'S WORKING | JAPAN-13 MNC's IN INDIA-5 | HIGHER EDU in Japan -1

**www.yuzenconsultancy.com**

**Technology Training + Japanese Language (JLPT) Training**
**Highly Advanced Technology Lab to take care of Latest Technology Skill Set Training**

Please register yourself for following high demanding Job Oriented Skills in Japan

**Information Technology**

redhat

- ☐ Linux Certified Engineer/ Server Side Engineers/ Desktop Engineers
- ☐ Automation Programming – Python & Ruby
- ☐ Cyber Security & Ethical Hacking
- ☐ Core & Advance Java
- ☐ Data Science

CATIA
AUTODESK AUTOCAD

- ☐ Automotive Design/Mech Engineering
- ☐ CATIA/ANSYS/NX/AUTOCAD

Electrical & Electronics Engineering | PLC SCADA/MATLAB/EMBEDDED PROGRAMMING/VLSI DESIGN & PROGRAMMING

CIVIL Engineering | AutoCad Civil | STAAD Pro | Etabs | ANSYS Civil

**Interested candidates/students please contact.**
**Mahesh Khaire: +91 9820963268** **Sushant Mankar: +91 91300 21631**
**Chaitanya Patil: +91-7972472853**

### Training Location

24 Ekmat Society,Near Kala Maruti Mandir, Omkar Nagar - Besa Road, Near Jayawant Nagar, Omkar Nagar Area Nagpur -440027

**ADMISSION OPEN** | Fees: Below market rate & Depends upon each course.

* Faculty - Industry Experts. Some of the Faculties are having International work experience.
* On the Job Development & Design practice.
* Industry Standard Process Sessions from Industry experts.
* **Free** Career Guidence and Personality development mentoring.
* **Free** Communication skill development sessions.
* 24x7 Availablitiy of Technology Lab for Project development & practice

* Terms & Conditions are apply.

YuZen Consultancy Services

**संपादक**
चेतन शिंदे

**मांडणी व सजावट**
सचिन ओव्हाळ

**मुखपृष्ठ**
भूषण बिरारी

**संपादकीय पत्रव्यवहार**
११, तळमजला, बी ब्लॉक,
लक्ष्मी निवास, जे. के. सावंत मार्ग
यशवंत नाट्यमंदिरासमोर, माहिम (प.)
मुंबई ४०००१६

**संपर्क**
८८८८५४१८२२
९५८८४५११५१
E mail :
thepeoplespost2014@gmail.com
(या अंकातील सर्व लेखांचे हक्क सुरक्षित)
*अंकात व्यक्त झालेल्या लेखकांच्या मतांशी संपादक सहमत असेलच असे नाही.

द पीपल्स पोस्ट | ८८८८५४१८२२

- जाहिरात विभाग संपर्क
  ९८२१४४५४०९/ ८८०५१५१४५२

- वर्गणीदारांसाठी संपर्क
  **महाराष्ट्र / मुंबई :**
  **विदर्भ** : अंकुश वाकडे : ९४२१४२४२४२
  **मराठवाडा** : सचिन : ७३५००९१५६९
  **मुंबई / कोकण** : संकेत तांबे : ७७३८७८४१३२

वर्गणीचा धनादेश, धनाकर्ष
**द पीपल्स पोस्ट** या नावाने काढावा

पाक्षिक
समाज आणि राष्ट्राच्या नवरचनेसाठी
# द पीपल्स पोस्ट

स्थापना : २९ ऑगस्ट २०१८ । वर्ष : १ ।
अंक १५ वा । मूल्य : रु. २५ । दिनांक 0१ एप्रिल ते १५ एप्रिल २०१९

संपादकीय ५
हिंसेवरील तंत्र: मूलतत्त्ववाद — डॉ.मिलिंद आवाड ८
अन्यायी राजवटीला निवडून देताना विचार करा — मा.न्या.पी.बी. सावंत ९
देशहितासाठी विवेकी जनता सत्ता परिवर्तन घडवेल! — डॉ. रावसाहेब कसबे १०
मागासवर्गीय समूह सत्तापरिवर्तनाच्या अपेक्षेत — प्रो.सुखदेव थोरात, नवी दिल्ली १४
२०१९ आणि बाबासाहेबांची सत्तासंकल्पना... — डॉ.यशवंत मनोहर २१
काँग्रेसने देश घडवला भाजपा सरकारमुळे लोकशाही धोक्यात! : मल्लिकार्जून खरगे २४
लोकशाहीचे मारेकरी — ज.वि. पवार २८
देशाच्या हितासाठी भाजपाचा पराभव आवश्यक — कॉ.भालचंद्र कांगो ३०
भाजप सरकार आले तर देशाचा सत्यानाशच! : खा. हुसेन दलवाई — मुलाखत : चेतन शिंदे ३२
नोटाबंदीस नकार देणारे अर्थतज्ञ : रघुराम राजन — प्रकाश खंडेलोटे ३६
श्रीपाल सबनीसांच्या तिसऱ्या भूमिकेचे साहित्यिक वादळ — मिलिंद कसबे, पुणे ३८
आजकालचे प्रश्न : पंक्चरवाला ४१
कविता : शोधतो आमचे अस्तित्व — प्रकाश मोरे ४४
ग्रेट थॉट्स : ४५
कोण काय बोलतं... : ४६

हे पाक्षिक, मालक, मुद्रक, प्रकाशक धम्मपाल भीमराव शिंदे यांनी मेत्ता प्रिंटर्स सीटीएस नं. १४४ मिल कॉर्नर, छावणी रोड, बारापुल्ला गेटजवळ, औरंगाबाद ४३१००१ येथे छापून फ्लॅट नंबर ए-४०३, जीएन नं. १०/२, ग्लोरियासिटी, एमएसईबी पावर हाऊसजवळ पडेगाव, औरंगाबाद ४३१००१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. *संपादक चेतन भीमराव शिंदे (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांची राहील.) सर्व वादविवाद औरंगाबाद जिल्हा न्यायालयीन कक्षेत. प्रकाशित झालेल्या लेखकांच्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. नोंदणी क्र. MAHMAR/2018/76460

## 'हल्ला-प्रतिहल्ला' आवडला

'रात्र वैराची आहे' ही कव्हर स्टोरी असलेला १ ते १५ मार्चचा 'हल्ला-प्रतिहल्ला' हा अंक मला खूप आवडला. अंकातील संपादकीयापासून सर्वच लेख अभ्यासंपूर्ण आहेत. 'जोड्या जुळवा मते मिळवा' या संपादकीयामध्ये मतलबी राजकारण्यांचे वाभाडे काढण्यात आले, ते खरोखरच कौतुकास्पद आहे. रात्र वैऱ्याची आहे हा विजय नाईक यांच्या लेखनीतून उतरलेला लेख पुलवामा हल्ला आणि त्यानंतरच्या घडामोडींवर प्रकाश टाकणारा होता. सरकारला सीमेवर दक्ष राहणे किती गरजेचे आहे, यावर केलेले भाष्य विचार करायला लावणारे आहे. दलितांचा हिंदुत्वाच्या उदारमतवादावरील विश्वास उडाला हा प्रो.सुखदेव थोरात यांचा लेखही भाजपच्या धर्मांध नितीवर प्रकाश टाकणारा होता.

**- संजय गायकवाड, मुंबई.**

## 'ग्रेट थॉट्स' अन् 'कोण काय बोलतं' छानच

ग्रेट थॉट्स सदरातून जागतिक कीर्तीच्या विचारवंतांचे प्रेरणादायी विचार वाचून दृष्टिकोन सकारात्मक बनण्यास मदत होते. राजकारण्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांनी व्यक्त केलेली मतं 'कोण काय बोलतं'मध्ये वाचून एकूण राजकारणाची दिशा कळण्यास मदत होते. 'कोण काय बोलतं' मध्ये सर्वच क्षेत्रातील मान्यवरांचा समावेश करणे योग्य वाटते.

**- साजन विष्णू, पुणे.**

## निळी पाखरं कविता मनाला भिडली

रविचंद्र हडसनकर यांची 'निळी पाखरं' ही कविता आंबेडकरी चळवळीतील दुरवस्थेचं चित्रण करणारी आहे. १ ते १५ मार्चच्या अंकातील ही कविता चळवळीपासूनच दुरावलेल्यांना एक होण्याचं आवाहन करते. त्यामुळे ती मनाला भिडते.

**- सुनंदा धनश्याम, नांदेड.**




## स्पर्धा परीक्षांसंदर्भात मार्गदर्शनपर सदर सुरू करावे

द पीपल्स पोस्ट पाक्षिकातून नवनवीन आणि महत्वाचे विषय मांडले जातात. यातील सर्वच लेख स्पर्धापरीक्षांची तयारी करणाऱ्या तरूणांसाठी उपयुक्त आहेत. त्याचबरोबर स्पर्धा परीक्षासंदर्भात तज्ञांचे मार्गदर्शन असलेले सदर सुरू केल्यास ते अधिक फायद्याचे ठरेल. काळाची गरज लक्षात घेऊन द पीपल्स पोस्टच्या संपादकांनी याची नोंद घ्यावी, ही नम्र विनंती.

**- राजेश्वर नगरकर, पुणे.**

### वाचकांना आवाहन

**'द पीपल्स पोस्ट'ला महाराष्ट्रभरातून प्रचंड प्रतिसाद मिळत आहे. वाचकांच्या पसंतीस उतरेल असा अंक देण्याचा आमचा प्रयत्न असतो. वाचकांच्या प्रतिक्रियाही आम्हाला अंक अधिकाधिक वाचनीय देण्याच्या दृष्टीने प्रेरणादायी ठरतात. वाचकांनी प्रतिक्रिया thepeoplespost2014@gmail.com या मेलवर पाठवाव्यात. - संपादक**

## प्रेरणादायी मुलाखत

१ ते १५ मार्चच्या अंकातील सतीश ढवळे यांची मुलाखत तरूणांसाठी प्रेरणादायी आहे. परिस्थिती किंवा सहानुभूतीपेक्षा गुणवत्तापूर्ण काम महत्वाचे मानणारे कस्टम विभागाचे अतिरिक्त आयुक्त डॉ.सतीश ढवळे हे सनदी सेवेत येऊ इच्छिणाऱ्यांसाठी सच्चे मार्गदर्शक आहेत, असे मला वाटते. अशाच प्रेरणादायी मुलाखती याही पुढे दिल्या जाव्यात, हीच अपेक्षा

**- विनायक विश्वे, औरंगाबाद.**

## बहुजन समाजातील महिलांना अधिक प्रतिनिधीत्व मिळावे

पुरूषप्रधान संस्कृतीमुळे बहुजन महिलांचे राजकारण मर्यादित हा १ ते १५ मार्चच्या अंकातील डॉ.माला मुखर्जी यांचा लेख या अंकाचं महत्व वाढवणारा होता. अनुसूचित जातीच्या महिलांची राजकारणात होणारी घुसमट रोखण्याची गरज लेखकांनी व्यक्त केलेली आहे. अभिजन वर्गातील पुरूष मंडळीकडून बहुजन समाजातील विशेषतः अनुसूचित जातीतील महिलांची राजकीय क्षेत्रात होणारी अडवणूक अन्याय्य आहे. या महिलांना अधिक प्रतिनिधीत्व मिळण्यासाठी अनुसूचित जातीसाठी काम करणाऱ्या संघटनांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे.

**- सुधीर शेवंते, नांदेड.**

# भाजपला का निवडायचं नाही? ही घ्या ५० कारणे...

खरं तर भाजपला का निवडून देऊ नये याची तशी तर असंख्य कारणं आहेत; पण त्यातली मोजकी पन्नास तर समजून घ्यायला हवीत. खरं तर यापूर्वीच ती समजून घ्यायला हवी होती. पण आपण ती समजून घेतली नाहीत; कारण सामान्यांच्या मनावर देव-धर्म, धर्मस्थळं, सामाजिक तेढ याचं आवरण पद्धतशीरपणे चढवण्यात आलं. सामूहिक संमोहन करण्यात आलं असंही आपण म्हणू शकतो. स्वतःला पुरोगामी समजणाऱ्या पक्ष-संघटना एकत्र आल्या नाहीत. उलट पुरोगामी विचारांशी बेईमानी करून, सत्तालालसी बनून त्यांच्या वळचणीला गेल्या. आपण बहुसंख्याक आहोत. आपल्याच मुठीत सत्ता आहे हे या पुरोगामी शक्ती अल्पकाळाच्या स्वार्थासाठी विसरून बसल्या. एकेका सत्तेच्या तुकड्यामुळे फसल्या. आपल्या विचारांच्या लोकांनाच त्यांनी शत्रू केला. त्याला पराभूत करण्यासाठी उजव्यांच्या उबेला हे तुकडे गेले. बाहेर राहिलेले पुरोगामी आपला मूळ शत्रू न ओळखता शेजारच्यांशी लढत राहिले. एकसंघ होऊन लढण्याऐवजी स्वतंत्रपणे लढत राहिले. परिणाम ते पराभूत होत राहिले. गल्ली ते दिल्ली सारं काही उजव्यांच्या हातात देऊन बसले. एक भारी खेळ उजव्यांनी केला. सत्तेवर येण्यासाठी आपली शक्ती नाही हे जेव्हा त्यांना कळलं तेव्हा त्यांनी आपल्या विरुद्धच्या शक्तीत फूट पाडली. देवाचा, धर्माचा, जातीचा, प्रदेशाचा, भाषेचा वापर केला. त्यांची शक्ती घेऊन हे सत्ताधीश झाले. लोण्याचा गोळा मोठ्या मुश्किलीनं आणणाऱ्या आणि त्याचं वाटप करण्यासाठी तो बोक्याच्या हातात देणाऱ्या माकडांसारखी गोष्ट तयार झाली. गेली पाच वर्षे ती सुरू आहे. माकडं सशक्त बनताहेत आणि परस्परांत भांडत मांजरं अशक्त बनताहेत. कुपोषण संपवण्यासाठी आधार कार्ड आणि नावावर दोन हजार कधी जमा होतील याची वाट बघताहेत. अशा प्रकारे बहुजनांमध्ये फोडातोडची नीती वापरून भाजप सत्तेवर आली आणि आता ती पुन्हा सत्ता हस्तगत करण्यासाठी लोकशाहीची फसवी गाणी गात आणि धर्मवादात बुडवलेला नवा राष्ट्रवाद घेऊन उभी आहे. भाजपला पुन्हा निवडून दिलं की कदाचित ही लोकशाहीतली शेवटची निवडणूक असेल असं अनेकांना वाटतं. त्यात काही तथ्यही आहे. आता हे थांबवायचं असलं तर भाजपला पुन्हा निवडून का देऊ नये याची कारणं नीट समजून घेतली पाहिजेत हेही तितकंच महत्त्वाचं आहे. त्यापैकी ही काही कारणं वाचा. विचार करा. स्वतःला व्यक्त करा आणि डॉ. बाबासाहेबांनी राज्यघटनेद्वारे बांधण्याचा प्रयत्न केलेल्या राष्ट्राकडे, समाजाकडे चला. तसं जर केलं नाही तर आपल्याला इतिहास, वर्तमान आणि भूतकाळ माफ करणार नाही, तर या काही पन्नास कारणांचा विचार करा.

१. ज्यांना देशाला मिळालेलं स्वातंत्र्य, लोकशाहीवादी राष्ट्र मान्य नाही अशा राष्ट्रीय स्वयंसेवक संघानं आपल्या धर्मवादी कुशीतून भाजपला जन्माला घातलंय. भाजपच्या डीएनएत सर्व आर. एस.एस.चे जीन्स आहेत. हिंदू राष्ट्र हा त्यापैकी एक महत्त्वाचा आणि कळीचा जीन्स आहे.

२. सांस्कृतिक हालचालीतून हिंदू राष्ट्राकडे जाण्यास मर्यादा पडतात म्हणून राजकीय सत्ता हस्तगत करण्यासाठी प्रथम जनसंघ आणि आता भाजपचा जन्म झाला.

३. भाजपला लोकांच्या विकासाच्या गप्पा मारण्यास आणि जाती-धर्माचा छुपा अजेंडा राबवण्यास सांगण्यात आले आहे. भाजप ते



**उना येथील काही दलितांनी बौद्ध धम्म स्वीकारल्याच्या रागातून त्यांना जातीयवाद्यांनी अशा पद्धतीने मारहाण करून अवमानित केले. या प्रकरणावर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी चुप्पी का साधली याचे उत्तर ते देऊ शकले नाहीत.**



**जीवंतपणी राष्ट्रपिता महात्मा गांधींचा द्वेष करणाऱ्या संघ परिवाराने मृत्यूपश्चातही त्यांच्या प्रती अशी मत्सरी कृती सुरूच ठेवली आहे.**

निमूटपणे करतोय.
४. भाजपला लागणारं बहुतेक चाणाक्ष बळ आर.एस.एस.च्या शाळेतून पुरवलं जातं.
५. भाजपला स्वतःचा मेंदू नाही तर आर.एस.एस.चा मेंदू तो वापरतो. भाजपला मेंदू पुरवत पुरवत संघ गेल्या पाच वर्षांत जबरदस्त असं सत्ताबाह्य सत्ताकेंद्र बनलाय.
६. आर.एस.एस. देशातील एक श्रीमंत संस्था आहे जो आपला आर्थिक अहवाल कधीच प्रसिद्ध करत नाही. हिटलरी थेअरीवर त्याचा विश्वास आहे. फॅसिझम, रेसिजम ही त्याची आवडती खेळणी आहेत. आम्ही चार तासांत फौज उभी करू हे त्यातूनच तो म्हणतो. प्रत्यक्षात असं घडणार नाही; कारण आर.एस.एस.कडे देश, समाजासाठी लढण्याची परंपरा नाहीय तर तीर्थ वाटून समाज मतिमंद करण्याची परंपरा आहे.
७. भाजपचा पिता असलेल्या (आरएसएसचा विचार पितृप्रधान आहे म्हणून पिता म्हटलं. आर.एस.एस.वर महात्मा गांधी यांच्या हत्येचा आरोप केला जातो. संघाच्या अनेक शाखा महात्मा गांधींचे मरणोत्तर चारित्र्यहनन करतात. त्यांचे पुतळे फोडतात. गोळ्या घालतात. बुद्ध आणि बाबासाहेबांचे पुतळेही फोडतात. महात्मा गांधी त्यांच्या दृष्टीनं खलनायक आहेत, राष्ट्रपिता नाहीत.
८. भाजपला बाबासाहेबांची राज्यघटना कधीच मान्य नव्हती आणि नाही. म्हणूनच त्यांचे साधू, संन्याशी आणि बिनसाधू 'भीमस्मृती' नको, 'मनुस्मृती' हवीय असं म्हणतात आणि ज्यांना बाबासाहेबांचा इतिहास कधीच आठवत नाही ते रामदास आठवले म्हणतात, की मोदींच्या हातात राज्यघटना सुरक्षित आहे. खरं तर मोदींच्या हातात सत्ता नव्हे तर आठवले यांच्यासाठी मागील दारानं जाऊन मिळवायची सत्ता सुरक्षित आहे.
९. दलित आणि उपेक्षितांच्या उद्धाराविरुद्ध भाजपचे धोरण आहे. गेल्या पाच वर्षांत वेगवेगळ्या कारणांनी हेरून, हेरून अनेक दलित आणि आदिवासींची हत्या झालीय. त्याबद्दल एकालाही शिक्षा झाली नाहीय.
१०. भाजप हा भांडवलदारांचा आणि उच्च जातीच्या ओंजळीनं पाणी पिणारा पक्ष आहे. गेल्या पाच वर्षांत भांडवलदारांनी देशाला जेवढे लुटले तेवढं सत्तर वर्षांत कधी लुटलं गेलं नव्हतं.
११. भाजपच्या राजवटीत भांडवलदारांनी देशातील बँकांचे किती पैसे लाटले? किती जण फरार झाले याची इत्यंभूत माहिती 'मन की बात' मध्ये मोदी कधीच देऊ शकले नाहीत.
१२. भाजप दलित, शेतकरी आणि कामगार हिताच्या विरोधात आहे. शेतकऱ्यांच्या सर्वांत अधिक आत्महत्या याच काळात घडल्या. सर्वांत अधिक रोजगार याच काळात बुडाले. नोटाबंदीमुळे याच काळात सर्वाधिक छोटे व्यापारी, व्यावसायिक कफल्लक झाले.
१३. भाजपचे सगळे धोरण धर्म, संस्कृती म्हणजे त्यांना हव्या असलेल्या धर्म संस्कृतीचा उद्धार करण्याचे आहे. याच काळात मोदींपासून ते बजरंगापर्यंत लाखो मंदिरं उभी राहिली. फूटपाथवरच्या लोकांना घरं मात्र मिळाली नाहीत.
१४. पूर्वी मतं विकत घेतली जात. अर्थात, हा व्यवहार गुपचूप चालत असे. आता ऐन निवडणुकीत गरीब शेतकऱ्याच्या नावावर दोन-दोन हजार रुपये जमा करून, मोदींवर सिनेमा काढून एका अर्थानं मतदारांना चलबिचल करण्याचा पद्धतशीर कट होतोय.
१५. भांडवलशाहीसाठी अधिक वाटा मोकळ्या करण्यासाठी सरकारला छोटं-छोटं करण्यात आलं. संडासापासून रेल्वेपर्यंत, फोनपासून हमरस्त्यापर्यंत, विमानापासून जहाजापर्यंत सारं काही भांडवलदारांच्या हातात देऊन ठेवलंय. भांडवलशाही मोठी करून देश छोटा करण्याचं जणू काही भाजपानं कंत्राट घेतलंय.
१६. गेल्या पाच वर्षांत राज्या-राज्यांतला एक प्रश्नही भाजपला सोडवता आला नाहीय. उलट राजकारणासाठी अनेक अनिष्ट घटकांबरोबर यांनी मैत्री केलीय.
१७. सांस्कृतिक राष्ट्रवादाला चालना देण्यासाठी राष्ट्रवादाच्या नव्या व्याख्या करत ते रामापर्यंत, धर्मस्थळांपर्यंत पोहोचवले. रामजादे आणि हरामजादे याच काळातलं.
१८. व्यवस्थेला विरोध करणारी, जाब विचारणारी जनहत्यारे म्हणजे अभिव्यक्ती स्वातंत्र्य संकोचित करण्यात आले.
१९. पक्षाला म्हणजे भाजपला आणि त्याच्या सरकारलाच राष्ट्र म्हणा असा नवा फंडा सुरू करण्यात आला.
२०. विरोधकांना नामोहरम करण्यासाठी त्यांच्या खासगी जीवनाचा एक्स-रे काढण्याचा प्रयत्न झाला. देशाच्या विरोधी नेत्याला पप्पू आणि सोनिया गांधींना नर्तकी, वेटर म्हणण्यात आलं. त्यांचं कुटुंब आणि कुटुंबातल्या चारित्र्यावर खोटी चर्चा घडवण्यात आली.
२१. भाजपचे पंतप्रधान मोदी यांनी परदेशवारीवर जेवढा पैसा उधळला तेवढा सत्तर वर्षांत कोणी उधळला नव्हता. विशेष म्हणजे, या दौऱ्यातून पत्रकारांना वगळण्यात आलं. मोदी बाहेर आणि संघ देश चालवतोय असं चित्र निर्माण झालं आहे.
२२. भारतातले सारेच हिंदू अशी नवी व्यापक व्याख्या करण्यात आली. म्हणजे बुद्धिस्ट, ख्रिस्ती, मुस्लिम सारेच हिंदू.
२३. दलितांच्या विकासाला कात्री लावण्यासाठी त्यांच्यासाठी असलेली अर्थसंकल्पीय तरतूद कमी करण्यात आली.
२४. आमच्याकडे कोणी दलित नाही, अल्पसंख्याक नाहीय.

आहेत ते फक्त हिंदूच असं रेटून सांगण्यात आलं.

२५. हिंदुत्वाची विचारसरणी रुजवत तत्त्वज्ञानात भ्रष्टाचार करणाऱ्या अनेकांचा मरणोत्तर उद्धार झाला.

२६. सांस्कृतिक आणि धर्मवादाला चालना देणाऱ्यांचे अनेक पुतळे, स्मारके उभारण्याचा झपाटा सुरू झाला.

२७. राजस्थानातल्या मनुचा पुतळा आणखी मोठा करायचा, इतका मोठा करायचा की राज्यघटना झाकली जाईल असे संकल्प आखण्यात आले.

२८. भारतीय स्त्रीनं किती मुलांना आणि कशासाठी जन्म द्यायचा ते साध्वींच्या मुखातून सांगण्यात येऊ लागलं. मनुस्मृतीचं समर्थन करण्यासाठी बायांच्या पाळ्या उभ्या करण्यात आल्या.

२९. दहशतवादाच्या आरोपाखाली असलेल्या हिंदुत्ववाद्यांची सुटका झाली.

३०. पानसरे, दाभोलकर, कलबुर्गी, गौरी यांच्यापैकी एकाच्याही खुन्याला अटक होऊन शिक्षा झाली नाही.

३१. बहुजनांमध्ये सातत्यानं फूट पाडण्यात आली. कुणाला राज्यसभा, कुणाला शासकीय पुरस्कार तर कुणाला आणखी काही देऊन फुटीचा खेळ चालूच ठेवण्यात आला.

३२. देशाच्या संरक्षण क्षमतांचे राजकारण करण्यात आले. त्याचे मतात रूपांतर करण्यात आलं. सर्जिकल स्ट्राईक कधी प्रचाराचा विषय नसतो; पण तो केला गेला. त्यावर आणि फेल गेलेल्या शासकीय योजनांवर व्यावसायिक चित्रपट काढण्यास प्रोत्साहन देण्यात आलं. आपल्यावर हल्ला करणाऱ्या पाकला मोदींनी गुप्त शुभेच्छा दिल्या.

३३. गेल्या सत्तर वर्षांत कोणत्याही पंतप्रधानांनी वापरले नसेल इतकी प्रसारमाध्यमांतील जागा एकट्या मोदींनी वापरली. त्यांच्या भांडवलदार मित्रांनी त्यांच्यासाठी माध्यमेच खरेदी केली. कधीही पाहा मोदी, कितीही पाहा मोदी, केवढेही पाहा मोदी, फुकटात पाहा मोदी असं एक महानाट्य सुरू झालंय.

३४. गेल्या सत्तर वर्षांत झाली नसतील एवढी मोठी भ्रष्टाचाराची प्रकरणे उजेडात आली. सरकारी बँका खुळखुळ्या झाल्या. हेलिकॉप्टर खरेदीतील कथित भ्रष्टाचार उजेडात आला. पंतप्रधानांची नवी पात्रता पुढं आली. ती म्हणजे त्यानं आपल्या पूर्वायुष्यात चहा विकला पाहिजे. तरुण पिढीला वडापाव विकण्याचा संदेश त्यानं दिला पाहिजे.

३५. गेल्या सत्तर वर्षांत गेल्या नव्हत्या एवढ्या नोकऱ्या पाच वर्षांत गायब झाल्या. गेल्या सत्तर वर्षांत जेवढी बेकारी वाढली नव्हती तेवढी पाच वर्षांत वाढली.

३६. सरकारनं केलेल्या बहुतेक कल्याणकारी घोषणा वांझ ठरल्या. एकीच्या पदरातही फळ पडलं नाही.

३७. कल्याणकारी योजनांसाठी नवे दलाल तयार झाले.

३८. शिक्षणाचा पैसा मोठ्या प्रमाणात कमी झाला. शिक्षण देणाऱ्या खासगी दुकानांचे भाव वधारले.

३९. शिक्षण, कला आणि सांस्कृतिक क्षेत्राचं जाणीवपूर्वक भगवेकरण झालं.



**आपल्यातील धर्मांधतेचे स्तोम माजवून मोदी देशवासीयांसाठी कोणता संदेश देऊ इच्छित आहेत.**

४०. सांस्कृतिक राष्ट्रवादाला आणि तो राबवणाऱ्या सरकारला विरोध म्हणजे राष्ट्रवादाला विरोध असं नवं समीकरण तयार करून असा विरोध करणारे देशद्रोही ठरवण्यात आले.

४१. जातपंचायतीत माणसं मारणारे, जमावाचा वापर करून हत्या करणारे, पायरी ओलांडण्याचा प्रयत्न केला म्हणून शिक्षा देणारे यांना सोडून वेगळा विचार करणाऱ्यांना शहरी नक्षलवादी ठरवण्यात आलं.

४२. गरज नसताना स्मार्ट सिटीची कल्पना राबवून भांडवलदार, बिल्डर यांचं चांगभलं करण्यात आलं.

४३. गेल्या सत्तर वर्षांत जेवढं महाग झालं नव्हतं तेवढं गेल्या पाच वर्षांत पाणी, हवा महाग झाली.

४४. गेल्या सत्तर वर्षांत जेवढ्या शेतकऱ्यांच्या जमिनी घेण्यात आल्या नव्हत्या तेवढ्या गेल्या पाच वर्षांत घेण्यात आल्या.

४५. भारत विरुद्ध इंडिया असं चित्र जाणीवपूर्वक तयार करण्यात आलं. इंडियात राहणारे लोक विकास पावणारे, जिंकणारे आणि भारतातील लोक मागास आणि सतत हरणारे असं नवं वास्तव तयार झालंय. आरएसएस आणि भाजपच्या स्वप्नातील धर्मवादी राष्ट्र घडवणाऱ्या प्रयत्नाला यश येतंय.

४६. गेल्या सत्तर वर्षांत झाल्या नसतील एवढ्या घोषणा झाल्या; पण त्यांची बांधणी नागपूरच्या प्रयोगशाळेतून करण्यात आली होती.

४७. देशाचं राष्ट्रीय उत्पन्न म्हणजे गरिबीचा वेग गेल्या सत्तर वर्षांत वाढला नव्हता इतका तो वाढलाय.

४८. खोटं बोला पण रेटून बोला आणि खरं बोलणाऱ्याला राष्ट्रद्रोही ठरवा हे सत्तर वर्षांत घडलं नव्हतं तेवढं घडलं.

४९. विरोधकांना नाउमेद करण्यासाठी त्यांच्या नेत्यांना नागपुरात बोलवून सत्कार करण्यात आलं. त्यांच्या हातात राष्ट्रीय पुरस्काराचं शिल्ड देण्यात आलं.

५०. भाजपला पुन्हा चातुर्वर्ण्य व्यवस्था आणायची आहे.

अशी ही पन्नास कारणं. काही मोजकी. आठवतील तेवढी. दिसतील तेवढी. छळतील तेवढी. माणसाला आंधळा करतील तेवढी. पण छुप्या अजेंड्यावर नजर टाकली की कारणांची महागर्दीच दिसेल. आता प्रश्न आहे तो ही संपवण्यासाठी आपण येणाऱ्या निवडणुकीचा वापर करणार की नाही? ●●●

# हिंसेवरील तंत्र: मूलतत्त्ववाद



डॉ.मिलिंद आवाड



जागतिक पातळीवर मूलतत्त्ववादी विचार हा वेगवेगळ्या समाज, धर्म, लिंग, वंश, जात इत्यादींसारख्या मानवनिर्मित संरचनेमध्ये वेगवेगळ्या वैशिष्ट्यपूर्ण संरचनेमधून निर्माण झालेला दिसतो. या मानवनिर्मित वेगवेगळ्या संरचनेला आधुनिक व उत्तर आधुनिक पातळीवर पुरोगामी व परिवर्तनवादी विचाराचे संवर्धन करत त्या विचार विकासामधून समता, स्वातंत्र्य, बंधुता या आंबेडकरी त्रिसूत्रातून पारंपारिक मूलतत्त्वाला वैचारिक व सामाजिक पातळीवर पर्याय देत 'माणूस'केंद्रीत विकासाचे तत्वज्ञान विकसित होताना दिसते. भारतामध्ये पारंपारिक मूलतत्त्ववाद हा वैशिष्ट्यपूर्ण असून या मूलतत्त्ववादातून सामाजिक, सांस्कृतिक व वैयक्तिक जीवनाचे नियंत्रण होत असताना आपण पाहतो. भारतातील मूलतत्त्ववाद हा धार्मिक संरचनेमधून जोपासला जातो. त्यामुळे भारतामध्ये जात व त्या संरचनेमधून निर्माण होणारे व्यक्तीचे प्रत्येक पातळीवरचे स्तरीकरण हे भारतीय पारंपारिक जातीय समाजाचे लक्षण दिसते. कोणत्याही माणसास श्रद्धेचे स्वातंत्र्य (Right to faith) हे वैश्विक स्वातंत्र्य गरजेचे असून भारतीय मूलतत्त्ववाद धर्माधिष्ठित जातीग्रस्त समाजामध्ये या वैश्विक स्वातंत्र्याचेच नियंत्रण करत त्याच्या वैयक्तिक व सामाजिक अभिव्यक्तीला नियंत्रित करताना दिसते व हे भारतीय मूलतत्त्ववादाचे वैशिष्ट्य आहे. हे मूलतत्त्ववादी वैशिष्ट्य जात व त्याचा Stigma यांचे संबंध प्रचंड घट असल्यामुळे श्रमाला नैतिकतेचा दर्जा देऊन डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विश्लेषणानुसार जात हा श्रमिकाचे विभाजन आहे. हे विभाजन पारंपारिक, धार्मिक व सांस्कृतिक स्तरीकरणानुसार झालेले असून त्यामधून श्रद्धा, नितीमत्ता, सार्वजनिक आचरण इत्यादींसारख्या गोष्टींची निर्मिती झालेली दिसते. या निर्मितीमधूनच व्यक्तीचे सामाजिक व सांस्कृतिक स्तरीकरण होताना दिसते.

मानवी जीवनात हेना अरंटनुसार (Labour, work, action) क्रमशः श्रम, काम आणि क्रिया हे महत्वाचे घटक असून लेबर ही माणसाच्या (Biological) नैसर्गिक अवस्थेतील टप्पा आहे. उदाहरणार्थ चरितार्थ व इत्यादी तर त्यानंतरच्या आयुष्यातील काम (work) हा भौतिक जीवनातील टप्पा असून भौतिक जीवन व विशेषतः भांडवली व्यवस्थेनंतरचा श्रमाच्या व्यवस्थापनाचा टप्पा व त्यानंतर म्हणजे नैसर्गिक व भौतिक जीवनातील आयुष्यातील टप्पा पूर्ण केल्यानंतर (action) क्रिया या टप्प्यात मानवी जीवनासाठीचे (Artificial) कृत्रिम आयुष्य उदा. धार्मिक संस्कार व सामाजिक ओळख इत्यादी. म्हणजेच डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे जातीवरचे चिंतन पाहिले तर 'जात' ही सांस्कृतिक संरचनेची व्यवस्था आहे. त्यामुळे भारतामध्ये भौतिक जीवनाचा टप्पा व सांस्कृतिक जीवनाची व्यवस्था ही धार्मिक संरचनेच्या व्यवस्थेचा भाग असून त्यामधून जोपासला जाणारा मूलतत्त्ववाद हा अगदी वैशिष्ट्यपूर्ण आहे. त्यामुळे भारतातील मूलतत्त्ववाद हा व्यक्तीच्या वैयक्तिक जगण्याचा भाग तर आहेच; परंतु तो तिच्या सामाजिक, सांस्कृतिक जगण्याचे सूत्र ठरतो. म्हणजेच भारतामध्ये व्यक्तीचे Private व Public असे दोन टप्पे असून पारंपारिक मूलतत्त्ववाद हा दोन्हीही टप्प्यांत कार्यरत असताना दिसतो. म्हणजेच व्यक्तीचे Private हे श्रम व काम हे मूलतत्त्ववादी विचाराने प्रेरित असून त्याचे Public हे कृत्रिम असल्याचे दिसते. त्यामुळे भारतामध्ये जातीग्रस्त समाजात ज्या व्यक्तीचे खाजगी (Private) व Public यांची जैविक एकवाक्यता असल्याच्या मर्यादा दिसतात व हेच भारतातील धार्मिक मूलतत्त्ववादाचे वैशिष्ट्य असू शकते.

भारतामध्ये ऐतिहासिकदृष्ट्या मूलतत्त्ववादाविरूद्ध पुरोगामी परिवर्तनवादी व पुरोगामी विचार हा संघर्ष बुद्ध-चार्वाकपासून फुले-आंबेडकरांपर्यंत दिसतो. हा पुरोगामी विचार परिवर्तनवादी मूल्यांनी समाज विचारांची मांडणी करत इतिहासाकडे तटस्थ दृष्टीने पाहतो व मूलतत्त्ववादी मूल्यांची इतिहासातील वैचारिक व शारीरिक हिंसा करत मूलतत्त्ववादी ऐतिहासिक सारासार विचार यांचा पुनर्बदल करत परिवर्तनवादी विचारांची मांडणी करत आधुनिक समाजाची निर्मिती करण्यास बांधील असल्याचे दिसते. या काळात पुरोगामी परिवर्तनवादी विचार जरी मूलतत्त्ववादी हिंसेपुढे पराभूत होताना दिसत असले तरी परिवर्तनवादी विचार हीच भविष्याची नांदी आहे, एवढे निश्चित. उदाहरणार्थ, तत्कालीन उजवे राजकारण इतिहासाची पुनर्मांडणी करत वेगवेगळ्या प्रकारचे हिंसेचे समर्थन करताना निवडणुकीच्या राजकारणात यशस्वी होताना जरी दिसत असतील तरी पुरोगामी व परिवर्तनवादी विचार या हिंसादृष्टीत उजव्या विचारांच्या पारंपारिक मानसिकतेच्या विरूद्ध प्रबुद्ध व समताधिष्ठित नितीमान समाज निर्माण करेल, एवढे नक्की. ●●●

# अन्यायी राजवटीला निवडून देताना विचार करा





मा.न्या.पी.बी. सावंत

पाच वर्षांपासून या देशामध्ये मनुवादी आणि मनीवादी यांची प्रत्यक्ष राजवट अस्तित्वात आहे. त्यापूर्वी अप्रत्यक्षपणे तेच सत्ता गाजवत होते. आज देशाचा राज्यकारभार हा फक्त दोन व्यक्ती आपल्या मर्जीप्रमाणे करत आहेत. पंतप्रधान आणि सत्ताधारी पक्षाचे अध्यक्ष हे दोघेही असत्य आणि अप्रामाणिकपणा यांच्या आधाराने देशाला मूर्ख बनवण्याच्या प्रयत्नाने राज्यकारभार करत आहेत. याचं सर्वात देशविघातक असं अलिकडचं उदाहरण म्हणजे पुलवामा आणि बालाकोट येथे झालेले हल्ले. पुलवामामध्ये जो दहशतवादी हल्ला झाला, त्याला प्रत्युत्तर म्हणून बालाकोट येथे आमच्या सैन्याने जो तथाकथित हल्ला केला, त्यासंबंधाने पंतप्रधान आणि सैन्याचे प्रमुख यांनी खालील तीन प्रश्नांची उत्तरं देशाला दिली पाहिजेत.

**पहिला प्रश्न** : कुठल्याही सैन्याचा ताफा रस्त्याने जात असताना त्या रस्त्यावर खाजगी वाहतूक बंद केली जाते. त्याचप्रमाणे त्या रस्त्याच्या दोन्ही भागाला अर्ध्या किलोमीटरपर्यंत चाचणी केली जाते. असं असताना हा ७८ वाहनांचा सैन्याचा ताफा श्रीनगरला जात असताना खासगी ट्रॅफिक का आणि कुणी चालू दिली? एका खाजगी वाहनातून सैन्याच्या ताफ्यावर हा हल्ला झाला. तेव्हा खासगी वाहतूक चालू देण्यास कोण कारणीभूत होतं?

**दुसरा प्रश्न** : बालाकोटला आमच्या वायूदलाने जो हल्ला केला, त्या हल्ल्यामध्ये कसलीही प्राणहानी झालेली नसताना अमित शहा यांनी हल्ला झाल्यानंतर काही तासातच तिथे अडीचशे ते तीनशे दहशतवादी मारले गेले, हे विधान कुठल्या आधारावर केले आणि देशाला मूर्ख बनवण्याचा प्रयत्न केला, हे स्पष्ट करावे.


**तिसरा प्रश्न** : आजची भाजपची राजवट आल्यानंतर काश्मिरमध्ये दडपशाहीचा कहर करण्यात आला आहे. काश्मिर हा प्रश्न राजकीय आहे व तो लष्करी वा इतर कुठल्याही दडपशाहीने मिटणारं नाही, हे सर्वश्रूत आहे. असे असतानाही काश्मिरमध्ये काश्मिरी जनतेवरच नव्हे तर काश्मिरबाहेरही सत्ताधारी पक्षाकडून हल्ले केले जातात. जे काश्मिरचे विद्यार्थी आणि इतर लोक आहेत त्यांच्यावर जे मनुवाद्यांकडून हल्ले होत आहेत, ते आवरण्याचा या सरकारने कुठला प्रयत्न केला? आज या हल्ल्यांमुळे काश्मिरमधील जनता या देशापासून फार दूर गेलेली आहे. त्यामध्येच आज जबाबदार सरकारी प्रवक्त्यांकडून घटनेतील कलम ३५ (अ) रद्द करण्याची मागणी करण्यात येत आहे. त्यामुळे काश्मिरी जनता आणि भारत देश यामध्ये अधिकच अंतर निर्माण होत आहे. या राजवटीला काश्मिर हा आपल्या देशाचा अविभाज्य भाग राहावा असं वाटत नाही का? जर वाटत असेल तर काश्मिरी जनतेच्या भावना अधिकच उग्र करण्याचे प्रयत्न का करण्यात येत आहेत? दुर्दैवाने या तिन्ही प्रश्नांबाबत देशातील प्रसारमाध्यमं चुपचाप बसलेली आहेत. प्रसारमाध्यमांनी देशाची सेवा करायची असते, सरकारची नाही. आज सर्व प्रसारमाध्यमं सरकारनं विकत घेतलेली आहेत, हेच त्यांच्या चूप बसण्यामुळे सिद्ध होत आहे. त्याचप्रमाणे सोशल मिडियावर मुक्तपणे लिहिण्यावर, बोलण्यावर सरकारनं बंदी आणून विरोधकांचे सोशल मिडिया ब्लॉग बंद केले आहेत. व्यक्तीस्वातंत्र्याची पूर्ण ताकदीने हे सरकार गळचेपी करत आहे. ही आजची वस्तुस्थिती आहे. आज जनतेपुढे फक्त सरकारचाच प्रचार सतत येत असतो. देशातील समस्यांची जी दुसरी बाजू आहे ती त्यांच्यापुढे केव्हाच येत नाही, ही आजची परिस्थिती आहे. निवडणूक प्रचाराचा सोशल मिडिया एक भाग असू शकेल आणि तो तसा नक्कीच आहे; परंतु त्यामुळे देशातील जनता अज्ञानाच्या अंधःकारात वावरत आहे.

या राजवटीनं आतापर्यंत फक्त व्यापारी, उद्योगपती आणि श्रीमंतांची सेवा केलेली आहे. शेतकरी, कामगार आदी कष्टकरी वर्गाला कुठलेही लाभ देणं टाळलेलं आहे. कारण या राजवटीची भिस्त समाजातील फक्त उच्च, मध्यमवर्गापर्यंत आहे. मतदारांकडून असत्य आणि अप्रामाणिक प्रचारावर सत्ता मिळवायची आणि श्रीमंतांसाठी वापरायची आहे. त्यामुळे हे सरकार श्रीमंत वर्गाखेरीज इतर वर्गाची पर्वा करत नाही. त्यांचे प्रश्न सरकारने सोडवलेले नाहीत. ते सोडवण्यात त्यांना रसही नाही. ही गोष्ट आता शतप्रमाण सिद्ध झालेली आहे. तेव्हा अशा या राजवटीला कष्टकरी समाजानं पुन्हा का निवडून द्यावं असा त्या समाजानं विचार केला पाहिजे. या राजवटीत आहे रे आणि नाही रे असे दोन वर्ग स्पष्टपणे निर्माण झालेले आहेत आणि ही राजवट फक्त आहे रे वर्गांकरताच कार्य करत आहे.

●●●



# देशहितासाठी विवेकी जनता सत्ता परिवर्तन घडवेल!



डॉ. रावसाहेब कसबे

सर्वसामान्य माणसाला राज्यघटनेनं जे अधिकार दिलेले आहेत, जे स्वातंत्र्य दिलेले आहे ते स्वातंत्र्य उपभोगण्यात धर्मांधता आणि जातीयवाद हे दोन अडसर आहेत. याला आपण कसं सामोरं जाणार, हा मूलभूत प्रश्न भारतीय लोकशाहीसमोर आहे. २०१९ ची निवडणूक मला या दृष्टीने महत्त्वाची वाटते.

१७व्या लोकसभेसाठी होणारी ही आतापर्यंतच्या लोकशाहीतील एक अतिशय महत्त्वपूर्ण निवडणूक आहे. कारण आज भारत अशा वळणावर उभा आहे की, ज्यामुळे तो अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय क्षेत्रातील प्रश्नांनी भांबावलेला आहे. देशामध्ये लोकशाही राहील की नाही, याबद्दलची मतं घटना समितीने व्यक्त केलेली होती. घटना समितीने विशेषतः डॉ. बाबासाहेबांनी असा इशारा दिला होता की, या देशाचे स्वातंत्र्य टिकवायचे असेल, राज्यघटना खऱ्या अर्थाने राबवायची असेल आणि या देशामध्ये लोकशाहीची मुळं रुजवायची असतील तर स्वातंत्र्योत्तर काळामध्ये जी सरकारं येतील, त्यांनी काही मार्गदर्शक तत्त्वे पाळली पाहिजेत. याच मार्गदर्शक तत्त्वांचा समावेश घटना समितीने राज्यघटनेतच केलेला आहे. थोडक्यात काय तर, या देशामध्ये लोककल्याणकारी राज्य कसं येईल आणि सर्वसामान्य माणसाला त्याच्या गरजा पूर्ण कशा करता येतील यासाठी राज्यांनी म्हणजे राज्य सरकारांनी प्रयत्न करायला पाहिजे होते. तसे फारसे प्रयत्न झालेले नाहीत. जवाहरलाल नेहरूंच्या काळामध्ये तशा प्रकारचे प्रयत्न झालेले होते. नेहरूंनी जी समाजवादी समाजरचनेची भूमिका स्वीकारलेली होती, तिचे प्रतिबिंब शासकीय धोरणांमध्येही पडलेले आपण पाहत होतो; परंतु १९९१ नंतर जगामध्ये ज्या गोष्टी घडल्या आणि आजही घडत आहेत. त्याचा परिणाम असा झालेला आहे की, आज संपूर्ण जगाला दोन प्रकारच्या समस्यांना सामोरे जावे लागत आहे. त्यापैकी पहिली समस्या म्हणजे

जागतिकीकरण. याचा ज्या जाती आणि वर्गांना फायदा मिळाला ते खूप पुढे गेले आणि जे समूह जागतिकीकरणामध्ये स्पर्धा करू शकले नाहीत ते प्रचंड गरीब झाले. त्यामुळे पहिला प्रश्न असा आहे की, आपल्या देशामध्ये श्रीमंत आणि गरीब यांच्यातील ही दरी इतकी प्रचंड आहे की, ती बुजवण्यासाठी आवश्यक असलेली कोणतीही धोरणं आपण स्वीकारलेली नाहीत, स्वीकारूही शकत नाहीत. कारण निवडणुकांचं राजकारण हे बहुतेक भांडवलदारांच्या देणग्यांवर चालू असल्यामुळे आपण आणि आपलं सरकार त्यांच्यावर अंकुश ठेवण्यात फारसं यशस्वी झालेलं नाही. याची उदाहरणं आपण बघतोच आहोत की, किती लोक, किती संपत्ती घेऊन बाहेरच्या देशामध्ये पळून गेलेले आहेत.

दुसरा प्रश्न असा की, जागतिकीकरणाच्या वेळीच जे सांस्कृतिक संघर्ष झाले आणि त्या सांस्कृतिक संघर्षामधून जे जनमाणस ढवळून निघालं आणि संपूर्ण समाजामध्ये जी दुही निर्माण झाली, ती जातीजातीत असेल, धर्माधर्मात असेल. या सांस्कृतिक संघर्षाने इतकं उग्र रूप धारण केलेलं आहे की, त्याच्यामुळे लोकशाहीच्या मुळावरच घाला घालण्यात आलेला आहे. त्यामुळे यापुढची आपली लढाई दोन प्रश्नांवर असेल. एक गरीब आणि श्रीमंत यांच्यातील दरी मिटवणे आणि दुसरा सांस्कृतिक संघर्ष. आज हिंदू-मुसलमानांमध्ये एक जात विरूद्ध दुसरी जात असा होणारा संघर्ष, अस्पृश्यांवर होणारे अन्याय-अत्याचार आणि आपण श्रेष्ठ असल्याची सवर्णांची मानसिकता या सगळ्या गोष्टी लोकशाहीला उद्ध्वस्त करणाऱ्या आहेत. त्यामुळे इथून पुढे आपल्याला दोन पातळ्यांवर लढावं लागणार आहे. या सगळ्या निवडणुकांचा, राज्यघटनेचा अर्थ काय आहे? अशा प्रकारची समाजव्यवस्था निर्माण करणे की, जिच्यात प्रत्येक माणसाला त्याच्या योग्यतेनुसार काम मिळेल आणि प्रत्येक माणसाला मग ती स्त्री असो अथवा पुरूष, त्याला त्याचं जीवन अधिक चांगलं करण्याची संधी मिळेल, या दोन गोष्टींवर लोकशाही उभी असते. त्यांना असलेल्या अधिकारांचा पूर्णपणे वापर करता येणं यात अपेक्षित आहे. मात्र अधिकारांचा पूर्ण वापर करता न येण्याला दोन गोष्टी कारणीभूत आहेत. एक 'धर्मांधता' आणि दुसरी 'जातीयवाद'. सर्वसामान्य माणसाला राज्यघटनेनं जे अधिकार दिलेले आहेत, जे स्वातंत्र्य दिलेले आहे ते स्वातंत्र्य उपभोगण्यात धर्मांधता आणि जातीयवाद हे दोन अडसर आहेत. याला आपण कसं सामोरं जाणार, हा मूलभूत प्रश्न भारतीय लोकशाहीसमोर आहे. २०१९ ची निवडणूक मला या दृष्टीने महत्त्वाची वाटते. कालपर्यंत जे पक्ष, ज्या संघटना राज्यघटनेवर विश्वास ठेवत नव्हते किंवा ठेवत नव्हत्या; आजही ठेवत नाहीत, ते वरवर काहीही बोलत असले तरी त्यांच्या अंतरंगामध्ये राज्यघटनेबद्दल विशेष प्रेम आहे, असे कोणीही म्हणणार नाही. तेव्हा अशा लोकांचा राजकीय पक्ष हा सर्वसामान्य माणसाला हुलकावणी देऊन राजसत्तेवर आलेला आहे. कारण २०१४ च्या निवडणुकीमध्ये पंतप्रधान मोदींनी दिलेली भाषणं बघितली तर त्यामध्ये कुठेही हिंदुत्त्वाचा मुद्दा आढळत नाही. त्याच्यामध्ये कुठेही मुसलमानांविरोधी सूर नाही. अस्पृश्यांसंबंधी त्यांची जी खरी भूमिका आहे, ती या भाषणांमध्ये मांडली गेलेली नाही. तेव्हा प्रश्न असा आहे की, त्यावेळी त्यांनी अशी एक हुलकावणी दिली की, आम्हाला 'सबका साथ सबका विकास' करायचा आहे. भारतीय माणूस हा व्यक्तिपूजक आणि भावनाशील असल्यामुळे आपल्याला खरोखरच चांगले दिवस येण्याची शक्यता आहे, असं त्यांना वाटलं. चांगले दिवस येण्याच्या शक्यतेची भाषा ही माणसं करताहेत आणि अगदी धर्मनिरपेक्ष होऊन ही भाषणं करताहेत, तर आपल्याला पुढच्या काळात चांगलं जीवन मिळेल असं वाटलं म्हणून जनतेने त्यांना भरभरून मते दिली आणि ते निवडून आले; परंतु दोन वर्षांच्या आतच त्यांनी त्यांचं अंतरंग उघड केलं आणि भारतीय राज्यघटनेवर आघात करायला सुरूवात केली. पहिली सर्वात महत्त्वाची जी कोणती गोष्ट त्यांनी केली असेल तर ती म्हणजे धर्माधर्मामध्ये म्हणजे हिंदू-मुसलमानांमध्ये एक दरी तयार केली आणि राज्याराज्यांमधल्या निवडणुका जिंकल्या. विशेषतः उत्तरप्रदेशमध्ये मोदींची भाषणं बघितली तर ती सरळ सरळ मुस्लिमद्वेषांनी भारावलेली होती. आज आपण पाहतो की, निवडणुकीच्या शेवटी शेवटी पुन्हा एकदा त्यांनी राममंदिराचा मुद्दा उपस्थित केला; परंतु तो मुद्दा आता जनतेला काही फारसा भावत नाही आणि त्यात खूप कायदेशीर अडचणीही आहेत. मग त्यांनी सर्वसामान्य माणसाला आश्वासनं द्यायला सुरुवात केली, पैसे द्यायला सुरुवात केली. त्यामुळे भारतीय समाजामध्ये असं वातावरण तयार झालेलं आहे, की आता आपल्याला कोणीही त्राता राहिलेला नाही. माणसं हतबल झालेली आहेत आणि कोणावर विश्वास ठेवावा यासंबंधी त्यांच्या मनामध्ये संभ्रम आहे. मला स्वतःला असं वाटतं की, या भांडवलशाहीच्या चौकटीतसुद्धा अशी एक व्यवस्था आपल्याला निर्माण करता येऊ शकते, ज्यामध्ये भांडवलदारांवर काही प्रमाणात अंकुश ठेऊन सर्वसामान्य माणसाला अधिक स्वातंत्र्य देऊन आणि तुमच्या एकूण आर्थिक नियोजनामध्ये भरपूर तरतूद करून काही गोष्टी करता येणे शक्य आहे. आपल्या देशामध्ये अशा अनेक योजना आहेत की, ज्या योजनांवर तुम्ही कोट्यवधी रुपये खर्च करायचे ठरवलेले आहेत आणि त्याचा फारसा उपयोगही नाही. बुलेट ट्रेन आणायचं स्वप्नं तुम्ही लोकांना दाखवता. पण सध्या रेल्वेमध्ये ज्या सुविधांचा अभाव आहे त्या अगोदर दूर करा. रेल्वे अपघातामध्ये अनेक निरपराध लोक मरण पावतात. त्यामुळे सर्वप्रथम रेल्वे अपघात टाळण्यासाठी उपाययोजना करा आणि मग तुम्ही बुलेट ट्रेनच्या गोष्टी करा. म्हणजे ज्या गोष्टी आपल्याला आज फार आवश्यक नाहीत, अशाच गोष्टींची स्वप्नं आपण बघतो आणि ज्या गोष्टी सर्वसामान्य माणसाच्या जीवनाशी संबंधित आहेत, त्याकडे मात्र दुर्लक्ष करतो. शेतकऱ्यांचे प्रश्न तसेच आहेत. शेतकऱ्यांना जी कर्जमुक्ती दिली जाते, त्यातून शेतकऱ्यांचे प्रश्न सुटतील, असं मला अजिबात वाटत नाही. तुम्हाला शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवायचे असतील तर त्यांच्या ज्या मूलभूत मागण्या आणि मूलभूत गरजा आहेत, त्या आपल्याला पूर्ण कराव्या लागतील. पहिली





**लोकसंख्येच्या तुलनेत देशातील रेल्वेगाड्यांची संख्या खूपच तोकडी आहे. त्यामुळे प्रवाशांना जीव धोक्यात घालून असा प्रवास करावा लागतो या समस्या सोडविण्याऐवजी पंतप्रधान नरेंद्र मोदी हे बुलेट ट्रेनचे स्वप्न लोकांना दाखवतात. (संग्रहित छायाचित्र)**

गोष्ट अशी की, तुम्ही स्वामीनाथन आयोगाच्या शिफारशींची अंमलबजावणी करायला पाहिजे आणि त्यातून जो शेतकरी उभा राहील, तो लोकशाहीचा खऱ्या अर्थाने पाया असेल. कारण या देशामध्ये शेतकऱ्यांची संख्या सर्वाधिक आहे आणि खेड्यांची संख्यापण सर्वाधिक आहे. आज खेड्याचं जरी शहरीकरण होत असलं तरीसुद्धा या शहरीकरण झालेल्या खेड्यांचा आत्मासुद्धा हा खेड्याचाच आहे. तो शहरांचा झालेला नाही. वरकरणी आपल्याला असं वाटतं की, शहरीकरण झालेलं आहे, पण खेड्यांची परिस्थिती काही सुधारलेली नाही. दुसरी महत्त्वाची गोष्ट अशी की, खेड्यांमध्ये रोजगार उपलब्ध होण्यासाठी आणि या संदर्भातील मार्गदर्शक तत्त्वांचा समावेश घटना समितीने राज्यघटनेतच केलेला आहे. देशामध्ये लोककल्याणकारी राज्य आणणे हा या मागचा हेतू होता. त्यामधून आपण कोणतंही धोरण स्वीकारलेलं नसल्यामुळे शहरांवर लोकसंख्येचा इतका प्रचंड ताण आहे की, खूप माणसं स्थलांतर करतात. विशेषतः उत्तरेकडील जी राज्ये आहेत मग ते उत्तरप्रदेश असेल, बिहार असेल किंवा इतर कोणते राज्य असेल, या राज्यांचा राज्यकारभार काही फारसा चांगला चाललेला नाही. तिथे इतकी बेरोजगारी आहे की, माणूस जगण्यासाठी शहरांकडे पळतोय. म्हणून तुम्हाला दिल्लीची लोकसंख्या वाढलेली दिसते. मुंबईवर तर इतका ताण आहे की, मुंबईमध्येच या सगळ्या माणसांना नागरी सुविधा पुरवणं अतिशय अवघड होऊन बसलंय.

तेव्हा हा एकूण संपूर्ण देशाच्या योजनांचा प्रश्न आहे. यासाठी नियोजन करणारं सरकार आपल्याला पाहिजे, ज्यामध्ये शेतकऱ्यांना त्यांच्या खेड्यात काम मिळेल, त्याच्या खेड्यात शिक्षण मिळेल, मुलींना शिक्षणाची सोय होईल, मुली अधिक स्वतंत्र होतील. अस्पृश्यतेचा, जातीयवादाचा जो प्रश्न आहे, तो सोडवण्यासाठी सरकारने अतिशय कडक धोरण अवलंबले पाहिजे.

जिथे जिथे तुम्हाला जातीय अत्याचार दिसतील, तिथे अतिशय कडक धोरण स्वीकारून त्याची अंमलबजावणी आपल्याला करावी लागेल. या निवडणुकीत आणखी एक महत्त्वाचा प्रश्न आहे, ज्याची चर्चा आपल्या देशातील विचारवंतही करायला घाबरतात किंवा करत नाहीत किंवा मुळात चर्चा करण्याचीच त्यांची इच्छा नाही. देशातील राज्यकर्तेपण त्यासाठी काही करत नाहीत. कारण सर्व लोकानुनय चाललाय. आपण एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की, भारत हा संघराज्य म्हटला गेलाय. भारतीय राज्यघटनेने याला राज्याचा संघ असं म्हटलंय. भारतीय राज्यघटनेमध्ये 'फेडरेशन' हा शब्द नाहीये. 'युनियन ऑफ स्टेट्स' असा शब्द आहे. त्यामध्ये दक्षिणेकडची जी राज्ये आहेत, ती सगळी द्रविडीयन संस्कृतिची आहेत. त्यांची भाषा द्रविडीयन आहे. त्यांनी एकेकाळी द्रविडीस्थानची मागणी केलेली होती. त्यांनी हिंदीला प्रचंड विरोध केलेला होता. त्यांची संस्कृती आणि उत्तरेकडील लोकांची संस्कृती एक नाही. उत्तरपूर्वेतल्या लोकांची संस्कृती आणि उत्तरेकडील लोकांची संस्कृती एक नाही. जसजसा तुम्ही हिंदुत्वाचा अधिक प्रसार कराल, राममंदिराच्या प्रश्नावर उत्तरेकडच्या लोकांना खूश करण्यासाठी कोणत्याही थराला जालं आणि जसजसं हे वातावरण वाढत जाईल, तसतसं दक्षिण भारत देशातून फुटण्याची शक्यता मला वाटायला लागलेली आहे. याचं कारण असं की, ज्या श्रीरामाच्या नावाने आपण जे सगळं उत्तरेत चालवलं आहे, त्या श्रीरामाविरूद्ध असणारा रावण हा दक्षिणेचा आदर्श आहे आणि तुम्ही जर त्याचं दहन करायला लागलात तर



. त्याचबरोबर शौचालय, पिण्याचे पाणी, स्वच्छता, गाड्या कमालीच्या विलंबाने धावणे अशा अनेक गैरसोयींनाही प्रवाशांना तोंड द्यावे लागते.

त्यांना उत्तरेबद्दल काय वाटत असेल, याचा नुसता विचार केला तरी अंगावर शहारे येतात. तेव्हा ही निवडणूक मला या दृष्टीने महत्त्वाची वाटते की, धर्माच्या नावावर विशेषतः हिंदू धर्माच्या नावावर सुरू असलेलं राजकारण तुम्ही जितकं पुढं न्याल, तितकी या देशाचे विघटन होण्याची शक्यता आहे. काश्मिर भारतामध्ये राहीलच याची खात्री नाही. आपल्या शेजारच्या देशांपैकी कुठल्याही देशाची तुम्हाला मदत नाही. कारण तिथे चीनने पाय पसरलेले आहेत. तुमचं जे संपूर्ण परराष्ट्र धोरण आहे ते थोडं फसलेलं आहे. जो नेता एकेकाळी हिंदू राष्ट्र म्हणून प्रसिद्ध होता, आज तो नेता चीनच्या अधिपत्याखाली जाण्याची लक्षणं आहेत. पाकिस्तानमध्ये इतकी प्रचंड गुंतवणूक चीनने केलेली आहे की, ज्यामुळे चीनसारखा एक कम्युनिस्ट आणि प्रागतिक विचारसरणीचा देश तिथल्या दहशतवाद्यांना दुखवू इच्छित नाही. मी मध्यंतरी भुतानबरोबरच श्रीलंकेलाही गेलो होतो. तिथं मी अनुभवलं की, चीनने भुतान आणि श्रीलंकेतपण पाय पसरायला सुरुवात केलीय. त्यातल्या त्यात निदान भुतानचा तरी भारताबाबतचा दृष्टिकोन थोडासा सौम्य स्वरूपाचा आहे. पण श्रीलंकेमध्ये मात्र संपूर्ण चीनचं वारं वाहताना दिसलं. २०१९ च्या निवडणुकीच्या अनुषंगाने हा पहिला प्रश्न आहे की, भारत एकसंध राहील की नाही? उत्तरपूर्व, दक्षिण भारत, काश्मिर या हिंदुत्त्वाच्या राजकारणामुळे हे भाग भारतीय संघराज्यात राहतीलच याची हमी आपल्याला देता येत नाही. जर जनतेचा उद्रेक झाला तर त्याला शांत करण्याचं कुठलंही साधन तुमच्याकडे नाही.

२०१९ ची निवडणूक हे ठरवणार आहे की, या देशात धर्मनिरपेक्षतावादी सरकार येणार की धर्माधिष्ठित विचार करणारं सर्वसामान्य संघश्रद्धाळू लोकांचं अनुनय करणारं सरकार येणार, यावरच भारताचं भवितव्य अवलंबून आहे. यावर भारताची एकसंधता अवलंबून आहे. दुसरी गोष्ट, गरिबीमुळे तरूण अतिशय बेचैन झालेला आहे. त्याच्या हाताला काम नाही, त्याच्याकडे वेगवेगळ्या विद्यापीठांच्या पदव्या आहेत; परंतु त्याला त्याच्या योग्यतेप्रमाणे, पात्रतेनुसार नोकऱ्या मिळत नाहीत. त्यामुळे हे सगळे लोक राज्यघटनेविरूद्ध बंड करून उठतील आणि लोकशाहीचा ढाचा कोसळून टाकतील. त्यांनी तसं केलं तर ते अगदीच असमर्थनीय आहे, असं जग मानणार नाही. याचं सगळ्यात महत्त्वाचं कारण असं की, आपल्याकडे तशा प्रकारची दूरदृष्टी नाही. म्हणून २०१९ ची निवडणूक एक निर्णायक निवडणूक आहे. कारण निवडणुकीनंतर ही राज्यघटना राहणार की नाही? या देशामध्ये धर्मनिरपेक्षता येणार की धर्मराज्य होणार? या देशामध्ये सामाजिक, आर्थिक समता येणार की विषमता तशीच राहणार? या देशामध्ये भांडवलदार अधिक श्रीमंत होणार आणि गरीब अधिक गरीब होणार? या गोष्टी ठरवणारी ही निवडणूक असेल आणि म्हणून या देशातील सर्वसामान्य जनतेने हाच विचार केला पाहिजे की, आपल्याला काय पाहिजे? आपल्या कोणत्या मागण्या कोण पूर्ण करू शकेल? हे एकदा मनात पक्क करून कोणत्याही अभिनिवेषाला, कोणत्याही आमिषाला बळी न पडता २०१९ च्या निवडणुकीमध्ये मतदान केलं तर मला असं वाटतं की, भारताचं चित्र बदलेल. जगामध्ये बदल चिरंतन असतो यावर माझी श्रद्धा, विश्वास असल्यामुळे आणि भारतीय माणसाच्या विवेकबुद्धीवर माझी श्रद्धा असल्यामुळे मला असं वाटतं की, ही निवडणूक भारताच्या भविष्याला योग्य मार्ग दाखवील आणि तसंच घडो.

●●●



# मागासवर्गीय समूह स

## नागपुरातील चाळीस संघटनांच्या महासंघाने मांडली भूमिका

मोदी सरकारची ५ वर्षांची राजवट देशासाठी एक संकटच होती. सामाजिक न्याय, धर्मनिरपेक्षता आणि लोकशाही मूल्ये पायदळी तुडवून केलेला राज्यघटनेतील मूल्यांचा ऱ्हास, दलित आणि अल्पसंख्याकांवरील हल्ले, कायदा हातात घेऊन हिंसाचार घडविणे, निरपराधांना छळणे–ठार मारणे, खाजगीकरणाला प्रोत्साहन देऊन आरक्षण धोरण संपुष्टात आणण्याच्या दृष्टीने वाटचाल या बाबी मोदी सरकारची कारकीर्द देशाला विनाशाच्या खाईत लोटणारी असल्याच्या वास्तवावर प्रकाश टाकणाऱ्या आहेत. तरीही भाजप सरकार न केलेल्या विकास कामांबद्दल निवडणूक प्रचारात स्वतःचं कौतुक करून घेत आहे. या पार्श्वभूमीवर, नागपुरातील ४० अशासकीय संघटनांच्या महासंघाने मोदी सरकारच्या काळ्या कारनाम्यांवर पुस्तिका प्रकाशित करून आपली भूमिका मांडली आहे. महासंघाने लोकसभा निवडणुकीत उतरलेल्या राजकीय पक्षांसाठी एक जाहीरनामाही प्रसिद्ध केला आहे. लोकशाही वाचवण्यासाठी, धर्मनिरपेक्षता कायम ठेवण्यासाठी, विषमता कमी करून वंचितांच्या हिताविरोधी धोरणात बदल करण्यासाठी भाजपेत्तर पक्षांनी आणि लोकांनी भाजप सरकार बदलून दलित–आदिवासींच्या हिताची काळजी वाहणारे सरकार आणावे, असे आवाहन महासंघाने केले आहे.




# तापरिवर्तनाच्या अपेक्षेत



प्रो.सुखदेव थोरात, नवी दिल्ली

**देशात** १७ व्या लोकसभा निवडणुकीची रणधुमाळी सध्या सुरू असून प्रचाराची राळ उडवून देताना सत्ताधारी भारतीय जनता पक्ष (भाजप) न केलेल्या विकास कामांचा डिंडोरा पिटत आहे. वंचित घटकांसाठी विशेषतः अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींसाठी भाजपा सरकारने अनेक योजना, कार्यक्रम राबवले, असा दावा त्यांचे मंत्री आणि पदाधिकारी करीत आहेत; परंतु यातील बहुतांश योजना एक तर लोकांच्या डोळ्यात धूळफेक करण्यासाठी घोषित करण्यात आल्या किंवा ज्या-ज्या योजनांची अंमलबजावणी झाली त्या लाभार्थ्यांपर्यंत पोहचू नयेत म्हणून त्यात त्रुटी ठेवण्यात आल्या. त्यामुळे वंचित समाजगटांची सर्वच क्षेत्रातील आबाळ कायम राहिली. या पार्श्वभूमीवर वंचित समाजगटांच्या विकासासाठी उपाय सुचविण्याकरिता म्हणून नागपुरातील ४० अराजकीय संघटनांनी एकत्र येऊन एक महासंघ स्थापन केला आहे. सामाजिक न्याय, धर्मनिरपेक्षता आणि लोकशाहीकरिता महासंघ (फेडरेशन ऑफ ऑर्गनायझेशन फॉर सोशल जस्टीस, सेक्युलॅरिझम अॅड डेमॉक्रसी) असे त्याचे नाव आहे. लोकसभा निवडणुकांच्या निमित्ताने, समाजात सामाजिक न्याय प्रस्थापित करणे, धर्मनिरपेक्षतेच्या तत्वांची पाठराखण करणे आणि लोकशाही मूल्यांचे जतन करण्याच्या दृष्टीने राजकीय पक्षांना त्यांच्या कर्तव्याची जाणीव करून देणे, हा हेतू महासंघ स्थापनेमागे आहे.

वंचित समाजगटांच्या प्रश्नांवर उपाय शोधण्यासाठी एक समान दृष्टिकोन असावा यावर महासंघ सहमत आहे. मागील काही वर्षात काही प्रमाणात प्रगती झालेली असली तरी अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, भटक्या आणि विमुक्त जाती आणि इतर वंचित समाजगटांच्या वाट्याला जास्त गरिबी आणि वंचितता आली. त्यामुळे वंचितांच्या विकासाला चालना देण्याच्या दृष्टीने सध्याच्या आर्थिक, सामाजिक आणि राजकीय

## जातीभेद आणि दलितांवरील अत्याचार कमी करण्यासाठी कार्यक्रम

**१. कायद्यातील तरतुदींची अंमलबजावणी व्हावी :** दलित अत्याचार कमी करण्यासाठी समाजकल्याण मंत्रालयाने नागरी हक्क संरक्षण कायदा, १९५५ आणि दलित अत्याचार प्रतिबंधक (दुरूस्ती) कायदा, १९८९ अंतर्गत दर पाच वर्षांनी अस्पृश्यतेच्या स्थितीचे सर्वेक्षण करावे, सध्याच्या कायद्यात हे करण्याची तरतूद आहे. दलित अत्याचाराची समस्या हाताळण्यासाठी प्रत्येक पाच किंवा दहा ग्रामपंचायतींनी नागरी हक्क सचिवाची नेमणूक करावी, गाव दलित अत्याचारमुक्त करणे हे त्याचे कर्तव्य असावे, अनुसूचित जातीच्या लोकांना कालबद्ध पद्धतीने ग्रामीण भागातून शहरामध्ये आणि गावांमध्ये वसवण्यासाठी योजना आखावी, तिच्या अंमलबजावणीसाठी उच्चाधिकार समिती स्थापन करावी. या योजनेच्या प्रशासकीय आणि आर्थिक पैलूंचा तपशिलवार विचार करण्यासाठी एक समिती गठीत करावी. ही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची प्रमुख मागणी होती.

**२. राजकीय आरक्षणात सुधारणा :** अनुसूचित जातींना निव्वळ नावापुरते प्रतिनिधीत्व देण्याऐवजी खऱ्या व्यक्तीची निवड व्हावी यासाठी अनुसूचित जाती राजकीय आरक्षणाच्या सध्याच्या पद्धतीत सुधारणा करणे गरजेचे आहे. महात्मा गांधी आणि सरदार पटेल यांनी २० टक्के अर्हता मतांसह अर्हताप्राप्त संयुक्त मतदारसंघाच्या पद्धतीला मान्यता दिली होती. राज्यघटना लिहिताना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सुचवलेली आणि गांधी-पटेल यांनी मान्य केलेली ही मतदारसंघ पद्धत गरजेची आहे. सरपंचाची निवड आता थेट निवडणुकीद्वारे केली जाते. याबाबतचे सुधारित पंचायत राज विधयक मागे घेऊन आधीचीच पद्धत पुन्हा अमलात आणावी.

**३. प्रशासन धर्मनिरपेक्ष करणे :** मागील पाच वर्षात सरकारी प्रशासनामध्ये एका विशिष्ट जातीचे, धर्माचे आणि विचारसरणीचे लोक नियुक्त करण्यात आले. त्यामुळे सरकारी प्रशासन धर्मनिरपेक्ष राहण्यासाठी धोरण बनविणे गरजेचे आहे.

**४. सरकारी संस्था स्वायत्त असाव्यात :** केंद्रीय लोकसेवा आयोग, विद्यापीठ अनुदान आयोग यांसारख्या अनेक सरकारी संस्थांमध्ये सरकारचा हस्तक्षेप वाढल्यामुळे या संस्थांची स्वायतत्ता धोक्यात आली. या संस्थांमधील हस्तक्षेप रोखून त्यांची स्वायत्तता अबाधित राखली जावी यासाठी कायद्यात सुधारणा करावी. निवडणूक आयोग, प्रेस क्लब ऑफ इंडिया, वृत्तपत्रे, इलेक्ट्रॉनिक्स मिडिया, सरकारी विद्यापीठे आणि इतर सर्व सरकारी संस्थांमधील हस्तक्षेप थांबवण्यासाठीही कायदा करावा.

**५. मुस्लिम, ख्रिश्चनांचे उच्च शिक्षणातील प्रमाण वाढवावे :** अल्पसंख्याक समाजातील मुस्लिम आणि ख्रिश्चन यांचे उच्च शिक्षणातील प्रमाण अन्य समाजाच्या तुलनेत फारच कमी आहे. ते वाढविण्याच्या दृष्टीने धोरण आखले जावे. मुस्लिम समाजाचा नियमित सेवांमध्ये सहभाग कमी आहे. तोही वाढवण्याची गरज आहे.

**६. महिलांच्या सक्षमीकरणासाठी धोरणात सुधारणा आवश्यक :** महिलांमध्ये रोजगाराचा दर कमी आहे. मोठ्या प्रमाणावर महिला हंगामी रोजंदार कामगार आहेत. त्यातील फारच कमी महिला नियमित वेतनधारक कामगार आहेत. मोठ्या प्रमाणावर महिला शेतीशी निगडित आहेत. उद्योग आणि सेवा क्षेत्रात नोकरी करणाऱ्या महिलांपैकी बहुतेक महिला कमी वेतनाच्या प्राथमिक व्यवसायात आणि शेती व मत्स्य व्यवसायात आहेत. उच्च शिक्षण घेणाऱ्या महिलांचे प्रमाण कमी आहे. विशेष म्हणजे, वरील सर्वच बाबतीत अनुसूचित जाती-जमातीच्या महिला उच्चवर्गीय महिलांच्या मागे आहेत. म्हणून महिलांमधील नियमित वेतनाच्या रोजगाराचे आणि शिक्षणाचे प्रमाण वाढवण्यासाठी सध्याच्या धोरणात सुधारणा करावी.

धोरणांमध्ये सुधारणा होणे अत्यावश्यक असल्याचे महासंघाला वाटते. त्यातूनच महासंघाने काही उपाय सुचवले असून वंचित समाजगटांच्या सर्वांगीण विकासासाठी हे उपाय उपकारक ठरू शकतील, असा विश्वास महासंघाला वाटतो.

लोकसभा निवडणूक २०१९ विषयक दृष्टिकोन या नावाने प्रसृत केलेल्या पुस्तिकेत, महासंघाने आपली भूमिका मांडतानाच २०१४ ते २०१९ या काळात भाजपाने राबविलेल्या दलित आणि वंचित समाजगटांसाठीच्या विपरित आर्थिक आणि सामाजिक धोरणांवर प्रकाश टाकला असून राजकीय पक्षांनी राबवावयाचा धोरणविषयक जाहीरनामाही प्रसृत केला आहे.

## अनुसूचित जाती-जमाती व इतर मागासवर्गीयांच्या धोरणात नकारात्मक बदल

अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती व इतर मागासवर्गीयांच्या धोरणात नकारात्मक बदल सरकारने केल्यामुळेही हे घटक विकासापासून वंचित राहिले आहेत. त्याचा तपशिल असा देता येईल.

**१. विशेष घटक योजना :** अनुसूचित जातीच्या विकासासाठी राबविली जाणारी ही योजना आहे; परंतु सरकार या योजनेचा पुरेसा लाभ लाभार्थ्यांना देत नाही. देशातील अनुसूचित जातींची लोकसंख्या १६.६ टक्के आहे. हे प्रमाण लक्षात घेता विशेष घटक योजनेंतर्गत अनुसूचित जातींसाठी १६ टक्के आर्थिक तरतूद करणे गरजेचे आहे; परंतु भाजप सरकारने त्याच्या राजवटीतील पाचही वर्षांत केवळ ७ टक्के तरतूद केली. जवळपास १० टक्के कमी तरतुदीमुळे अनुसूचित जातींना २७५२.३२ अब्ज रुपयांचा फटका बसला. शिवाय अनुसूचित जाती योजनेचे नाव बदलून ते 'अनुसूचित जातीच्या कल्याणासाठी तरतूद' असे केल्यामुळे




**मागासवर्गीय विद्यार्थ्यांना महागाई निर्देशांकानुसार शिष्यवृत्ती, फेलोशिप दिली जात नाही. त्यामुळे तुटपुंज्या रकमेतच विद्यार्थ्यांना भागवावे लागते. त्यामुळे विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती आणि फेलोशिप वाढीसाठी वेळोवेळी आंदोलन करावे लागते. गुवाहाटी येथील आयआयटीच्या विद्यार्थ्यांनी फेलोशिपमध्ये वाढ करण्याच्या मागणीसाठी जानेवारी २०१९ मध्ये आंदोलन केले.**

अनुसूचित जातीच्या सक्षमीकरणावरचे आणि त्यांच्यासाठीच्या खास योजनेवरचे लक्ष इतरत्र वळवले गेले आहे.

**२. अपुऱ्या आर्थिक तरतुदीचा शिक्षणावर परिणाम :** मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्तीसाठी केंद्र सरकारने पुरेशी आर्थिक तरतूद केलेली नाही. त्यामुळे अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर विपरित परिणाम झाला आहे. देशभरातील सुमारे ५१ लाख एससीच्या विद्यार्थ्यांसाठी देय असलेला ८० अब्ज रुपयांहून अधिक निधी गेली तीन वर्षे केंद्र सरकारकडून राज्य सरकारला विलंबाने दिला गेला किंवा तो प्रलंबित ठेवला गेला. त्यामुळे शिक्षण घेताना विद्यार्थ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १९४५ मध्ये अनुसूचित जातींच्या विद्यार्थ्यांसाठी ही शिष्यवृत्ती सुरू केली होती. ती वेळेवर दिली जात नसल्याने या विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा खोळंबा होत आहे. संशोधनासाठी अनुसूचित जातींच्या विद्यार्थ्यांना दिली जाणारी राजीव गांधी फेलोशिपही नियमित मिळत नाही. काही योजनांवरील पैसा थांबवण्यात आलेला आहे. अनुसूचित जाती, जमातीच्या उच्च शिक्षणाची गती कमी करणे हा यामागचा हेतू आहे.

**३. एससीच्या उद्योगांबाबत पक्षपात :** केंद्र सरकारने अनुसूचित जाती व जमातींच्या उद्योगांवरील मालकीत वाढ व्हावी म्हणून एससी-एसटी हब ही खास योजना सुरू केली. या योजनेत खरेदी धोरणांतर्गत मध्यम, लहान आणि सूक्ष्म उद्योग मंत्रालयाने एससी-एसटीच्या उद्योगांकडून ४ टक्के माल खरेदी करणे अनिवार्य आहे; परंतु खरेदीचे हे प्रमाण केवळ ०.४० टक्के आहे. त्यामुळे केंद्र सरकार एससी-एसटीच्या उद्योगवाढीसाठी प्रयत्न करीत असल्याचा दावा फोल ठरतो.

**४. आरक्षण संकटात :** आर्थिक निकषांवर आरक्षण दिले जावे, असा सल्ला भाजपा आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या ज्येष्ठ मंडळींनी वेळोवेळी सरकारला दिलेला आहे. काहींनी तर आर्थिकदृष्ट्या सुस्थितीत असलेल्या अनुसूचित जातींना आरक्षणातून वगळण्याची मागणीही केली आहे. यामुळे आरक्षण संकटात आले आहे.

**५. अनुसूचित जातींवरील अत्याचार :** दलितांवरील अत्याचार रोखण्यासाठी विशेष उपाययोजना करण्याचे आश्वासन भाजपच्या २०१४ च्या निवडणूक जाहीरनाम्यात देण्यात आले होते. दलितांच्या सुरक्षिततेची हमी देण्यास, प्रामुख्याने त्यांच्यावरील अत्याचार रोखण्यास आम्ही सर्वोच्च प्राधान्य देऊ, असे भाजपने जाहीरनाम्यात म्हटले होते; परंतु प्रत्यक्षात भाजपचे हे वचन कागदावरच राहिले आहे. देशात दलितांवरील अत्याचार कमी होण्याऐवजी ते वाढले. राष्ट्रीय पातळीवर २०१६ मध्ये दलित अत्याचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत एक लाख लोकसंख्येमागे २० प्रकरणांची नोंद झाली होती. मध्यप्रदेश ४३, राजस्थान ४२, बिहार ३४, गुजरात ३२, आंध्रप्रदेश २७, केरळ २६ आणि ओडिशा व उत्तरप्रदेश २५ अशी ही राज्यनिहाय आकडेवारी होती. यावरून असे दिसते की, सर्वच राज्यांमध्ये दलितांवर अत्याचाराच्या घटना घडत आहेत. भाजपने दिलेल्या आश्वासनानुसार अत्याचार रोखण्यासाठी कोणताही पुढाकार घेतलेला नाही. उलट, अत्याचारात पहिल्या चार क्रमांकावर असलेली राज्ये ही भाजपशासित आहेत. (मध्यप्रदेश, राजस्थानात अलीकडेच काँग्रेसची सरकारं आली) यातील धक्कादायक बाब अशी की, अनुसूचित जाती आणि अल्पसंख्याकांच्या विरोधात होणारा खुला आणि सामूहिक हिंसाचार वाढत चालला आहे. उना येथील घटना आणि मुस्लिमांवरील अनेक हिंसक हल्ले, ही याची उदाहरणे आहेत.

**६. खाजगीकरणामुळे सरकारी नोकऱ्यांमधील आरक्षण संपले :** या सरकारच्या कार्यकाळात खाजगीकरणही वाढत चालले असून सरकारी आणि खाजगी क्षेत्रातील कंपन्यांच्या आणि शिक्षणाच्या खाजगीकरणामुळे सरकारी नोकऱ्यांमधील आरक्षण संपले आहे.

# वंचितांसाठी राबविलेली विपरित आर्थिक व सामाजिक धोरणे

भाजपच्या मागील पाच वर्षातील कार्यकाळाचा आढावा घेतला असता असे लक्षात येते की, भाजप सरकारने राबविलेल्या काही धोरणांचा विपरित परिणाम दलित, आदिवासी व इतर वंचित समाजगटांवर झालेला आहे. भाजप सरकारच्या धोरणांमुळे संविधानातील तत्त्वे आणि मूल्यांची पायमल्ली झालेली आहे. सामाजिक धोरणांचा परिणाम समाजावर कसा झालेला आहे, त्याचा आढावा घेणे येथे क्रमप्राप्त ठरते.

**१. भारतीय संविधानातील तत्त्वे आणि मूल्यांचा ऱ्हास :** राज्यघटनेच्या प्रास्ताविकेतच, हे राष्ट्र लोकशाहीवादी, धर्मनिरपेक्ष आणि समाजवादी असेल असे म्हटले आहे. यामध्ये लोकांना सामाजिक न्याय, वैयक्तिक स्वातंत्र्याची हमी, लोकांमध्ये बंधुभाव व मैत्री निर्माण करणे आणि राष्ट्राची एकता आणि एकात्मता वाढविणे अपेक्षित आहे. मात्र भाजप सरकारच्या पाच वर्षांच्या राजवटीत राज्यघटनेतील लोकशाहीवादी, धर्मनिरपेक्षतावादी आणि समाजवादी मूल्यांचा ऱ्हास झाल्याचे, वाढता हिंसाचार, असंवैधानिक पद्धतींचा वापर, राष्ट्राचे हिंदुत्वीकरण, वैयक्तिक स्वातंत्र्यावर निर्बंध, जातीय आणि धार्मिक गटांमधील संघर्ष या घटनांवरून स्पष्ट होते. राष्ट्रात अशांतता, ऐक्य आणि एकात्मतेचा ऱ्हास आणि आर्थिक विषमता तसेच बेरोजगारी वाढण्यावरही सरकारच्या सामाजिक धोरणांचा परिणाम झालेला आहे.

**२. कायदा हातात घेण्याचे प्रकार :** समाजातील गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांना वठणीवर आणण्यासाठी कायदे आहेत. असे असतानाही काही लोकांचे गट हिंसक कृत्ये करून कायद्याची अंमलबजावणी करण्याचे अधिकार त्यांच्याकडेच असल्यासारखे वागत आले. यामुळे लोकशाही मार्गाचा ऱ्हास होत गेला. या हिंसेचे बळी अनुसूचित जाती आणि अल्पसंख्याक ठरले आहेत. गुजरातमधील उना येथील आणि महाराष्ट्रातील दलित तरूणांवर झालेले अत्याचार ही याची उदाहरणे म्हणून सांगता येतील.

**३. धर्मनिरपेक्षतावादी मूल्ये पायदळी :** कोणत्याही विशिष्ट धर्माच्या नियमांचा किंवा तत्त्वांचा राष्ट्राने वापर करता कामा नये, ही धर्मनिरपेक्षतावादी गुणधर्माची अट असते. मात्र भाजपच्या काळात प्रशासनात हिंदू धार्मिक मूल्ये आणि रिवाज यांचा वापर केला गेला. पुरोहिताला मंत्र्याचा दर्जा देणे ही अशा प्रकारच्या इतर कृतींपैकीच एक आहे. भारताचे पंतप्रधान जपानच्या पंतप्रधानांना संविधानाऐवजी गीतेची प्रत प्रदान करतात. भारताच्या परराष्ट्रमंत्री गीता हा राष्ट्रीय मौलिक ग्रंथ म्हणून मान्य करावा, अशी सूचना करतात. ही कृत्ये धर्मनिरपेक्षतावादी मूल्यांचा ऱ्हास करणारीच आहेत.

**४. अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर बंधने :** अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर आणि प्रसारमाध्यमांच्या वृत्त प्रसारित करण्याच्या स्वातंत्र्यावर प्रत्यक्षाप्रत्यक्षपणे नियंत्रण आणण्यात आले आहे. काही क्षेत्रात वैयक्तिक स्वातंत्र्यावर बंधने लादली असून हिंदू मूल्यांनुसार अन्न, वस्त्र आणि नातेसंबंध यांना नियंत्रित करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

**५. विशिष्ट तत्त्वप्रणालीच्या लोकांचा प्रशासनावर कब्जा :** प्रशासनात एका विशिष्ट विचारसरणीच्या लोकांची नेमणूक करण्यात आली आहे. प्रशासनाचा वापर एका जातीच्या व विचारसरणीच्या लोकांकरिता जास्त केला जात आहे. नेमणूक करताना गुणवत्तेऐवजी विशिष्ट विचारसरणीला प्राधान्य देण्यात येत आहे.

**६. बंधुभावाचा ऱ्हास :** या सरकारच्या काळात आंतरजातीय व आंतरधर्मीय संघर्षात वाढ झाली असून देशाची एकात्मता आणि शांतता धोक्यात आली आहे.

**७. समाजवादी दृष्टिकोनाची पायमल्ली :** सरकारची आणि सार्वजनिक क्षेत्राची भूमिका आता कमी झाली असून निव्वळ खाजगी क्षेत्राला प्रोत्साहन दिले जात आहे. यामुळे मुठभर लोकांच्या हातात संपत्तीचे केंद्रीकरण झाल्यामुळे आर्थिक विषमता वाढली आहे. बेरोजगारी प्रचंड प्रमाणात वाढली आहे. बेरोजगारीची खरी आकडेवारी बाहेर येऊ नये म्हणून सरकारी अहवाल दडवले गेले आहेत.

मुंबई आणि दिल्लीबरोबरच आता इतर पाच-सहा विमानतळांचेही खाजगीकरण करण्याचे धोरण सरकारने जाहीर केले आहे. त्यात डॉ.बाबासाहेब आंबेडकर विमानतळाचाही समावेश आहे.

**७. शिक्षणाची उपलब्धता कमी :** शाळा आणि उच्च शिक्षणाच्या खाजगीकरणामुळे अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती आणि इतर गरिबांना शिक्षणाची उपलब्धता कमी झाली आहे.

**८. बेरोजगारीत वाढ :** देशातील बेरोजगारी झपाट्याने वाढत असून त्यात अनुसूचित जातींची आकडेवारी सर्वाधिक आहे.

**९. खाजगी क्षेत्रातील सकारात्मक धोरण :** खाजगी क्षेत्राच्या सकारात्मक कृती धोरणावर कोणत्याही प्रकारची देखरेख नाही. सकारात्मक कृती धोरणांवर देखरेख ठेवण्यासाठी पंतप्रधान कार्यालयाने दरवर्षी उद्योगांच्या संस्थांबरोबर/संघटनांबरोबर बैठक घेण्याचे धोरण आहे; परंतु याची काटेकोर अंमलबजावणी होताना दिसत नाही. २००९ ते २०१४ दरम्यान सत्तेत असलेल्या काँग्रेसच्या सरकारने यासंदर्भात सात बैठका घेतल्या होत्या. भाजप सरकारने मात्र फक्त गेल्या वर्षी अशी एकच शेवटची बैठक घेतली.

**१०. जातीव्यवस्थेला अप्रत्यक्ष पाठबळ :** वर्ण किंवा जातीव्यवस्थेवर आधारित समाजाचे प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष समर्थन करण्याच्या प्रवृत्तीत वाढ होत चालल्यामुळे अनुसूचित जाती आणि इतर कनिष्ठ जातींना कमालीची असुरक्षितता वाटू लागली आहे. काही लोक वेदकालिन तत्त्वप्रणालीवर आणि भगवत्‌गीतेतील शिकवणुकीवर वर्णव्यवस्थेचे समर्थन करीत आहेत. वेदकालिन तत्त्वप्रणालीवर किंवा भगवत्‌गीतेला राष्ट्रीय आध्यात्मिक ग्रंथ म्हणून सादर करण्याच्या सूचना केल्या जातात,

त्यावेळी धार्मिक तत्त्वप्रणाली आणि सामाजिक तत्त्वप्रणाली (वर्ण किंवा जातीव्यवस्था) यामध्ये कोणताही फरक केला जात नाही. राज्यघटना सर्वांना त्यांच्या धर्मानुसार आचरण व प्रचार करण्याची परवानगी देते. हाच अधिकार हिंदूंनासुद्धा आहे. मात्र विषमता निर्माण करणाऱ्या हक्कांना पाठिंबा देणाऱ्या सामाजिक तत्त्वप्रणालीचा प्रचार करण्याचा अधिकार नाही. मात्र वर्णव्यवस्थेवर आधारित सामाजिक तत्त्वप्रणालीचे अधूनमधून समर्थन केले जाते. त्यामुळे जातीव्यवस्थेला अप्रत्यक्षपणे पाठबळच मिळते आहे.

यावरून हे स्पष्ट होते की, भाजप सरकारच्या पाच वर्षांच्या राजवटीत लोकशाही मूल्यांचा ऱ्हास झालेला आहे. बदललेल्या धोरणांची झळ अनुसूचित जाती-जमाती, अल्पसंख्याक व वंचित समाजगटांना बसली आहे.

## निवडणुकीसंदर्भात महासंघाची भूमिका व योग्य धोरणांसाठी जाहीरनामा

मागील सहा दशकांत लोकांच्या जीवनस्तरात सुधारणा झालेली असूनही अनुसूचित जाती-जमाती, भटक्या आणि विमुक्त जमाती, इतर मागास जाती आणि समाजातील तत्सम वर्गामध्ये गरिबीचे प्रमाण अजूनही अधिक आहे. २०१२ मध्ये महाराष्ट्रातील १७ टक्के लोक गरीब होते; परंतु अनुसूचित जमाती ५४ टक्के, बौद्ध २८ टक्के, अनुसूचित जाती २० टक्के, मुस्लिम १९ टक्के आणि इतर मागासवर्गीयांत १४ टक्के गरिबीचे प्रमाण होते. ते कमी शिक्षित आहेत. त्यांच्याकडे घरे, पिण्याचे शुद्ध पाणी, वीज यांसारख्या नागरी सुविधा पुरेशा नाहीत. त्यांच्याकडे शेतजमीन आणि खाजगी उद्योगधंदे नसल्यामुळे गरिबी अधिक आहे. ते वाढती बेरोजगारी आणि कमी शिक्षणामुळे त्रस्त आहेत. याव्यतिरिक्त अनुसूचित जाती आणि स्त्रियांना जातीय भेदभावसुद्धा सहन करावा लागतो. त्यातून त्यांना आर्थिक, नागरी आणि राजकीय हक्क नाकारले जातात. त्यामुळे जातीय व लिंगभेदभाव हे गरिबी वाढण्याचे आणि अनुसूचित जाती व महिला अधिक वंचित होण्याचे कारण ठरते. म्हणून ही स्थिती दूर करण्यासाठी महासंघाने काही ठोस उपाय जाहीरनाम्याच्या स्वरूपात राजकीय पक्षांसाठी सुचवले आहेत.

महाराष्ट्रातील शेतजमीन आणि उद्योग यांसारख्या उत्पन्न मिळवून देणाऱ्या मालमत्तांच्या मालकीत सुधारणा फेडरेशनने सुचवल्या आहेत, त्या अशा

**१. जमिनीचे वाटप करावे :** अनुसूचित जातींची शेतजमिनीवरील कमी मालकी हे ग्रामीण भागातील कमी उत्पन्नाचे व उच्च गरिबीचे कारण आहे. सन २०१३ मध्ये महाराष्ट्रातील २० टक्के ग्रामीण कुटुंबांकडे ७५ टक्के शेतजमिनीची मालकी होती तर तळातील २० टक्के कुटुंबांकडे जेमतेम ०.५ टक्के जमिनीची मालकी होती. शहरी भागात २० टक्के कुटुंबाकडे ६५ टक्के जमिनीची मालकी होती तर तळातील २० टक्के कुटुंबांकडे असलेली जमिनीची मालकी अगदी नगण्य होती. अनुसूचित जातींकडे तर इतरांच्या तुलनेत खूप कमी प्रमाणात जमीन आहे. २०१३ मध्ये अनुसूचित

## सामाजिक सक्षमीकरणासाठी उपाय

**१. शिक्षणाच्या उपलब्धतेत सुधारणा करावी :** शिक्षण मिळवण्यात आणि उच्च माध्यमिक आणि उच्च शिक्षण मिळवण्यातही विषमता आहे. सन २०१४ मध्ये महाराष्ट्रात कमी उत्पन्न गटातील विद्यार्थ्यांचा (तळातील २० टक्के) उच्च शिक्षणाला प्रवेश घेण्याचा दर सुमारे १६ टक्के होता. मध्यम उत्पन्न गटातील विद्यार्थ्यांचा हा दर २२ ते २५ टक्के आणि सर्वोच्च उत्पन्न गटातील विद्यार्थ्यांचा हा दर ७५ टक्के होता. ही विषमता कमी करण्यासाठी पावले उचलण्याची गरज आहे. यामध्ये २०१३ चा स्कूल सेल्फ फायनान्स कायदा मागे घेणे, सार्वजनिक शाळांची यंत्रणा बळकट करणे, सार्वजनिक शिक्षणाच्या दर्जात सुधारणा करणे, अगदी पहिलीपासूनच इंग्रजी शिकवणे सक्तीचे करणे, प्रत्येक तालुक्यात अनुसूचित जाती-जमाती आणि सर्व सामाजिक गटातील गरीब विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे सुरू करणे, सरकारी महाविद्यालये, खाजगी अनुदानित महाविद्यालये आणि सार्वजनिक विद्यापीठे बळकट करणे. त्यांच्या शिक्षणाच्या दर्जात सुधारणा करणे. स्वयंसहाय्यित संस्थांचे शैक्षणिक शुल्क पालकांच्या उत्पन्नाच्या पातळीवर आधारित करणे. गरीब विद्यार्थ्यांना कमी फिस आकारून आर्थिक सहाय्य करणे. कॅनडा आणि ऑस्ट्रेलियाच्या धर्तीवर नोकरी लागल्यावर कर्जपरतीच्या आधारावर सरकारने कर्ज देण्यासाठी सार्वजनिक वित्त महामंडळ स्थापन करावे. विद्यापीठ, महाविद्यालये व शाळांमधून जात आणि अन्य प्रकारचा भेदभाव रोखण्यासाठी रॅगिंगविरोधी कायद्याच्या धर्तीवर भेदभावविरोधी कायदा करावा. मुस्लिमांधील शिक्षणाचे प्रमाण वाढवावे.

**२. नागरी सुविधांची उपलब्धता :** सन २०११ मध्ये सुमारे ३३ टक्के कुटुंबांकडे योग्य प्रकारचा निवारा किंवा घरे नव्हती. (शहरी भागात सुमारे एक चतुर्थांश लोक झोपडपट्ट्यांमध्ये राहत होते. हे प्रमाण अनुसूचित जातींमध्ये ३२ टक्के होते) ३२ टक्के लोकांना पिण्याचे सुरक्षित पाणी मिळत नव्हते आणि ५० टक्के लोकांकडे स्वतची शौचालये नव्हती. १६ टक्के घरांमध्ये वीज नव्हती. या सुविधा न मिळालेल्या कुटुंबांमध्ये अनुसूचित जाती-जमाती, भटक्या-विमुक्त जातींमधील कुटुंबांचे प्रमाण उच्च आहे. या मूलभूत सेवा कालबद्ध पद्धतीने राज्य सरकारने उपलब्ध करून द्याव्यात.

**३. उपयोजनेचे कायद्यात रूपांतर करावे :** तेलंगणा आणि आंध्रप्रदेशच्या धर्तीवर महाराष्ट्र शासनाने विशेष घटक योजना आणि अनुसूचित जमाती उपयोजना यांचे कायद्यात रूपांतर करावे.





**वाढत्या बेरोजगारीमुळे अनेक उच्चशिक्षित तरूणही पोलीस भरतीसाठी रांगा लावत आहेत.**

जातीचा एकूण शेतजमिनीतील वाटा फक्त ५ टक्के होता. तर ग्रामीण कुटुंबांमध्ये हे प्रमाण १६ टक्के होते. शेतीच्या माध्यमातून आर्थिक स्वावलंबित्व यावं यासाठी सर्व वंचित समाजगटांना सरकारने शेतजमिनीचे वाटप करावे, अनुसूचित जमातींच्या शेतकऱ्यांनाही शेती करण्यासाठी मदत करून त्यांचे जंगल आणि जमिनीसंदर्भातील अधिकार सुरक्षित ठेवावेत.

**२. गरीब आणि लघुशेतकऱ्यांसाठी धोरण असावे :** लहान शेतकऱ्यांकडे थोडीफार जमीन असली तरी ते अधिक गरीब आहेत. सन २०१३ मध्ये जवळपास ७२ टक्के शेतकऱ्यांकडे ५ एकरांहून कमी जमिनीची मालकी होती. सन २०१२ मध्ये १९ टक्के शेतकरी गरीब होते त्यातील अल्पभूधारक शेतकरी (२७ टक्के) अधिक गरीब होते. सिंचनाची सोय नसलेले शेतकरीही (३० टक्के) सिंचनाची सोय असलेल्या (९.६ टक्के) शेतकऱ्यांच्या तुलनेत अधिक गरीब होते. अनुसूचित जाती, जमातींमधील शेतकऱ्यांमध्ये गरिबीचे प्रमाण अधिक होते. सिंचन क्षेत्रात वाढ आणि शेतीसाठी आधुनिक संसाधनाचा वापर केल्यास उत्पन्न वाढीस आणि लहान शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थैर्यास मदत होणार आहे. त्यासाठी विशेष धोरण राबविण्याची गरज आहे.

**३. छोट्या उद्योगासाठी धोरणांची गरज :** महाराष्ट्रातील लहान घरगुती व्यावसायिकांमध्येही मोठ्या प्रमाणावर गरिबी आहे. त्यापैकी ७६ टक्के व्यवसाय हे घरगुती व्यवसाय असून कौटुंबिक श्रमशक्तीवर आणि कुटुंबाच्या आवारातच चालवल्या जातात. त्यांची उलाढाल आणि उत्पन्न कमी असल्यामुळे वंचित लोकांमध्ये गरिबीचे प्रमाण उच्च आहे. २०१३ मध्ये महाराष्ट्रातील एकूण उद्योगांमध्ये एससीच्या मालकीच्या उद्योगांचे प्रमाण ९ टक्के होते. त्यांच्या लोकसंख्येतील १७ टक्के वाट्याच्या तुलनेत हे प्रमाण कमी आहे. यातील बहुतेकजण कोणत्याही कायमस्वरूपी रचनेशिवाय व्यवसाय चालवत होते. त्यामुळे अनुसूचित जाती आणि जमातींच्या व्यावसायिकांसाठी आवश्यक पतपुरवठा आणि इतर सुविधांसह औद्योगिक वसाहतीची स्थापना करावी, अनुसूचित जाती, जमाती, ओबीसी, एनटी, डीएनटीमधील गरिबांकडून सार्वजनिक आणि खाजगी कंपन्यांतील शेअर खरेदी करवून घेऊन आणि इतर आर्थिक गुंतवणुकीच्या माध्यमातून त्यांना वित्तीय भांडवलाची मालकी मिळावी यासाठी वित्तपुरवठा करावा. यासाठी सार्वजनिक वित्त महामंडळाची स्थापना करावी.

**४. बेरोजगार तरूणांसाठी हवी सार्वजनिक रोजगार योजना :** ग्रामीण आणि शहरी क्षेत्रातील शिक्षित, अल्पशिक्षित बेरोजगार तरूणांसाठी स्वतंत्र रोजगार हमी योजनेची गरज आहे. देशातील बेरोजगारी उच्चस्तरापर्यंत वाढली आहे. खाजगी क्षेत्रालाही 'उद्योजकीय सामाजिक जबाबदारी'(सीएसआर) च्या माध्यमातून सार्वजनिक रोजगार कार्यक्रमात सहभागी करून घेणे शक्य आहे. त्यामुळे बेरोजगार तरूणाला उत्पन्नाची खात्री मिळेल आणि त्याच्या आर्थिक विकासाला प्रोत्साहन मिळेल. शहरी क्षेत्रातील पायाभूत सुविधांमध्ये वाढ होऊन आर्थिक विकासाला प्रोत्साहन मिळेल यासाठी सार्वजनिक रोजगार योजना आवश्यक आहे.

**५ . अनौपचारिक क्षेत्रातील वेतनधारक कर्मचाऱ्यांसाठी धोरणाची गरज :** महाराष्ट्रातील रोजंदारीवरील कामगारांपैकी २६ टक्के कामगार नियमित वेतनधारक आहेत. सन २०१२ मध्ये एकूण नियमित वेतनधारकांपैकी ४२ टक्के कामगार अनौपचारिक क्षेत्रातील होते. परंतु अनुसूचित जातीमधील अनौपचारिक क्षेत्रातील कामगारांचे प्रमाण ६१ टक्के होते. उच्चवर्गीयांमध्ये मात्र हे प्रमाण ५३ टक्के होते. कामाची असुरक्षितता, कमी रोजगार आणि सामाजिक संरक्षणाचा अभाव यामुळे अनौपचारिक क्षेत्रातील कामगार अधिक गरीब असतात. म्हणून सरकारी आणि खाजगी, अशा दोन्ही क्षेत्रातील अनौपचारिक क्षेत्रातील कामाच्या सुरक्षिततेत, रोजंदारीत आणि सामाजिक सुरक्षिततेत सुधारणा करण्याची गरज आहे.

**६. हंगामी नोकऱ्यांमध्ये आरक्षण हवे :** सरकारी नोकऱ्यांमधील हंगामी कामगारांसाठी नोकऱ्यांमध्ये आरक्षण नाही महाराष्ट्रातील एकूण सरकारी नोकऱ्यांमधील सुमारे ३२ टक्के नोकऱ्या हंगामी आहेत. (कराराशिवाय व एक वर्षाच्या कराराने) सन २०१२ मध्ये एकूण २९,२५,५५९ सरकारी कर्मचारी होते. त्यांच्यापैकी ९,३९,६८० कर्मचारी हंगामी होते. अनुसूचित जाती, जमाती व ओबीसीमधील आरक्षणांतर्गत नोकऱ्या गमावण्याचे नुकसान ४,६९,८४० तात्पुरत्या स्वरूपातील नेमणुकांमध्ये झाले होते. (यात १,५०,३४८ अनुसूचित जाती, ८४,५७१ अनुसूचित जमाती आणि २,३४,९१९ ओबीसी होते.. म्हणून हंगामी नोकऱ्यांमध्ये आरक्षणाची तरतूद केली जावी.

**७. खाजगी नोकऱ्यांमध्ये योग्य प्रतिनिधित्व मिळावे :** खाजगी क्षेत्रातील उद्योगांमध्ये आणि खाजगी शैक्षणिक संस्थांमध्ये असलेल्या विशिष्ट गटवारीतील नियमित वेतनाच्या नोकऱ्यांमध्येही न्याय्य वाटा मिळावा. सरकारी क्षेत्राने अनुसूचित जाती व जमातींना खाजगी क्षेत्रात काही निवडक नोकऱ्या मिळण्यासाठी धोरण आखावे. सध्या काही क्षेत्रात त्यांचे कमी प्रतिनिधीत्व आहे. खाजगी क्षेत्राचे सध्याचे सकारात्मक कृती धोरण स्वेच्छेचे आणि स्वयंनियंत्रित आहे. सरकारने समान संधी कार्यालय स्थापन करून खाजगी क्षेत्राच्या सकारात्मक कृती धोरणाच्या प्रगतीवर लक्ष ठेवावे. ●●●



# २०१९ आणि बाबासाहेबांची सत्तासंकल्पना...



यशवंत मनोहर

भारताच्या इतिहासात २०१९ ची निवडणूक आजवरच्या सर्वच निवडणुकीपेक्षा फार वेगळी आणि निणयिक असणार आहे. एका अर्थी हे मूल्ययुदच असेल . भारताचे संविधान हा सर्वांच्याच कल्याणाचा प्रकल्प आहे . हा प्रकल्प सर्वाना समसमान भारतीय नागरिक मानतो . कोणाला परके मानीत नाही . सर्वांनाच आपले मानतो . । संविधान नागरिकांमधली विविधता मानते . पण या विविधतेला विषमता मानीत नाही . संविधानाच्या संपूर्ण संरचनेत परका असा शब्दच नाही . संविधान ही परस्परसदभावावर आधारलेली कुटंबरचना आहे . सामंजस्य हा या कुटुंबाचा पाया आहे . शोषणरहित , विषमतारहित , लिंगभेदरहित , वर्गरहित , जातीरहित अशी या राष्ट्रकुटुंबाची मांडणी बाबासाहेबांनी केली आहे . संविधानाच्या काळजावर भारतातील प्रत्येक स्त्रीचे नाव छापले आहे . आदिवासी , भटके विमुक्त , ओबीसी , मराठा , ब्राह्मण , मुस्लिम , शिख , ख्रिश्चन , बौद्ध अशा सर्वच लोकसमूहातील सर्वच माणसांची नावे संविधानाच्या काळजावर छापलेली आहेत . संविधान प्रत्येकच भारतीयाचे आहे . प्रत्येकच भारतीय माणसाला संविधान स्वातंत्र्याची , समतेची , बंधुतेची आणि निर्भयतेची हमी देते . प्रत्येक नागरिकाला समान मानवी सन्मान देण्यासाठीच संविधान जन्माला आले आहे . इथल्या सामान्य माणसाला आपल्या संविधानाने देशाचे अधिनायक होण्याचा मार्ग तत्त्वतः तयार करून दिला आहे , असे बाबासाहेबांनी लिहून ठेवले आहे . याचा अर्थ सर्वसामान्य लोक देशाचे सत्ताधारी व्हावेत , जे इतिहासभर केवळ प्रजा होते त्यांच्या हातात देशाची सूत्रे जावीत आणि लोकशाही ख - या अर्थाने लोकशाही ठरावी वा प्रजातंत्र खन्या अर्थाने प्रजातंत्र ठरावे हे बाबासाहेबांचे लाडके स्वप्न होते .

सर्व समद : खींनी एकत्र यावे , हे त्यांचे एकीकरणच त्यांना सत्ताकेंद्राची सनद देईल . फक्त या शोषितपीडितांनी एकत्र यावे . या रंजल्यागांजल्यांनी एकत्र यावे . एकत्र आल्याशिवाय त्यांना सत्ताकेंद्रे ताब्यात घेता येणार नाहीत . मी प्रकाशमार्ग तयार करून दिला असला तरी त्यावरून हे उपेक्षित गेलेच नाहीत तर त्या प्रकाशमार्गाचा उपयोग काय ? हे सर्व छोटे छोटे गट वेगवेगळे राहिले तर ते सपर्यंत जाऊच शकत नाहीत . या सर्वच उपेक्षितांनी परस्परांशी संबंध नसलेल्या समुद्रातील बेटांप्रमाणे राहू नये । हे त्यांचे परस्परांपासून फटकून राहणे हेच त्यांच्या सत्तावचिततेचे कारण ठरू शकते . हे सर्व लोकसमूह छोटे आहेत पण ते एकत्र आले तर महासमूह होतात आणि महासमूह म्हणजे मतदारांचा महासागर । । मतांची महाबँक ! बाबासाहेबांनी या सर्वच सर्वहारांना शासनसत्ता हस्तगत करण्याचे पद्धतीशास्त्र दिले . यांच्या सामाजिक आणि आर्थिक स्वातंत्र्याची हमी दिली . तुम्ही सर्व एकीकरणाची किल्ली लावा , सत्तेचे दार



तुमच्यासाठी उघडतेच असे बाबासाहेबांचे आश्वासन या सर्व छोटया बेटांना आहे . सर्व बेटांनी एकत्र यावे . त्यांचा एक महाभूखंड होतो . या एकसंध भारतीयत्वाची गरज आहे . भारतीयत्वाचा खरा अर्थ या प्रक्रियेतून प्रकाशित होईल . ओबीसी , मराठा , आदिवासी , भटके विमुक्त , मुस्लिम , स्त्रिया , बौद , ख्रिश्चन या सर्वांनीच हे लक्षात घ्यायला हवे की तुम्ही स्वतःहून परस्परांपासून वेगळे झाला नाहीत वा वेगवेगळ्या सामाजिक आणि आर्थिक श्रेण्यांमध्ये बंदिस्त झाला नाहीत . तुम्हा सर्वांनाच परस्परांमध्ये भांडत ठेवणारी एक यंत्रणा इथे कार्यरत आहे . तुम्ही या यंत्रणेची शिकार आहात . तुम्ही दुय्यम होणे पसंत करता , सत्तावंचित होणे तुम्ही मान्य करता , तुमच्यावर होणारे अत्याचार तुम्ही धर्माच्या शिकवणीनुसार पवित्र मानता , जातीचे पावित्र्य जातीय अहंकारांमुळे येते . आपण सर्वच याप्रकारे परस्परांपासून वेगळे राहून नष्ट होणे , निरर्थक होणे वा केंद्रवंचित होणे पत्करतो पण धर्म आणि जाती सोडत नाही . हा तुम्हाला दुर्बल करणारांचा , तुम्हाला दास करणारांचा तुम्ही केलेला सन्मानच असतो . बाबासाहेब तुम्हाला सत्तेकडे जाण्याची वाट देतात , पण जातींच्या जातीनायकांच्या , धर्माच्या आणि आपल्याला गुलाम करणारांच्या हितांच्या संस्कारांच्या अस्मिता सोडत नाहीत . वरील सर्वच गटांना त्यामुळे एकत्र येता येत नाही आणि सत्ताकेंद्रे हस्तगत करता येत नाहीत . । असे होते त्याला कारण हे आहे की मराठा , ओबीसी , मुस्लिम , ख्रिश्चन , बौद्ध , शीख , जैन , आदिवासी , भटके विमुक्त आणि सर्व स्त्रियांना संविधान प्रकर्षाने आपले उद्धारक वाटले नाही . यातील बहुतेक लोक प्रत्यक्ष वागण्यातूनही संविधानमय झालेले आहेत असे म्हणता येत नाही . हे समूह आणि त्यातील बहुतांश लोकांच्या वागण्यातून धर्म मात्र सतत प्रकट होत राहतो , संविधानसाक्षरता प्रखर झाली असती तर वरील सर्वच समूहातील माणसे धर्म आणि जाती फेकून भारतीय झाली असती . संविधानाला डोक्यात आणि वागण्यातही घेतले गेले असते . असे झाले असते तर आपले स्वातंत्र्य म्हणजे काय वा मनुष्यत्वाचे संवर्धन म्हणजे काय वा गुलामी म्हणजे काय हे त्यांना कळले असते . मुखात मुक्तीचा विचार आणि वर्तनातून गुलामीचा आविष्कार असे अनेकांच्या बाबतीत घडते तसे घडले नसते . इकडे फुले , शाहू , आंबेडकरांचे नावही घ्यायचे आणि श्रेण्या कायम ठेवणाच्या धर्मालाही पवित्र मानायचे हा मूलभूत अंतर्विरोध लोकांच्या वागण्या – बोलण्यात दिसतो . १९५० नंतरच्या काळात वरील सर्वच समूहांच्या मनांचे पुनर्वसन होऊ शकले नाही . त्यामुळे संविधानाचा स्वीकार अमूर्त राहिला आणि वर्तनातून संविधानपूर्व भूतकाळ मूर्त होत राहिला , देशात संविधानपूर्व संस्कारांची पुनर्रचना व्हायला हवी होती . संस्कारांची वजाबाकी झाली नाही तर मने नव्या बदलांचे स्वागत करीत नाहीत . उलट विरोध करतात . आपल्याकडे तसे झालेले आहे . । संस्कारांची पुनर्रचना म्हणजे मनांची पुनर्रचना , मनांची पुनर्रचना म्हणजे वागण्याबोलण्याची पुनर्रचा वर्चस्वी गट आणि वंचित गट यांच्यातील संबंधांची पुनर्रचना व्हायला हवी होती . जुन्या धारि उत्सवांच्या , रीतीरिवाजांचा तुरुंगांमधून माणसांना बाहेर काढण्याचे कार्य व्हायला हवे होते पण ते झ नाही . हे झाले नसल्याने स्थितिवादाचे भक्कमीकरण अधिकाधिक उत्साहाने होत राहिले आणि संविध या मनांची दारे ठोठावीत , दारावरच ताटकळत राहिले . त्यामुळेच देशातील वंचितांना सत्तावंचित राहून अन्यायाची शिकार व्हावे लागते . हे लोक परा पत्करतात . पण गुलामीमुक्त होण्यासाठी एकत्र येऊन सत्ताधारी होत नाहीत . सत्तेपासून दूर राहण्य सवय त्यांना परवाना असूनही सत्तेकडे जाऊ देत नाही .



। । त्यांच्या परस्परांपासून दूर राहण्याच्या सवयी जातींनी आणि धर्मानी नियंत्रित केलेल्या आहेत . त्या ते अलग राहण्यासाठी निमित्ते शोधतात . जात , धर्म , पक्ष , जातीची मोठी माणसे अशा अस्मितांनी आत परस्परांपासून वेगवेगळी राहतात . ही सवय शोषकांच्या , वर्चस्ववाद्यांच्या फार सोयीची आहे . या स वंचितांना संस्कारांचीच सवय झालेली आहे . या सवयी बदलता येतात . हे संस्कार मनातून वजा करता येतात . डीएनएचा वा जनुकांचा विघातक भाग नष्ट करता येतो हे या लोकांना माहीतच नाही . त्यामुळे ही सवय या लोकांना भूतकाळाच्या दलदलीतून बाहेर येऊ देत नाही . त्यामुळेच या लोकांचा हट्टी भूतकाळ कोणताही वर्तमान मान्यच करीत नाही . या संस्कारांची गाठोडी निरुपद्रवी नाहीत . या संस्कारांच्या पोटी भांडणे जन्माला येतात आणि समाजात समता निर्माण होऊ देत नाहीत . । बाबासाहेबांचे तत्त्वज्ञान विघातक डीएनएच्या आणि जनुकांच्या म्हणजे जातीप्रवर्तक संस्कारांच्या निर्मूलनाचे तत्त्वज्ञान आहे . संविधानात हेच तत्त्वज्ञान आहे . आज देशात भयंकर अराजकाची स्थिती निर्माण झालेली आहे . स्त्रिया , मुस्लिम , बौद्ध , ख्रिश्चन अशा सर्वांवरच अत्याचार होत आहे . शेतक – यांची , तरुण पिढीची , परिवर्तनाच्या चळवळींची अतोनात दुर्दशा झालेली आहे . हजारो कोटी रुपये घेऊन परदेशात पळणारे कितीतरी सन्माननीय आणि सुरक्षित दरोडेखोर या देशात आहेत . देशातील शेकडो मंदिरात हजारो कोटींची मालमत्ता आहे . सत्ताधा – यांचा परदेशात जाण्याचा खर्च हजारो कोटींच्या घरातच मोजावा लागतो . सर्वत्रच महागाईच्या वणव्याची आग लागलेली आहे . दरोडेखोरांनी गरिबांचे पैसे लंपास करावेत आणि शासनाने गरिबांकडून नानाप्रकारांनी पुन्हा ते वसूल करावेत , याप्रकारे दरोडेखोरांची , भ्रष्टाचाऱ्यांची आणि भांडवलदारांची सोय करावी असे चाललेले आहे . या अभावाच्या आणि अनागोंदीच्या आगीत सामान्य माणसे जळतात पण एकत्र येऊन सत्ता हातात घेत नाहीत . । डॉ . बाबासाहेबांना हे सर्व वेगवेगळ्या संदर्भातले वंचित , अन्यायग्रस्त , दुय्यम आणि नागवलेले लोक एकत्र यावेत आणि त्यांनी सत्ता हस्तगत करावी असे मनापासून वाटत होते . सर्व छोटे राजकीय पक्ष , सर्व परिवर्तनवादी सामाजिक संस्था , ओबीसी , मुस्लिम , आदिवासी , भटके विमुक्त , स्त्रिया , ख्रिश्चन , शीख , जैन असे सर्व सामाजिक लोकसमूह एकत्र आले तर हे सर्वच बहुसंख्य होतात आणि सत्तेचे मालक होतात . असे झाले तर हे सर्वच लोक सन्मानाचे , न्यायाचे , विकासाचे , समतेचे धनी होऊ शकतात . संविधान वाचवण्यासाठी तुम्ही संविधान वाचवायचे नाही तर स्वत : चा सन्मान , स्वतःचे भारतीय नागरिकत्व आणि स्वत : चे समतामूल्य वाचविण्यासाठी वाचवायचे आहे . लोकशाही वाचविण्यासाठी नव्हे तर स्वत : ला वाचविण्यासाठी लोकशाही वाचवायची आहे. समाजवाद वाचवण्यासाठी समाजवाद । वाचवायचा नाही तर स्वतःचे मानवी अस्तित्व स्वतंत्र ठेवण्यासाठी आणि त्याची शान वाढवण्यासाठी वाचवायचा आहे . । डॉ . बाबासाहेब आंबेडकरांची ही सत्तासंकल्पना आहे . सत्ताधारी होण्याचा हा आंबेडकरी प्रबंध आहे . २०१९ साली हा प्रबंध आपण सर्वांनीच विजयी केला नाही तर आपले वाळवंट झालेलेच आपल्याला पाहावे लागेल . आता परिवर्तनवादी मारले जात आहेत पुढे परिवर्तनच मुळासकट मारले जाईल , ही । वेळ येऊ नये यासाठी बाबासाहेब म्हणतात त्याप्रमाणे सर्वच वंचितांनी एकत्र येऊन सत्तेचे धनी ठरावे । आणि भारताला वाचवावे . भारत वाचवणे म्हणजे सर्वसामान्यांचे आणि सर्वच वंचितांचे मानवाधिकार वाचवणे , भारताचे मानवीपण जिवंत ठेवणे होय . ●●●



# काँग्रेसने देश घडवला भाजपा सरकारमुळे लोक‑

## : ब

भारतातील लोकशाही व्यवस्था आज भाजपा व आर.एस.एस. च्या जातीयवादी भूमिकेमुळे संकटात सापडली आहे. देशातील लोकशाही टिकवून ठेवायची असेल, भारतीय संविधान टिकवून ठेवायचे असेल तर भाजपा सरकार परत सत्तेवर येता कामा नये. भाजपा सरकारच्या काळातच देशात असुहिष्णुतेचे वातावरण वाढले असून कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न गंभीर बनला आहे. सत्तेत येण्यापूर्वी नरेंद्र मोदींनी दिलेली आश्वासने न पाळता कामगार, युवक, बेरोजगारांची प्रचंड निराशा केली आहे. नरेंद्र मोदी सरकारने शेतकऱ्यांच्याही तोंडाला पाने पुसली आहेत. त्यांना खोट्या आश्वासनांच्या पलिकडे काहीही दिलेले नाही. नरेंद्र मोदी यांनी २०१४ च्या निवडणुकीत शेतकऱ्यांना दुप्पट हमीभाव देण्याचे आणि त्यांचे उत्पन्न वाढविण्याचे आश्वासन दिले होते. मात्र सरकार सत्तेवर आल्यानंतर शेतकऱ्यांना दिलेली वचने मोदी विसरून गेले. नरेंद्र मोदी सरकारने आपल्या मर्जीतील बड्या उद्योजक मित्रमंडळींचे १.१० लाख

कोटी रुपयांचे कर्ज माफ के
असलेल्या शेतकऱ्याचे कर्ज
सत्तेत असताना कायम शेतक
मोठ्या प्रमाणात मनमोहन
करून पाठबळ दिले होते.



# शाही धोक्यात!

## मल्लिकार्जून खरगे

ले; परंतु देशाचा अन्नदाता
माफ केले नाही. काँग्रेसने
ऱ्यांची बाजू घेतली. त्यांना
सिंग सरकारने कर्जमाफी
५ वर्षात मोदी सरकारने

मात्र केवळ आश्वासन देण्याच्या पलिकडे काहीच केले नाही. पंतप्रधान फसल योजना ही अत्यंत फसवी व दिशाभूल करणारी योजना असल्याचे दिसून आले आहे. २०१७-१८ या वर्षात ८० लाख शेतकऱ्यांनी या योजनेतून माघार घेतली. सरकारने शेतकऱ्यांची योजना राबवतानाही बड्या उद्योगपतींची काळजी घेत त्यांना नफा मिळवून दिला आहे. २०१६-१७ या वर्षात ज्या २८ कोटी शेतकऱ्यांनी पीक विमा काढला. त्याचदरम्यान विमा देणाऱ्या कंपनीने शेतकऱ्यांसारखे काहीच काम न करता ३८ हजार कोटी रूपयांचा विमा काढला म्हणजे सरळ सरळ १० हजार कोटी रुपये विमा कंपन्यांनी शेतकऱ्यांच्या नावाने सरकारच्या सहमतीने लाटले. मोदी सरकारने कायम आपल्या उद्योगपती मित्रांची काळजी घेण्यासाठी नवनव्या योजना आणून त्यांच्या कंपन्यांना नफा मिळवून दिला आहे. सरकारने ज्याप्रमाणे शेतकऱ्यांचा विश्वासघात केला, तसाच देशातील जनतेसोबतही केला आहे. देशाच्या संरक्षण धोरणात हस्तक्षेप करत देशातील नामवंत अशा एस.ए.एल. कंपनीवर अविश्वास दाखवत राफेल विमान खरेदीचे कंत्राट साधा खिळा तयार करण्याचाही अनुभव नसलेल्या अनिल अंबानीच्या कंपनीला देऊन त्यांचा नफा वाढवला. काँग्रेस पक्षासह अनेकांनी यासंबंधीच्या चौकशीची मागणी केली. संयुक्त संसदीय समिती स्थापन करण्यासाठी संसदेत सतत आवाज उठवला. तरी त्याकडे दुर्लक्ष करून सरकारने आपला भ्रष्टाचार लपवण्याचा प्रयत्न केला.

जी.एस.टी. सारख्या करप्रणालीवर काही ठोस विचारविनिमय न करता मनमानी कर आकारला. ज्यामुळे देशातील छोट्या व्यापाऱ्यांचा व्यापार ठप्प झाला, त्यांचे एक्सपोर्ट बंद झाले, कामगारांचे हाल झाले. जी.एस.टी. कमी करण्याची मागणी झाली की, जिथे जिथे निवडणुका असतील तिथे जी.एस.टी. कर कमी केला. आधी वाढवणे व मतांवर डोळा ठेऊन जी.एस.टी. कमी करणे असे उद्योग मोदी सरकारने केले. ज्यामुळे व्यापारी वर्ग त्यांच्या पूर्णपणे विरोधात गेला आहे. आंतरराष्ट्रीय बाजारात पेट्रोलचे दर कमी झाले असतानाही मोदी सरकारने जनतेकडून १० लाख कोटी रूपये अतिरिक्त जमा केले. पेट्रोलचे दर कमी केले नाहीत. उलट ते सातत्याने वाढते ठेवले.

नोटाबंदीचा निर्णय घेऊन त्यांनी कोट्यवधी तरूणांना बेरोजगार केले, महिलांना बेरोजगार केले. त्यांनी आयुष्यभर कष्टाने जमवलेले पैसे पळवले. मोदींनी रातोरात नोटाबंदीची घोषणा करून देशाची संपूर्ण अर्थव्यवस्था उद्ध्वस्त केली होती, ज्यातून देश आजही सावरलेला नाही. देशातीन नामवंत अर्थशास्त्रज्ञ अमर्त्य सेन, मनमोहन सिंग, रघुराम राजन यांनी या नोटाबंदीवर टीका केली. रघुराम राजन यांनी तर रिझर्व्ह बँकेच्या कारभारातील सरकारच्या हस्तक्षेपाला कंटाळून राजीनामा दिला. नोटाबंदीनंतर सर्वसामान्य गरीब लोक, शेतकरी, छोट्या व्यापाऱ्यांना आपल्या हक्कांच्या पैशासाठी रांगेत उभे राहावे लागले होते. मोदींचे मित्र, श्रीमंत वर्ग मात्र खूश होता. कारण त्यांच्यावर याचा काहीच परिणाम झाला नाही. नोटाबंदीच्या काळात मोदींच्या मित्रांना, बँक अधिकाऱ्यांच्या मित्रांना मात्र हवे तितके पैसे मिळत होते. नोटाबंदीमुळे बेरोजगारी वाढली. मोदींनी सत्तेत येण्यापूर्वी तरूणांना चांगल्या शब्दात नोकरी, रोजगार मिळवून देण्याची खोटी आश्वासने दिली. वर्षाला २ कोटी नोकऱ्या देऊ असे सांगितले होते. मात्र प्रत्यक्षात त्यांच्यासाठी काहीच केले नाही. उलट आहे त्या नोकऱ्या संपुष्टात आणल्या. काँग्रेसच्या सत्ताकाळात जी बेरोजगारी २०११-१२ ला ३.८ टक्के होती, ती भाजपाने कमी करण्याऐवजी २०१७-१८ मध्ये ६.१ टक्के इतकी वाढवली. ग्रामीण भागात काँग्रेसच्या काळात २०११-१२ मध्ये ५.१ टक्के होती ती भाजपच्या सत्ताकाळात २०१७-१८ मध्ये १७.४ टक्के इतकी वाढली आहे. हेच महिला बेरोजगारांचे प्रमाण २०११-१२ मध्ये ४.८ टक्के काँग्रेसच्यावेळी होते. २०१७-१८ मध्ये भाजपाच्या काळात १३.६ टक्के इतके वाढले आहे. एका बाजूला प्रचंड बेरोजगारी असताना मोदी सरकारच्या काळातच सरकारी नोकऱ्यात मोठ्या प्रमाणात रिक्त जागा राहिल्या. २ लाख ५० हजार नोकऱ्या रेल्वे, १६००० नोकऱ्या केंद्रीय विद्यापीठे, १६,००० नोकऱ्या आकाशवाणी आणि दूरदर्शन, ५५,००० पोस्ट खात्यातील तर राखीव प्रवर्गाची केंद्रातील ९,००० पदे भरली नाहीत. त्यामुळे देखील बेरोजगारीत मोठ्या प्रमाणावर वाढ झालेली



आहे. सरकारने उच्चवर्गीयांसह सर्वांना आरक्षण मिळावे म्हणून १० टक्के आरक्षण आणले. काँग्रेस पक्षानेदेखील याचे स्वागत केले; परंतु मी संसदेत बोलताना एससी/एसटी प्रवर्गातील आरक्षित पोस्ट घटल्याचे सांगितले होते, त्याकडे दुर्लक्ष केले. सरकार एका बाजूला सर्वांना आरक्षण देत आहे. दुसरीकडे, संविधानाने एससी/एसटी व अन्य मागासवर्गीयांना दिलेले आरक्षण रद्द करत आहे. हे अत्यंत निषेधार्ह आहे. मोदींच्या मंत्रिमंडळातील मंत्री असलेल्या जावडेकरांनी निवडणुकीपूर्वीच विद्यापीठातील आरक्षण २०० पॉईंटवरून १३ पॉईंटवर आणले. त्यामुळे लाखो मागासवर्गीयांचे आरक्षण संपुष्टात आले आहे. नरेंद्र मोदी जे ठरवतात तेच करतात. पाच वर्षे देशाचा कारभार करत असताना त्यांनी हेच केले आहे. स्वतःच्या सोईचे निर्णय घेऊन, कायदे करून त्यांनी मनमानी राज्य केले, ज्यामुळे देशातील तरूणांच्या, देशाच्या विकासाची, प्रगतीची स्वप्नं भंगली आहेत.

आज देश त्यातही तरूण वर्ग सरकारच्या चुकीच्या धोरणामुळे मोठ्या आर्थिक व बेरोजगारीच्या संकटात सापडला आहे. सरकारने संवैधानिक संस्था तोडण्याचे काम केल्यामुळे जातीवाद, धर्मवाद उफाळला आहे. सामाजिक सलोखा कमी झाला आहे. मॉब लिचिंग वाढले आहे. लोकशाही व्यवस्था अस्वस्थ झाली आहे. ज्या तरूणांना रोजगार, नोकरी देतो म्हणून संभ्रमात पाडले ते आज निराश झालेले आहेत. सरकारने खोटी आकडेमोड करून (जी.डी.पी.) विकास दर वाढवून दाखवण्याचा प्रयत्न केला तेव्हा धक्कादायक आकडेवारी समोर आली. ज्या काँग्रेसने आपल्या सत्ताकाळात २००४ ला ९.६ टक्के इतकी जी.डी.पी.त वाढ केली, तोच जी.डी.पी. दर मोदी सरकारने सर्वात खाली आणला आहे. २०१७-१८ मध्ये ७.५ टक्क्यांच्या आसपास असणारी जी.डी.पी. वृद्धी सरकारने आकडेमोड करून, वाढवून, चढवून ८ टक्के असल्याचे देशाला सांगण्याचा प्रयत्न केला. त्यांचा तो खोटेपणा पुढे उघड झाला. सरकार म्हणते की, जी.डी.पी. वाढला तर मग बेरोजगारी का वाढत आहे? कोणी परकीय गुंतवणूक का करत नाहीत याचे उत्तर मोदी किंवा त्यांच्या सरकारमधील कोणीच देत नाहीत.

भाजपाच्या नेत्यांनी, नरेंद्र मोदी यांनी सातत्याने देशाला खोटे बोलून मते मिळवण्याचा, सत्ता मिळवण्याचा प्रयत्न केला आहे. हा देश ज्या महात्मा गांधी, पंडित जवाहरलाल नेहरू, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसारख्या महापुरूषांनी मिळून घडवला, तो देश तोडण्याचे काम भाजपाने केले आहे.

मोदींनी आजपर्यंत अनेकवेळा ७० वर्षात काँग्रेसने काय काम केले असे विचारत असतात. आता ते ७० ऐवजी ५५-६० वर आलेत. कारण त्यांना आता समजले आहे की, देशात कधी अटल बिहारी वाजपेयी व इतरांची सुद्धा थोडक्या काळासाठी सत्ता होती. आता ६० वर्षांत काँग्रेसने काय काम केले असे विचारतात. पण ते हे विसरतात की, हा देश काँग्रेसच्या नेत्यांनी बलिदान देऊन एकसंध ठेवला आहे. स्वाभीमानी व स्वावलंबी बनवला आहे. देशाच्या स्वातंत्र्यानंतर ज्या देशात अन्नाचा एक कण नव्हता तो देश काँग्रेसच्या सरकारमुळेच हरितक्रांतीचे स्वप्नं पूर्ण करू शकला. आज तो अन्नधान्याने परिपूर्ण आहे.

ज्या देशाची साक्षरता १९५१ ला केवळ १६ टक्के होती. तोच देश काँग्रेसच्या धोरणामुळे २०१४ पर्यंत साक्षरतेचे प्रमाण १६ टक्क्यांवरून ७४ टक्क्यांवर घेऊन गेला.

ज्या देशात १९५१ ला केवळ ५०० महाविद्यालये होती. त्याच देशात काँग्रेसच्या सत्ताकाळात २०१४ पर्यंत ३७,००० महाविद्यालये निर्माण झाली. आजचे जे मोदींच्या सोबत राजकारणी आहेत, त्यांच्या मंत्रिमंडळातील लोक आहेत, खासदार आहेत ते सर्व काँग्रेसच्या काळात निर्माण झालेल्या महाविद्यालयात शिकलेले आहेत. हे ही भाजपावाले विसरले आहेत. मोदी सतत म्हणतात की, काँग्रेसने काय केले. पण मोदी हे विसरले की, ज्या देशात १९५१ ला व्यक्तीचे आयुर्मान २५ वर्षे होते तेच २०१४ मध्ये ७० वर्षे झाले. बाल मृत्यूदर एक हजारामागे १६५ होता, तो २०१४ मध्ये ३८ पर्यंत खाली आला. ज्या कृषी योजनांवर मोदी भाषणे ठोकतात तो देश हरितक्रांतीकडे काँग्रेसनेच नेला. १९४७-५१ मध्ये २२ मिलियन हेक्टर जलसिंचन होते ते २०१४ मध्ये ६८ मिलियन हेक्टर इतके झाले आहे. १९४७-५१ मध्ये ५० मिलियन टन अन्नधान्य उत्पादीत केले जायचे, जे २०१४ मध्ये १३८ मिलियन टन इतके घेतले गेले. ज्या देशात दूधाविना मुलं दगावायची, त्या देशात १९४७-५१ दरम्यान केवळ १७ मिलियन दूध निर्माण होत होते, ते २०१४ मध्ये १३८ मिलियन टन इतके होते. ज्या देशात १९४७ साली केवळ ४ लाख किलोमीटर रस्ते होते ते काँग्रेसने ५४ लाख किलोमीटर इतके केले. रेल्वेमार्ग ५४ हजार किलोमीटर होता, २०१४ ला ६५ हजार किलोमीटरपर्यंत आम्ही वाढवला. यावरून काँग्रेसने देशासाठी काय केले याचा अंदाज येईल.

देशाच्या विकासासाठी पंचवार्षिक योजना पंडित नेहरूंनी आणली. भाक्रानांगल, हिराकुंड, नागार्जुन हे प्रकल्प काँग्रेसने उभारले. देशातील सर्वात मोठी धरणे, मोठे प्रकल्प, उद्योगधंदे काँग्रेसच्या काळात झाले. रोजगार निर्मितीसाठी पब्लिक सेक्टर,



एरॉनॉटिक इंजिनिअरिंग आणलं. भारत इलेक्ट्रीकल यासारख्या संस्था काँग्रेसने उभारल्या, देशाच्या सैन्याला ताकद दिली, स्वातंत्र्य दिले. त्यात हस्तक्षेप केला नाही. त्याचे राजकारण केले नाही. परमाणू परीक्षण काँग्रेसने केले. अनेक सॅटेलाईट अंतराळात सोडले. हे सर्व भाजपावाले विसरले आहेत. त्यांनी फक्त खोटी जुमलेबाजी करून सत्ता मिळवली आणि ज्या काँग्रेस सरकारने प्रचंड विचारविनिमय करून देशहितासाठी योजना आखल्या त्या योजनांची केवळ नावे या सरकारने बदलली असून स्वतःची अशी काही नवनिर्मिती या सरकारला करता आलेली नाही. हे सरकार म्हणजे केवळ नामबदलू सरकार राहिलेले आहे.

काँग्रेसने बेसिक सेव्हिंग बँक योजना आणली तर मोदींनी प्रधानमंत्री जनधन योजना आणली. काँग्रेसने निर्मल भारत अभियान आणले तर मोदींनी स्वच्छ भारत अभियान आणले. काँग्रेसने राजीव गांधी आवास योजना आणली तर मोदींनी सरदार पटेल नॅशनल अर्बन हौसिंग आणले. काँग्रेसने इंदिरा गांधी आवास तर मोदींनी प्रधानमंत्री आवास योजना आणली. काँग्रेसने राजीव गांधी विद्युत योजना आणली तर मोदींनी दीनदयाल उपाध्याय ग्रामयोजना आणली. काँग्रेसने राष्ट्रीय कृषी विकास योजना तर मोदींनी परंपरागत कृषी योजना आणली. काँग्रेसने नॅशनल स्किल डेव्हलपमेंट तर मोदींनी स्किल डेव्हलपमेंट अशी योजना आणली. काँग्रेसने ज्या उद्देशाने योजना आणल्या व त्यांची अंमलबजावणी केली. मोदी सरकारने मात्र त्या योजनांची नावे बदलून जाहिरात करून घेतली आहे. काम काहीच केलेले नाही.

भाजपा सरकारने काँग्रेसने उभारलेल्या बहुतांश संस्था मोडकळीस आणल्या आहेत. त्यांच्यावर प्रचंड दबाव टाकून त्यांचे स्वातंत्र्य हिरावून घेतले आहे. नियोजन आयोग रद्द करून नीती आयोग निर्माण केला व त्याला वित्त मंत्रालयाचा एक हिस्सा बनवला आहे. त्याचे कोणी ऐकत नाही. सीबीआय, आरबीआय, ईडी, आयबी, सीव्हीव्ही यांसारख्या संस्थांचे स्वातंत्र्य काढून घेतले आहे. त्यांना सोईनुसार वापरले जात आहे. आज देशात गरीब, दलित व अल्पसंख्याक असुरक्षित आहेत. कधी मुस्लिमांना गाईवरून तर कधी कोणी दलित मंदिरात जातो म्हणून, लग्नात घोड्यावर बसतो म्हणून प्रस्थापितांच्या, विश्व हिंदू परिषदेच्या कार्यकर्त्यांच्या अन्यायाचा बळी ठरले आहेत. काँग्रेसच्या काळात असे काहीही घडत नव्हते. काँग्रेसने कधीच अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर बंधने घातली नाहीत. कोणाचे नुकसान केले नाही. काँग्रेसच्या नेत्यांनी बलिदानाने देश एकसंध ठेवला. देशाची लोकशाही वाचवली. देशात अन्नधान्य, शस्त्र, उद्योग, पाणी, वीज, विद्या निर्माण केली. लोकशाही, संविधान वाचवले. आज ते सर्व भाजपामुळे संकटात सापडले आहे. इथल्या लोकशाहीव्यवस्था आणि संवैधानिक संस्थांना संकटातून बाहेर काढण्यासाठी, देश वाचवण्यासाठी भाजपाला सत्तेबाहेर काढून काँग्रेसच्या हाती सत्ता देणे देशहिताचे ठरणार आहे. भाजपाने सत्ता प्राप्तीनंतर भारतीय लोकशाहीवर हल्ला चढवला आहे. डॉ. बाबसाहेब आंबेडकरांनी संविधान सभेत बोलताना संविधान कितीही चांगले असले तरी राबवणारे लोक चुकीचे असतील तर संविधान मोडकळीस आणतील, असे विधान केले होते. त्याचा प्रत्यय भाजपाच्या हाती सत्ता गेल्यानंतर आला आहे. देश वाचवायचा असेल, एकसंध ठेवायचा असेल तर भाजपा सत्तेवरून पायउतार होणे हाच पर्याय आहे. भारतीय लोक काँग्रेसला सत्तेवर बसवतील हा विश्वास आहे. ▪ **शब्दांकन : चेतन शिंदे**

# लोकशाहीचे मारेकरी





ज.वि. पवार

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय समाजव्यवस्थेचा ढाचा उद्ध्वस्त करण्यासाठी अनेक प्रकारचे जनलढे उभारले. त्या सगळ्यांचा उद्देश जगभर अस्तित्वात असलेल्या समाजव्यवस्थेप्रमाणेच भारतासाठी वर्णविहीन अन् वर्गविहीन समाजव्यवस्था अस्तित्वात यावी, हा होता. ही व्यवस्था तथागत गौतम बुद्धांच्या काळात अस्तित्वात होती. केळुसकर गुरुजींनी त्यांना भेट दिलेल्या गौतम बुद्धांच्या चरित्रामुळे डॉ. बाबासाहेब विचलीत झाले होते; परंतु पाश्चिमात्य देशात शिक्षण घेत असताना त्यांनी अनुभवलेली समता त्यांच्या हृदयाचा ठाव घेणारी ठरली. परदेशातील माणसे एकमेकांना घट्ट अलिंगन देतात तर माझ्या देशातील लोक सावलीलासुद्धा घाबरतात. ही प्रचंड दरी त्यांना अस्वस्थ करीत होती. बुद्धाच्या काळात जी व्यवस्था समताधिष्ठित होती, त्यामुळे तत्कालीन समाज प्रगल्भ झाला होता. आजसुद्धा जे बुद्धानुयायी आहेत तेच देश प्रगत आहेत. भारत हा अप्रगत देश आहे, तो किमान प्रगतीशील तरी व्हावा अशी डॉ. बाबासाहेबांची इच्छा होती. सगळा समाज एकसंध आणि एक विचाराधिष्ठित असला तरच तो प्रगतीशील होऊ शकतो. बुद्धकालीन समाजव्यवस्थेत स्त्री-पुरूष हा वाद नव्हताच; उलट इथे अहंगंड नसल्यामुळे ज्ञानशाखा बहरल्या. अनेक विद्यापीठे निर्माण झाली. जातीय उच्चनीचता नव्हती, माणूस हाच केंद्रबिंदू होता. तुच्छतेला थारा नव्हता. बौद्ध हा धम्म होता तोपर्यंत समाजव्यवस्था सर्वस्पर्शी व सर्वोत्कृष्ट होती. बौद्ध धम्माची अधोगती होऊन त्याला धर्माचे स्वरूप आल्यानंतर हिंदुत्वाने उसळी मारली आणि मग बुद्धतत्त्वज्ञान परागंदा झाले. तसे पाहता कोणतेही तत्त्वज्ञान कधीही आपल्या विचारधारेपासून विचलीत होत नाही. त्याच्या बाह्यांगाला विरोध केला जातो व त्याचे पर्यावसान धर्माच्या अधोगतीस कारणीभूत ठरते. बौद्ध धर्माचे तसेच झाले; त्यामुळे अस्तित्वात असलेली घडी विस्कटली, इतकी की, अखेर भारतातून बौद्ध धर्मच तडीपार करण्यात आला. पूर्व भारतातील बौद्धांचे अल्पसंख्याबळ पाहिले तर भारतात कधी काळी बौद्ध संस्कृती नांदत होती, हे संशोधनापुरते उरले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना बुद्ध तत्त्वज्ञानाने झपाटले होते आणि म्हणूनच बुद्धकालीन समाजव्यवस्था पुन्हा एकदा भारतात अस्तित्वात आणण्यासाठी कार्यरत झाले हे त्यांच्या अनेकविध कार्यक्रमांमुळे उमजते. बुद्धाच्या काळात जातीप्रथा नव्हती, परस्परांमध्ये विद्वेष नव्हता. समता, स्वातंत्र्य आणि बंधुता ही तत्त्वत्रयी अस्तित्वात होती. बाबासाहेबांना तिचीच पुनर्स्थापना करायची होती. त्यासाठी बुद्धतत्त्वज्ञानाकडे वळण्याशिवाय त्यांच्यासमोर दुसरा पर्याय नव्हता. हजारो वर्षांची परंपरा नष्ट करण्याची ऐतिहासिक जबाबदारी त्यांच्या शिरावर येऊन पडली. बाबासाहेबांना जे अभिप्रेत होते त्याची प्रस्थापना करण्याची एकमेव संधी ही भारतीय संविधाननिर्मितीची होती. बाबासाहेबांना तर या कार्यात सहभागी व्हायचे होते; परंतु तत्कालीन राज्यकर्ते तयार नव्हते. बाबासाहेबांची संविधाननिर्मितीची क्षमता भारतीय राज्यकर्ते ओळखू शकले नाहीत. ऑस्ट्रियाचे सर आयव्हर जेनिंग यांनी ती ओळखली होती. त्यांच्याचमुळे आधी संविधाननिर्मिती, मग मसुदा समिती आणि अखेरीस मसुदा समितीच्या अध्यक्षपदी डॉ. बाबासाहेबांची नेमणूक झाली. डॉ. बाबासाहेबांनी या संधीचा पुरेपूर फायदा घेतला. त्यांनी कोठेही तथागत गौतम बुद्धाचे नाव न घेता बुद्ध तत्त्वज्ञान संविधानात अंतर्भूत केले. अगदी संविधानाचे सारतत्त्व वा प्रिॲम्बलसुद्धा तथागतांच्या विचारांचा प्रचार आणि प्रसार करणारे केले.

हे संविधान अंमलात आणायचे तर जातीचे विच्छेदन करणे महत्त्वाचे होते. भारतातील अप्रगतीला आणि मानवी संस्कृतीला अपायकारक असलेली जातीप्रथा नष्ट होत नाही तोपर्यंत देश प्रगती करू शकत नाही, हे त्यांचे ठाम मत होते. ज्या देशांचा बौद्ध हा राष्ट्रधर्म आहे त्या देशात जातीयतेचा उकीरडा नसतो. भारतात



कोणीही भारतीय राहत नाहीत, इथे हिंदू, ब्राम्हण राहतात, हिंदू-मराठा वा हिंदू-चांभार राहतात. भारतात कोणीही भारतीय नाहीत आणि म्हणून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी जाहीर केले की, मी प्रथम भारतीय आहे आणि अंतिमतःही भारतीयच आहे. पंजाबमधील भाषणात त्यांनी हीच भूमिका मांडली; परंतु जाततोडक मंडळाला हे भाषण जहाल वाटले. ते भाषण झाले नसले तरी डॉ. बाबासाहेबांनी ते प्रसिद्ध केले, ॲनिहिलेशन ऑफ कास्ट नावाच्या पुस्तकरुपाने.

या ग्रंथाला ७५ वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने या प्रक्षोभक भाषणाची उजळणी सुरू झाली. ॲड. बाळासाहेब आंबेडकर यांनी तर भारिप- बहुजन महासंघाचा कार्यक्रम ठरवून देशभर या ग्रंथावर चर्चा, व्याख्याने आयोजित केली. हा कार्यक्रम केवळ आंबेडकरी समुहापुरता मर्यादित न ठेवता तो सर्वसमावेशक कसा होईल याची काळजी घेतली. याचाच एक भाग म्हणून विदर्भ मराठी साहित्य संघाच्या नागपूर येथील सभागृहात चर्चासत्र आयोजण्यात आले. या सत्रात मी बीजभाषण केले आणि त्यानंतर अनेक विचारवंतांनी या चर्चासत्रात भाग घेतला. काही राजकीय पक्षांच्या नेत्यांनाही जाती निर्मुलनाच्या कार्यक्रमात अंतर्भूत केले. सी.पी.आय., सी.पी.एम., लाल निशाण पक्ष वगैरे पक्षांनी हा आपल्याच पक्षाचा कार्यक्रम असल्यासारखा सहभाग नोंदविला. क्रांतीपुत्र भागवत जाधव यांच्या एका स्मृती कार्यक्रमात डॉ. बाबासाहेब आंबेडकर सोर्स मटेरियल समितीचे मानद सरचिटणीस प्रा. अविनाश डोळस यांनी या ग्रंथाच्या हजारो प्रती समितीच्या वतीने काढाव्यात व अत्यंत कमी किमतीत त्या उपलब्ध करून द्याव्यात, अशी सूचना मी केली. समितीच्या बैठकीत हा विषय चर्चेला आला तेव्हा समितीच्या सदस्यांनी व प्रा. जोगेंद्र कवाडे यांनी ज.विं.ची ही सूचना अत्यंत महत्वाची आहे. म्हणून ती एकमताने स्वीकारण्यात यावी, असे सांगून या ग्रंथाचे मराठी भाषांतर प्रकाशित करण्यात आले. 'जातीचे विच्छेदन' हा विषय किती महत्त्वाचा आहे, हेच या कृतीने सिद्ध होते.

या आधी १९८८-८९ दरम्यान मंडल आयोगाच्या अंमलबजाणीचा मुद्दा उपस्थित करण्यात आला. तत्कालीन पंतप्रधान विश्वनाथ प्रताप सिंह यांनी छोट्या-छोट्या जातींना राजकीय भान आणून देण्याचे महत्त्वाचे कार्य या आयोगाच्या माध्यमातून केले. इतर मागासवर्गीयांना (ओबीसी) संविधानाच्या माध्यमातून जे फायदे होऊ शकतात ते या आयोगाने अधोरेखित केले. त्यामुळे छोट्या-छोट्या जाती एकत्र करून त्या मोठ्या करून त्यांना सत्तेत भागीदारी करता आली. महाराष्ट्रात प्रामुख्याने भारिप-बहुजन महासंघाने या आयोगाची अंमलबजावणी केल्यामुळे अकोला ह्या एका जिल्ह्यापुरती का होईना सत्तेची कवाडे उघडली. ग्रामपंचायत ते मंत्रीमंडळापर्यंत या इतर मागासवर्गीयांना सत्तेचा उपभोग घेता आला. जातीच्या आधारेच त्यांना सत्ता मिळाली. तसा हा प्रकार नवीन नव्हता. स्वातंत्र्याआधी आणि स्वातंत्र्यप्राप्तीनंतरही जातीच्या प्रबलतेवरच सत्ता मिळत होती. उदाहरणार्थ महाराष्ट्रात मराठा ही जात इतर जातींच्या मानाने बहुसंख्यांक असल्यामुळे आणि जातीच्या आधारेच मतदान होत असल्यामुळे शरद पवारांसारखे लोक सत्ताधीश झाले. जातीसाठी माती खाण्याची प्रवृत्ती बळावली.

आज महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण देशात जात हा महत्त्वाचा फॅक्टर ठरला आहे. महाराष्ट्रात शाहू-फुले-आंबेडकर यांनी इथल्या मातीत नवीन विचारांचे बीजारोपण केले. त्यामुळे किमान महाराष्ट्रत तरी जातीय विषवल्ली फोफावायला नको होती. भारतीय संविधानाने जातीयता कायद्याने निषिद्ध केली असली तरी ती नष्ट होऊ शकली नाही. उलट अलीकडे तिचा प्रभाव वाढीस लागलेला दिसतो. जात्याभिमान वाढताना दिसतो आहे. जातीप्रथेमुळे काही जातींना राजकीय फायदा होत असला तरी तो एक सामाजिक गुन्हा आहे, याचे भान कोणालाच राहिले नाही आणि म्हणूनच म्हणावे लागत आहे की, राजकीय पक्षांनी जातीप्रथा प्रबळ केली आहे, करीत आहेत. हा भारतीय संविधानाचा अवमान आहे. सामाजिक स्वातंत्र्याच्या दृष्टीने हे हानिकारक आहे. हा आंबेडकरी चळवळीचा पराभव आहे, हा आंबेडकरी विचारधारेचा पराभव आहे. आज माझ्यासारख्या सामाजिक समतेचा लढा लढणाऱ्या माणसाला एखाद्या निवडणुकीत कोणाला उमेदवारी द्यायची याचा विचार करताना प्रथम त्याच्या जातीच्या बहुसंख्याकत्वाचा विचार करावा लागतो. जातीचे अड्डे नष्ट न झाल्यामुळे ज्या विभागात ज्या जातीचे प्राबल्य आहे, त्या जातीपैकी एकाला उमेदवारी द्यावी लागते. कारण निवडून येणाऱ्या अनेक निकषांपैकी तो एक महत्त्वाचा निकष असतो. १९५२ च्या प्रथम सार्वत्रिक निवडणुकीपासून हेच चालले आहे. देशाला स्वातंत्र्य मिळाले. जातीविहीन लोकशाही मिळाली अन् तरीही अश्मयुगातील जातीयता आम्ही कुरवाळत बसलो आहोत. पं. नेहरू लोकशाहीवादी होते; परंतु ते लोकशाहीपेक्षा सत्तेला महत्त्व देत होते. त्यामुळे एखाद्या मौलाना अबुल कलाम आझाद यांना बहुसंख्यांक हिंदू मतदारसंघात उमेदवारी देण्याचे धाडस करू शकले नाहीत. हिंदू उमेदवारांच्या बाबतीतही तेच घडले. थोडक्यात, आम्हीच लोकशाहीचा गळा घोटू लागलो. ●●●




**नोटाबंदीमुळे कितीतरी दिवस लोकांना पैशासाठी एटीएमसमोर रांगेत तिष्ठत रहावे लागले. नोटाबंदीचा फटका लाखो लहान उद्योगांनाही बसला.**

# देशाच्या हितासाठी भाजपाचा पराभव आवश्यक



कॉ.भालचंद्र कांगो

देशासाठी जनता का जनतेसाठी देश हा महत्वाचा प्रश्न आहे. त्यामुळेच २०१९ च्या निवडणुकांचे वेगळेच महत्त्व आहे. ब्रिटिश राजवटीत राज्य जरी ब्रिटिशांचे असले तरी त्यांच्या साह्याने ५७१ राजे, राजवाडे, जमिनदार व मोठा भांडवलदार वर्ग राज्य करीत होता. त्यामुळे भारतीय स्वातंत्र्यलढा हा कधीच फक्त ब्रिटिशांविरुद्धचा लढा नव्हता, तर तो सर्वसामान्य जनतेसाठी लोकशाहीचा, समतेचा, स्वातंत्र्यलढा होता. त्यामुळेच स्वातंत्र्यलढ्यातील ही मूल्ये म्हणजे स्वातंत्र्य, समता, धर्मनिरपेक्षता, लोकशाही विकासनिष्ठा इत्यादी भारतीय घटनेत समाविष्ट झाली आणि डॉ. आंबेडकर व नेहरू यांच्या एका नवीन मानवतावादी शांततापूर्ण अस्तित्वावर विश्वास ठेवणाऱ्या नवराष्ट्रनिर्मितीचा संकल्प सुरू झाला.

परत ही मूल्येच ज्यांना मान्य नव्हती व वचर्स्ववादी रचना ज्यांत सर्वसामान्यांचे जीवन, धर्म, उद्दिष्ट वरील वर्गाची सेवा करण्यातच ज्या वर्चस्ववादी गटाचे हित म्हणजेच देशांत समजावे या विचारातच समरस व्हावे असे वाटणाऱ्या आर. एस.एस. व तत्सम संघटनांनी स्वतःला स्वातंत्र्य लढ्यापासून दूर ठेवले. स्वातंत्र्यानंतरही वरील वर्गाचे हितसंबंध जपण्याचीच भूमिका घेतली.

जगभर जोपर्यंत समाजवादी, समतावादी लोककल्याणकारी विचार व व्यवहारांचा वरचष्मा होता, तोपर्यंत भारतातही संघ विचारांना थारा मिळाला नाही; परंतु नवीन आर्थिक धोरणाच्या उदयानंतर प्रामुख्याने वर्चस्ववादी गट समूहांचे महत्त्व वाढले व समतावादी विचार मागे पडले. याच काळात जमातवाद व जातीवादाचा आधार घेऊन धर्माच्या नावाने राजकारण करण्याचा डाव खेळला गेला व त्यातून या क्षेत्रात 'हिंदुत्वाचे' राजकारण सुरू झाले. त्याचा आधार हा प्रामुख्याने कॉर्पोरेट जगाचे व बड्या औद्योगिक घटकांचे हितसंबंध जोपासणे व दुसरीकडे अल्पसंख्याक, दलित, आदिवासी, श्रमिक, कष्टकरी समूहाच्या हिताविरोधी व्यवहार करणे व विचार पसरविणे हा कार्यक्रम सुरू झाला.

भारतात त्याला विरोध झाला; परंतु कॉंग्रेस पक्ष जो स्वातंत्र्यलढ्याचा व विचारांचा वाहक होता. तो विकासक्रमात कमकुवत झाला. निवडणुकांच्या संधीसाधू राजकारणाच्या खेळात

कमजोर झाला. दुसरीकडे, विकासाच्या अपेक्षा वाढलेला जनसमूह त्याच्यापासून दूर झाला. स्वातंत्र्यानंतर घेतलेल्या मिश्र आर्थिक; परंतु भांडवलशाही धोरणाने असमतोल विकास सर्व पातळ्यांवर दिसू लागला. त्याचा परिणाम होऊन अनेक स्थानिक, प्रादेशिक पक्ष जुन्या काँग्रेस पक्षाला तीव्र विरोधक म्हणून पुढे आले. या अस्थिर परिस्थितीचा फायदा संघ परिवाराने घेऊन आपली व्यूहरचना आखली व सत्तेपर्यंत मजल मारली. १९९९ ते २००४ या काळात भाजप सत्तेवर होता तरी त्यातील घटक पक्षांचा प्रभाव व महत्त्व जास्त होते. त्यामुळे घटनेत फार मोठे बदल करण्यात संघ परिवाराला यश मिळाले नाही; परंतु २०१४ सालानंतर परिस्थिती बदलली आहे. याचा पुरेपूर फायदा संघ परिवाराने आपले विचार व व्यवहार पसरविण्यासाठी घेणे सुरू केले. वाढत्या विषमतेने व बेकारीने ग्रामीण भागातील जनता नाराज होऊन आपल्या पुढे मोठे आव्हान उभे करण्याची भीती असलेल्या कॉर्पोरेट घराण्यांनी जाणीवपूर्वक भारतात व इतरत्रही समतेविरोधी असलेल्या व्यक्ती व संघटनांना भरीव मदत सुरू केली. नवीन प्रसारमाध्यमांच्या आधारे जनतेला भ्रमित करून भाजपा व संघ परिवाराला सत्तास्थानी आणण्यात मदत केली, आताही करीतच आहेत.

२०१९ च्या निवडणुका या पार्श्वभूमीवर होत आहेत. २०१४ ची मोदी सरकारची धोरणे या पार्श्वभूमीवर तपासता नोटाबंदीसारखा विनाशकारी निर्णय व घाईघाईने घेतलेला जीएसटीचा निर्णय हे दोन्हीही निर्णय कॉर्पोरेट जगाच्या हिताचे होते हे स्पष्ट झाले. सार्वजनिक क्षेत्रांचे खाजगीकरण मोठ्या प्रमाणावर करण्याचे वाजपेयी सरकारचे धोरण आक्रमक पद्धतीने मोदी सरकारने चालविले आहे. एल.आय.सी., ओ.एन.जी.सी. सारख्या संस्थांचा पैसा खाजगीकरणाची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी वापरला जात आहे. बँकांच्या नफ्यातील १६ टक्क्यांऐवजी २६ टक्के वाटा बुडीत खात्यांना मदत करण्यासाठी वापरून कॉर्पोरेट जगाला मदत केली जात आहे. त्यांनादेखील दिवाळखोरीचा कायदा आणून, बँकांना लुटणाऱ्यांना मोकळे सोडून निर्माण झालेली संपत्ती व मालमता अत्यंत अल्पदरात विकून टाकून बँकांचा त्रास वाढविण्यात येत आहे. मोठ्या उद्योगपतींना कर्जे सहज मिळावीत म्हणून बँकांचं विलिनीकरण करून अनेक शाखा बंद करण्यात येत आहेत.लेबरकार्ड आणण्याचे निमित्त करून राज्यांमार्फत कामगार कायद्यांत मालकधार्जिणे बदल करण्यात येत आहेत. फिक्सड टर्म कॉन्ट्रॅक्ससारख्या योजना आणून स्वस्तात श्रमिक पुरविण्याचे प्रयत्न केले जात आहेत. लोकांना फसविण्यासाठी १५ लाख रुपये खात्यात टाकण्याचे, काळा पैसा बाहेर आणण्याचे, दरवर्षी २ कोटी बेरोजगारांना नोकऱ्या देण्याचे फसवे आश्वासन देऊन भ्रमित करण्यात येत आहे. सत्य लोकांना कळू नये म्हणून बेरोजगारी मोजणाऱ्या, प्रगती मोजणाऱ्या संस्थांची आकडेवारी जाहीर केली जात नाही किंवा त्यावर प्रश्नचिन्ह उभे करून त्यांची विश्वासार्हता नष्ट करण्याचे प्रयत्न होत आहेत.

स्वातंत्र्यानंतर लोकशाही सक्षमीकरणासाठी आवश्यक असणाऱ्या सर्व संस्थांमध्ये हस्तक्षेप करून त्यांची विश्वासार्हता कमी केली जात आहे. त्यांच्या स्वातंत्र्यावर प्रहार केले जात



**देशाच्या हितापेक्षा एका कार्पोरेट कंपनीचे हित जपण्यासाठी मोदी सरकारने राफेल करार केला.**

आहेत. भारताच्या विषमतेवर, बेरोजगारीवर, आर्थिक अडचणींवर उपाय न करता २०२४ पर्यंत महासत्ता बनविण्याचे व त्यासाठी जनतेवर देशभक्ती व धर्मांधतेच्या भावानात्मक आवाहनांनी कामाला जुंपण्याचे राजकारण खेळले जात आहे.

१९४७ साली देश स्वतंत्र झाल्यापासून सर्वांनी देशाला व देशातील जनतेला सक्षम करण्याचे स्वप्नं पाहिले व भारताला सार्वभौम, स्वतंत्र व सक्षम जनता असलेले राष्ट्र व नाविन्याचे स्वप्नं पाहिले. जनतेसाठी देश हीच त्यामागची भावना होती. आता मात्र देश श्रीमंतांसाठी, उच्चवर्गीय व उच्चवर्णीयांसाठी हे वास्तव आहे. इतरांनी फक्त देश बलवान करण्यासाठी खाली मान घालून प्रश्न न विचारता काम करावे, असे सांगितले जात आहे. प्रश्न विचारणाऱ्यांना देशद्रोही ठरविले जात आहे. श्रमिकांची आणि कष्टकऱ्यांची बाजू घेणाऱ्यांना शहरी नक्षलवादी ठरवले जात आहे. ७० वर्षापासून राजकाणापासून लांब असलेल्या सैन्याला आता पुढे करून त्यांना राजकारणासाठी वापरले जात आहे. उघडपणे देशाची संपत्ती खाजगी नफ्यासाठी वापरली जात आहे. राफेल हे त्याचे उत्कृष्ट उदाहरण आहे. मागच्या महिन्यात देशातील ५ विमानतळं अंबानींच्या खाजगी कंपनीला देण्यात आली. निवडणुकीनंतर हेच धोरण राबवले जाणार आहे. जीओ कंपनीला मदत करून ज्या पद्धतीने बीएसएनएल आणि एमटीएनएलचे वाटोळे करण्यात आले, त्यातून हे सिद्ध होते. अशा वेळी भारतीय जनतेने जागरूक राहून भाजपचा पराभव करून देशाचे रक्षण केले पाहिजे. ●●●



# भाजप सरकार आले तर देशाचा सत्यानाशच!

चेतन शिंदे

**प्रश्न : देशात जे सामाजिक व आर्थिक बदल दिसत आहेत, त्या बदलानं शेतकऱ्यांचे हित झाले आहे का?**

**उत्तर :** शेतकऱ्यांचे हित काही नाही, सारे नुकसान झाले आहे. सरकारने जे शेवटचं बजेट सादर केलं ते बजेट म्हणजे थापेबाजी, जुमलाबाजी कशी करायची याचा उत्तम नमुना होतं. त्यांच्या बजेटमधील एकही गोष्ट खरी होणार नाही, इतके ते अवास्तव व दिशाभूल करणारे होते. त्यांनी शेतकऱ्यांना सांगितलं की, आम्ही वर्षाला ६,००० रू. देऊ. दिवसाला किती रुपये पडतात, हे आता तुम्हीच बघा. आज या सरकारने शेतकऱ्याला संपवले आहे, त्याला उद्ध्वस्त केले आहे. त्याला कर्जमाफी, योग्य हमीभाव, त्यांच्या मुलांना दर्जेदार शिक्षण, आरोग्याची काळजी वाहणाऱ्या सरकारची गरज आहे. आताचे भाजप सरकार यात नापास झाले आहे. याच सरकारच्या काळात शेतकरी आत्महत्या वाढल्या आहेत, बेरोजगारी वाढली आहे. वर्षाला २ कोटी नोकऱ्या देऊ म्हणणारे दोन हजार नोकऱ्याही निर्माण करू शकले नाहीत. अनेक कारखाने बंद झाले आहेत. नोटाबंदीने छोटे व्यापारी संपले आहेत. लोक आता हे सरकार उलथवून टाकतील.

**प्रश्न : सरकार तर म्हणते नोकऱ्या निर्माण झाल्या. नोटाबंदीने भ्रष्टाचार संपला?**

**उत्तर :** भाजप सत्तेवर आल्यापासून त्यांनी खोटेपणाचा कहर केलेला आहे. मोठ्या प्रमाणात आश्वासने दिली. तरूण मंडळींना सांगितलं की, आम्ही दरवर्षी दोन कोटी नोकऱ्या निर्माण करू. प्रत्यक्षामध्ये काहीच झालेलं नाही. यूपीए सरकारच्या काळामध्ये दरवर्षी १५ ते २० लाख नोकऱ्या तयार होत असत. मोदी सरकारने त्यांनी २ कोटी करू म्हणाले, पण प्रत्यक्षात काहीही केलेलं नाही. प्रत्यक्षात अनेक कारखाने बंद पडल्यामुळे मोठ्या प्रमाणामध्ये लोकांच्या नोकऱ्या गेलेल्या आहेत. कामगार वर्गाची स्थिती अतिशय वाईट झालेली आहे. त्यांनी आश्वासनांची पूर्तता केली नाही. त्यांच्याच सरकारमधील मंत्री नितीन गडकरी स्वतः असं म्हणालेले आहेत की, आम्ही आश्वासनं दिली म्हणजे ती आम्ही मानायची असतात. ती काय खऱ्या अर्थाने प्रत्यक्षात आणायची असतात? ती प्रत्यक्षात आणायची असती तर त्या अर्थाने आम्ही आश्वासने दिलीच नसती. याचा अर्थ ते केवळ मतांसाठी आश्वासने देत होते. शिक्षण, व्यापार तर त्यांनी संपवला आहे.

**प्रश्न : शिक्षण कसे संपवले?**

**उत्तर :** सबंध सेंट्रल युनिव्हर्सिटीमध्ये त्यांनी गोंधळ निर्माण केलेला आहे. जेएनयूचं या संबंधातलं उदाहरण आहे. अलिगड युनिव्हर्सिटीचही उदाहरण आहे. सगळ्या सेंट्रल युनिव्हर्सिटीमध्ये आरएसएसच्या विचाराची माणसं आणायची आणि त्या माध्यमातून शिक्षणामध्ये आरएसएसचा विचार आणायचा, असा प्रयत्न चाललेला आहे. आरएसएसच्या शाखेवर तीन गोष्टी

शिकवल्या जातात. एक तर लहान मुलांवर संस्कार करतात खोटं कसं बोलायचं याचे. मोदी त्याच संस्कारातून आलेले आहेत. आपण जे बोलतोय ते खोटं आहे, असं त्यांना वाटतच नाही. कारण शिकलेलेच तसे असतात. द्वेष कसा करायचा, खोटं कसं बोलायचं, आणि इतिहासाचं विकृतीकरण कसं करायचं. इतिहास सबंध खोटा कसा सांगायचा. उदाहरणार्थ, शिवाजी महाराजांचा महाराष्ट्रातला इतिहास कोण सांगणार, बाबा पुरंदरे आणि तो म्हणजे, शिवाजी महाराज मुसलमान द्वेष्टे होते असे सांगणार. त्यांनी मुसलमानांच्या कत्तली केल्या. मुसलमानांना त्यांनी कसा त्रास दिला, अशा सबंध इतिहासाची त्यांनी मांडणी केलेली आहे. इंग्रजी इतिहासकार जेम्सने जे लिहिलं त्याला यांनीच सांगितलेलं होतं की, शिवाजी महाराज यांच्या संबंधामध्ये अश्लाघ्य अशी जी गोष्ट आली, ती यांनीच सांगितली होती. यांच्या डोक्यामध्ये शिवाजी महाराजांबद्दल जराही आदर नसतो. ते सांगतात, शिवाजी महाराजांना तोहफा म्हणून कल्याणच्या सुभेदारांच्या सुनेला दरबारात आणलं होतं. त्यावेळी त्यांनी तिला सालंकृत करून परत पाठवली आणि ज्याने तिला आणली. त्याला त्यांनी चौरंग करून हाकलून लावलं म्हणजे मारून टाकलं. हे शिवाजी महाराजांचं खरं चारित्र्य आहे. पण सावरकरांनी असं लिहिलयं की, शिवाजीला तिला भोगायची नव्हती तर एखाद्या सरदाराला ती भोगायला द्यायची आणि ही विकृती आहे, सद्गुण विकृती असा शब्द वापरलाय. ही सद्गुण विकृती आहे म्हणजे हे सावरकर त्यांना फार महत्त्वाचे वाटतात. गोळवलकर त्यांना फार महत्त्वाचे वाटतात. त्या गोळवलकरांनी हे स्पष्ट लिहिलेलं आहे की, या देशातला मुसलमान आणि ख्रिश्चन हे या देशाचे नागरिक होऊ शकत नाहीत. कारण त्यांची प्रार्थनास्थळं बाहेर आहेत. ज्यांची प्रार्थनास्थळं इथे आहेत, ते आमचे नागरिक आहेत. बाकीचे आमचे नागरिक नाहीत. असे शिक्षण दिले जाते. इतिहास लिहिला जातो, जो चुकीचा आहे.

**प्रश्न : मोदी घटना बदलणार असा आरोप सरकार विरोधक करतात. मोदी मात्र घटनेमुळे प्रधानमंत्री झाल्याचे सांगतात?**

**उत्तर :** तुम्हाला सांगतो. त्यांचे दवे म्हणून जे मंत्री होते, आता ते वारले आहेत. होम मिनिस्ट्रीवर बोलत असताना त्या दवेंनी सुरूवात केली. तसा तो ज्युनिअर माणूस. त्यांच्याकडे मोठ्या चर्चेची सुरुवात करण्याचं काम दिलं गेलेलं होतं. कारण ते आरएसएसचे खास होते. त्यांनी राज्यसभेत भाषणाची सुरुवात अशी केली की, ''भारतीय संविधान, भारतीय संविधान याने क्या है, वो हमारी संविधान कैसे हो सकती है. ये संविधान ये हमारी संविधानही नही है. ये यूरोपसे कोई बुक लाया गया है, उसकी प्रस्तावना फाडी गयी, कव्हर पेज फाडा गया, उसपे नई प्रस्तावना लिखी गई, कव्हर पेज पे लिखा गया भारतीय संविधान.'' ये हमारी संविधान ही नही हो सकती. मी त्याला हरकत घेतली, तेव्हा त्या लोकांनी गोंधळ घातला. पण दवे खाली बघत होते. दवे काय बोलले याचे पेपरच मी लायब्ररीतून आणून सभापतींना दिले. लक्षात घ्या, आरएसएसने हळूहळू नाही फार मोठ्या वेगाने



हे राष्ट्र हिंदुराष्ट्र करण्याच्या दिशेने काम सुरू केले आहे. हे हिंदू राष्ट्र म्हणजे काय, तर या वरिष्ठ जातीचं राष्ट्र ! त्या राष्ट्रात बहुजन समाजाला शिक्षण मिळू नये. त्यांना शिक्षण देण्याची गरज नाही, असे धोरण असेल. सरकारने स्किल इंडिया काढले. त्या स्किल इंडियामध्ये बहुजन समाजाला मजूर व्हा, असे शिकवतात आणि उच्च जातीचे उच्च शिक्षण घेतील. ही त्यांची भूमिका आहे. भाजपचे सरकार परत सत्तेवर आले तर मी तुम्हाला सांगतो, या देशाचा ते नाश करतील. त्यांनी इथली अर्थव्यवस्था संपवलेली आहे. आरबीआयचं महत्त्व त्यांनी कमी केलं. नियोजन आयोग संपवून टाकला. विद्यापीठ अनुदान आयोग त्यांनी संपवलेलं आहे. सीबीआयचा वापर ज्या पद्धतीने ते करतात, ते चुकीचं आहे. दुसऱ्या बाजूला नागरिकांच्या प्रश्नांच्या संबंधांमध्ये त्यांनी जे बिल आणलेलं आहे, त्याच्यात दुसरं तिसरं काही नाही तर मुस्लिमांना या देशाचे नागरिकच ठरवायचं नाही, यासाठी ते बिल आहे आणि ते भयानक आहे. हे बिल म्हणजे हिंदू आणि मुसलमानांचा प्रश्न नाही, तर या देशाच्या ऐक्याचा, प्रगतीचा, देशाच्या विकासाचा प्रश्न आहे. या देशामध्ये सगळ्यांना घेऊन जाण्याचा प्रश्न आहे. देश एक ठेवण्याचा प्रश्न आहे. पाकिस्तान ज्या पद्धतीनं चाललेलं आहे, तसं हिंदू पाकिस्तान इथे निर्माण करण्याचे त्यांचे प्रयत्न आहेत.

**प्रश्न : नोटाबंदीवर तुम्ही काय सांगाल?**

**उत्तर :** नोटाबंदीची काय गरज होती? नोटाबंदी कशासाठी आणली त्यांनी, नोटाबंदी यासाठीच आणली. नोटबंदीच्या अगोदर कुठे पैसा गेला, काय गेला आणि सगळेच्या सगळे पैसे आले ना. मग तो काळा पैसा कुठे आला. याचा अर्थ त्यांच्याकडचे होते

काळे पैसे ते त्यांनी पांढरे केले. त्यांच्याच गाड्या इकडे तिकडे फिरत होत्या आणि त्या अशा ज्या नोटा होत्या त्या जमा करून ते एक लाख जर जमा झाले तर त्याला ७५,००० ते देत होते. अशा रितीने पैसा मोठ्या प्रमाणात जमा झालेला आहे आणि तोच पैसा आज राजकारणामध्ये मोठ्या प्रमाणात वापरतात. म्हणजे या देशाचं भवितव्य त्यांनी काळकुट्ट करून टाकलेलं आहे. त्यांना ताबडतोब घालवणं अतिशय आवश्यक आहे. ते जर पुन्हा सत्तेत आले, तर या देशाचा चक्काचूर करून टाकतील.

**प्रश्न : पंतप्रधान सातत्याने असा आरोप करतात की, गेल्या सत्तर वर्षात काँग्रेसने या देशात काहीच केलं नाही? परंतु काँग्रेसमधून कोणीही ठामपणे असं बोलताना दिसत नाही की, मोदींचे आरोप खरे आहेत का?**

**उत्तर** : असं नाही, आम्ही बोलतो. अशोक चव्हाण तर रोज बोलतात. मी तुम्हाला माझंच उदाहरण देतो. मी अतिशय गरिबीतून आलेलो आहे. माझे वडील छोटेसे व्यापारी होते. मी सहावीला गेलो आणि तो व्यापार बंद पडला. नंतर शिक्षण कसं होणार, हा मोठा प्रश्न माझ्यासमोर उभा होता. मी आठवीला गेलो तेव्हा यशवंतराव चव्हाण मुख्यमंत्री होते. त्यांनी ९०० रुपये वार्षिक उत्पन्न असलेल्या कुटुंबातील मुलांना शिक्षण मोफत देणारं धोरण आणलं. त्याच्यामध्ये मी शिकलो. नंतर माझं कॉलेजचं शिक्षण मी नोकरी करून केलं. मला एसएससीपर्यंत यशवंतराव चव्हाणांनी शिकवलं, असं मी नेहमी म्हणतो. चव्हाण साहेबांमुळे गावागावात शाळा झाल्या. तुम्हाला सांगतो, माझं छोटं गाव आहे, तिथे दोन मोठ्या शाळा आहेत. एक इंग्लिश माध्यमाची आणि एक मराठी माध्यमाची आहे. त्यामुळे माझ्या बहिणी शिकल्या. माझ्या आधीच्या बहिणी शिकल्या नाहीत. हे लक्षात घ्या. कारण साडेचार किलोमीटरपर्यंत बिनाचप्पल आम्हाला चालत जावं लागयचं. ते शक्य नव्हतं. तर हा बदल कोणी केला. काँग्रेसने केला. आज आपलं ॲग्रिकल्चर प्रॉडक्शन या देशातल्या सगळ्यांना पोट भरून घास घेता येईल, असं आहे. सगळ्या जनतेला तुम्ही अन्न ठेऊन काही एक्स्पोर्टही करू शकता, इतके आहे. हे त्यांच्या काळात झालं का? इंदिराजींनी हरितक्रांती आणली. पंडित जवाहरलाल नेहरूंनी त्या वेळेला पाच आयआयटीज् आणल्या, आयएमएस आणले. हे कसं आलं? ते सहजतेनं आलं? लक्षात घ्या, रशियन लोकांनी इथे जी काही टेक्नॉलॉजी दिली, जे शिक्षण दिलं, ते उदारमताने दिलं. अमेरिका तुम्हाला टेक्नॉलॉजी देत नसे. तुम्हाला कारखाना देईल, पण टेक्नॉलॉजी देत नसे. ती रशियाने दिली. म्हणून आज आपण चंद्रावरही जाण्याची स्वप्नं बघतो. ते कशामुळे? सबंध वैज्ञानिक क्षेत्रात विकास कोणी केला, तो काय या साडेचार वर्षामध्ये यांनी केला? मोठ्या प्रमाणात लोकांना शिकवलं. अभियांत्रिकीत जगामध्ये तीन नंबरवर आपण आहोत. वैद्यकीय क्षेत्र तीन नंबरला आहे. हे सगळं कुणी केलं? हे काँग्रेसने केलेलं आहे. मोठ्या प्रमाणात गावागावात रस्ते झाले, ते कसे झाले. जिथे गांव तिथे एसटी गेली. त्यामुळे गावागावातील लोक शहराकडे यायला लागले. ते जे पिकवत होते, ते आलं लोकांपर्यंत.



हे सगळं सहजतेने झालं का? मिलिटरीचे आधुनिकीकरण झाले. ते काँग्रेसनं केलं. अणुशक्ती मोठ्या प्रमाणात आणली, ती कुणी आणली. त्यांनी आणली का? नेहरूंच्या काळापासून आलेली आहे. या देशाला नवा देश बनवण्याचं कामच नेहरूंनी सुरू केलं!

**प्रश्न : मोदी म्हणतात, नया भारत बनाना है?**

**उत्तर** : नया भारत काय त्यांनी बनवला. नेहरूंनी नया भारत केला. साडेचार ते पाच वर्षे व्हायला आली, त्यांनी नवीन काय केलं. बरं ज्या स्किम काँग्रेसच्या होत्या, त्यांची त्यांनी केवळ अंमलबजावणी केली आणि तेच उद्घाटनाच्या फिता कापतात. त्यांचं नवीन काय आहे. त्यांनी नवीन काय केलेलं आहे. काही नाही केलेलं. उलट गरिबांची स्थिती अतिशय वाईट केली. महागाई वाढत गेली. गॅस लोकांना देतो, अशी त्यांची जाहिरात असते. गॅसचं एक सिलिंडर दिलं, त्यानंतर त्यात गॅस कसा भरायचा? त्यांनी काय विहिरीतून पाणी आणून त्याच्यात टाकायचं! लाकडे वगैरे जमा करून गरीब लोक स्वयंपाक करतात. म्हणजे ही सगळी फसवणूक. आरएसएसच्या शाखांवर शिकलेल्यांना, 'खोटं बोला, जम के बोला,' असं शिकवलं जातं. त्याच्या पलिकडे ते कुठेच गेलेले नाहीत. त्यांनी सांगावं ना, आम्ही हे केलं म्हणून. ते काही सांगत नाहीत. काँग्रेसच्या काळामध्ये दंगली झाल्या नाहीत, असं नाही. पण सरकारचा भाग होता का त्याच्यात? आता सरकारचाच भाग असतो. लिंचिंग वगैरे जे होतं, गरीब लोकांचं होतं. दुधाचा धंदा करणारे गाई घेऊन जात असतील तर तुम्ही तिची हत्या करता असं म्हणून त्यांना तुम्ही ठार मारता. हे काय आहे! महाराष्ट्र सरकार एक कायदा आणणार होतं, मात्र नंतर आणलं नाही. कायदा काय होता? तुमच्या घरामध्ये काय शिजतंय हे बघण्यासाठी पोलिस तुमच्या किचनपर्यंत जाऊ शकतात. हे किती भयानक होतं.



म्हणजे माझ्या घरी बकऱ्याचं मटण शिजत असेल तर पोलिस येणार आणि हे गोमांस आहे असं सांगणार आणि टेस्टसाठी ते लॅबमध्ये पाठवणार. म्हणजे तीन महिने उगाचच मला तुम्ही आत ठेवणार. हा लोकांना त्रास देण्याचा जो प्रकार आहे, तो गंभीर आहे. महात्मा फुले असं म्हणाले होते, 'महम्मद, मांग, ख्रिस्त, ब्राह्मणासी धरावे पोटाशी बंधुपरी'. आमचे केशवसूत ब्राह्मण नाही, हिंदूही नाही, ना मी एक पंथाचा; तेच पतित जे आखडती प्रदेश साकल्याचा. असं त्या केशवसुतांनी सांगितलं. ब्राह्मण होते केशवसूत. पण तिथून आमच्या कोकणातून चालत ते पुण्यामध्ये गेले आणि केवढी क्रांती त्यांनी केली? हे भाजपवाले सारे त्या विरोधात केले.

**प्रश्न : देशामध्ये मूलतत्त्ववाद अगदी मजबूत होत आहे आणि तो वेगवेगळ्या स्वरूपात दिसतो आहे. काय सांगाल याबद्दल?**

**उत्तर** : नुसता मूलतत्त्ववाद नाही तो चक्क कम्युनॅलिझम आहे. कम्युनॅलिझम आणि मूलतत्त्ववादामध्ये फरक आहे. उदाहरणार्थ, मी जर असं म्हणालो मी अल्लाहला मानतो. ते जे कुराण शरीफमध्ये काय म्हटलेले आहे त्याप्रमाणे मी वागणार. हा मूलतत्त्ववाद झाला. पण याचा अर्थ, मी जर हिंदूंचा द्वेष करत असेल तर तो मूलतत्त्ववाद नाही. तो कम्युनॅलिझम आहे. कम्युनॅलिझम म्हणजे दोन समाजांमध्ये टक्कर घडवणारा वाद आहे, जो अतिशय चुकीचा आहे. आपण महाराष्ट्रामध्ये महात्मा फुल्यांना मानणारे लोक आहोत. महात्मा फुल्यांनी सांगितलं ''महम्मद, मांग, ख्रिस्त, ब्राह्मणासी धरावे पोटाशी बंधुपरी' आणि आमचे केशवसूत जे कोकणातून आले. ते तर असे म्हणाले की, ब्राह्मण नाही, हिंदूही नाही, ना मी एक पंथाचा, तेच पतित जे आखडती प्रदेश साकल्याचा.'' हा केवढा मोठा विचार सांगितला गेलेला आहे. महात्मा फुल्यांच्या विचारांचा आदर्श घेऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकर निर्माण झाले. त्या विचारांचा परिणाम संपवण्याचं काम चाललेलं आहे सध्या. गांधींचासुद्धा खून या लोकांनी केला. का खून केला, तर गांधी हे उदारमतवादी. सगळ्यांना घेऊन जाणारा हा देश बनावा, ही त्यांची भूमिका लोकांना मान्य नव्हती. नुसतंच काय, किती कोटी याला दिले आणि पाकिस्तानला द्या म्हणून सांगितले ५६ कोटी. म्हणून त्यांचा खून झालेला नाही. गांधींचा खून करण्याचे प्रयत्न याआधीही झालेले होते आणि तो खून केल्यानंतरसुद्धा आता तुम्ही त्यांच्या पुतळ्यांनासुद्धा गोळ्या मारता. म्हणजे किती द्वेष शिकवलेला आहे, लक्षात घ्या. गांधी नेमके काय होते हे लोकांना सांगितलंच नाही. गांधींबद्दल अतिशय वाईट म्हणजे विकृत असा प्रचार केलेला आहे. गांधींचा खून झाल्यावर लोकांनी पेढे वाटले. म्हणजे ही संस्कृती जपायची का आपल्याला? गांधी, नेहरू, आंबेडकरांनी खूप मोठ्या क्रांत्या केल्या आहेत. सावरकरांनी नाही केली क्रांती. सावरकरांनी अनेकवेळा ब्रिटिशांना माफीपत्र लिहून दिले. नुसती माफीपत्र लिहून दिली नाहीत तर, आम्ही तुम्हाला कसे उपयोगी पडू आणि लोकांना आदेश दिला मिलिटरीत जा, त्यांच्याकडून शिका, अमकं करा, तमकं करा आणि हा सबंध विचार फॅसिस्ट विचार आहे. जर्मनीचा फॅसिस्ट विचार. तिथे तुम्ही हिटलरचं नाव घेतलं तरी ते लोकांना आवडत नाही आणि इथे हिटलरची हिटलरशाही मोठ्या प्रमाणात चाललेली आहे. हे मॉडेल आहे त्यांचं. हे मॉडेल आपल्याला मोडून काढणं अतिशय आवश्यक आहे.

**प्रश्न : काय मार्ग दिसतो तुम्हाला हे मॉडेल मोडून काढण्याचा?**

**उत्तर** : ते मॉडेल मोडायचं असेल तर, एक तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या घटनेप्रमाणेच देश चालला पाहिजे. ज्या वेळेला घटना लिहिली जात होती, तेव्हा त्यांचा फार विरोध होता त्या घटनेला. तुम्ही गोळवलकरांची पुस्तकं वाचा. काय लिहिलंय त्यांनी त्यात? सर्वांना समान अधिकार द्यायला त्यांची तयारी नव्हती. मुसलमान आणि ख्रिश्चनांना मतदानाचा आणि नागरिकत्त्वाचा अधिकारही द्यायला ते तयार नव्हते. तुम्हाला तसं राहायचं असेल तर रहा; परंतु तुम्हाला ते अधिकार मिळणार नाहीत, अशी भूमिका त्यांची होती. मुख्य म्हणजे सगळ्यांना मतदानाचा अधिकार द्यायला त्यांचा विरोध होता. त्यांचं स्पष्ट म्हणणं होतं की, जे इन्कम टॅक्स भरतात आणि शिकलेले आहेत, त्यांच्यापुरताच मतदानाचा अधिकार असावा. तेच राज्य चालवू शकतील, इतर नाही. या देशातल्या सर्वांना जो अधिकार मिळाला, तो डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिलेल्या राज्यघटनेमुळेच. ही राज्यघटना काँग्रेसने पूर्णपणे स्वीकारल्यामुळे आज हा देश बदललेला आहे. आजच्या सरकारमुळे देश परत पारतंत्र्यात जाईल. हे लोक देश एकत्र ठेऊ शकणार नाहीत. या देशात सामान्य लोक राज्य करू शकणार नाहीत. सामान्य माणसांचे राज्य ७० वर्षे चालले, ते काँग्रेसमुळेच. काँग्रेसनेच सगळ्यांना सोबत घेऊन जाण्याची भूमिका घेतली. त्यामुळेच आज हे चाललंय, हे लक्षात घ्या.

●●●

व्यक्तिविशेष

# नोटाबंदीस नकार देणारे अर्थतज्ज्ञ : रघुराम राजन



प्रकाश खंडेलोटे

भारतीय रिझर्व्ह बँकेचे माजी गव्हर्नर रघुराम गोविंद राजन सध्या अमेरिकेत शिकागो विद्यापीठात बूथ स्कूल ऑफ बिझनेसमध्ये अर्थशास्त्राचे प्रोफेसर म्हणून कार्यरत आहेत. राजन हे ४ सप्टेंबर २०१३ ते ४ सप्टेंबर २०१६ अशी तीन वर्षे या पदावर होते. गव्हर्नर पदाचा कार्यकाळ साधारणतः ३ वर्षांचा असतो. स्वातंत्र्यानंतर होऊन गेलेल्या २२ पैकी ११ गव्हर्नर्सना दुसऱ्या टर्मसाठी संधी दिली गेली. राजन यांना मात्र ती दिली गेली नाही. राजकारण्यांच्या ताटाखालचे मांजर बनून जगण्याची तयारी असलेल्या प्रत्येकालाच मानसन्मान, पैसा, पदे, मुदतवाढ पात्रता नसतानाही भेटत असतात; परंतु अर्थव्यवस्थेला गती देण्यात मोलाची भूमिका बजावलेल्या रघुराम राजन यांचा मात्र दुसऱ्या टर्मसाठी विचार केला गेला नाही. मुळात राजन यांना मोदी सरकारची काही धोरणं पटत नसल्याने त्यांचं ऐकून राहण्याची गरज त्यांना कधी वाटली नाही. उच्च मूल्यांच्या नोटांवर बंदी आणण्याची मोदी सरकारची योजना राजन यांच्या काळातच प्रत्यक्षात अंमलात आणली जाणार होती. यासंदर्भात केंद्र सरकारनं गव्हर्नर रघुराम राजन यांच्याशी चर्चाही केली. मात्र राजन यांनी नोटाबंदीच्या निर्णयाच्या संभाव्य परिणामांबद्दल सरकारला इशारा दिल्यामुळे राजन यांच्या इच्छेविरूद्ध निश्चलीकरणाचा निर्णय घेणे मोदी सरकारला जमले नाही. राजन यांना मुदतवाढ नाकारण्यामागे नोटाबंदीस त्यांची प्रतिकुलता हेही एक कारण सांगितले जाते. ज्यांच्या ठायी स्वाभिमान आहे, अशा कोणत्याही उच्चविद्याविभूषित माणसाला मनाविरूद्ध घडणाऱ्या गोष्टी कधीही मान्य नसतात. रघुराम राजन तर बी.टेक., एमबीए, पीएच.डी. अशा पदव्यांनी विभूषित असलेले जागतिक ख्यातीचे अर्थतज्ज्ञ. त्यामुळे हुजरेगिरी वगैरे गोष्टी त्यांच्यापासून किती तरी दूर आहेत. १९५३ मधील बॅचला देशात पहिल्या क्रमांकाने यूपीएससी उत्तीर्ण होऊन आयपीएस अधिकारी बनलेल्या आर. गोविंद राजन यांच्या चार मुलांपैकी राजन हे एक. वडील आयपीएस अधिकारी असल्याने घरात शिस्तीचे वातावरण होते. या वातावरणात वाढलेल्या रघुरामांना समाजातील बेशिस्त कधी पटली नाही. कुशाग्र बुद्धिमत्तेच्या रघुरामांनी दिल्लीच्या आयआयटीमधून इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंगची पदवी सुवर्णपदकासह प्राप्त केली. अहमदाबाद आयआयएममधून व्यवसाय प्रशासनाची पदव्युत्तर पदविकाही सुवर्णपदकासह मिळवल्यानंतर ते टाटा मॅनेजमेन्ट सर्व्हिसेसमध्ये व्यवस्थापन प्रशिक्षणार्थी म्हणून रूजू झाले. काही महिन्यानंतर ही संस्था सोडून ते मॅसॅच्यूसेट्स इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीच्या स्लोन स्कूल ऑफ मॅनेजमेंटमध्ये डॉक्टरेटसाठी रूजू झाले. 'एस्सेज ऑन बँकिंग' या विषयावरील पीएच.डी. १९९१ मध्ये त्यांनी मिळवली.

२००३ ते २००६ दरम्यान ते आंतरराष्ट्रीय नाणेनिधीवर मुख्य अर्थतज्ज्ञ आणि संशोधन संचालक होते. २००७ मध्ये वित्तीय क्षेत्र सुधारणांविषयक समितीचे अध्यक्ष असताना त्यांनी संपूर्ण वित्तीय क्षेत्राच्या व्यापक सुधारणांची शिफारस केली होती. मोठ्या आणि नेहमीच राजकीयदृष्ट्या वादग्रस्त ठरणाऱ्या उपाययोजनांवर भर देण्यापेक्षा भारताने त्याच दिशेने शेकडो छोट्या उपाययोजना हाती घेतल्याच पाहिजेत असे त्यांनी सुधारणांविषयीच्या अहवालात सुचवले होते. आरबीआय गव्हर्नरपदाच्या कार्यकाळात २०१५ मध्ये ते बँक ऑफ इंटरनॅशनल सेटलमेंट्सचे व्हाईस चेअरमन बनले. आयएमएफमध्ये असताना एकात्मिक वित्तीय क्षेत्र विश्लेषणासाठी पार्श्वभूमी मजबूत करण्याचं काम राजन यांनी केलं. एकूण मागणीत वाढ आणि चलनवाढीत घट करण्यासाठी काही प्रमुख अर्थव्यवस्थांना सहकार्य करणाऱ्या पथकाचं नेतृत्त्वही त्यांनी केलं. आरबीआयचे गव्हर्नर म्हणून त्यांनी जी कामगिरी केली त्यामध्ये चलनवाढीला आळा घालणे, हे त्यांचे सर्वात मोठे यश मानले जाते. नव्वदच्या दशकापासून सप्टेंबर २०१३ मध्ये ९.८ टक्के एवढ्या नीचांकी पातळीवर असलेली किरकोळ चलनवाढ जुलै २०१५ मध्ये त्यांनी ३.७८ टक्क्यांवर आणली होती. आज पुरेशा प्रमाणात रोजगारनिर्मिती होत नसताना, देशाच्या अर्थव्यवस्थेने ७

टक्के दरानेही विकास साधणे शंकास्पद असल्याचे रधुराम राजन यांना वाटते. तृणमूल काँग्रेस, सपा-बसपा, तेलुगू देसमसारखे पक्ष मिळून महागठबंधनचे सरकार केंद्रात आले तर रघुराम राजन यांना अर्थमंत्री केले जाऊ शकते, अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे. या पार्श्वभूमीवर संधी मिळाल्यास नव्या जबाबदारीसाठी आपण तयार असल्याचे राजन सांगतात. काँग्रेसने आपल्या निवडणूक जाहीरनाम्यात समाविष्ट केलेल्या किमान उत्पन्न योजनेचा (न्याय) आराखडा बनविण्यात राजन यांचाही सहभाग होता. नव्हे, त्यांनीच तो सुचविल्याचे राजन सांगतात. या योजनेत गरीब कुटुंबाला वर्षाला ७२,०००/- रुपये मिळणार आहेत. या योजनेतून अनेक कल्याणकारी योजनांचे एकत्रिकरण घडून येईल. मिळालेल्या पैशातून गरिबांना ते आजवर वंचित होते त्या सेवा व वस्तू मिळवता येतील. हे एकप्रकारे त्यांचे सबलीकरणच असल्याचे राजन यांना वाटते.

**विपुल लिखाण :** अर्थव्यवस्थेतील स्थित्यंतरे आणि आव्हाने या विषयांवर त्यांनी काही पुस्तके लिहिली. राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय दर्जाच्या पत्रिकांमधून लेखही प्रसिद्ध झाले. २००४ मध्ये त्यांचा 'सेव्हिंग कॅपिटॅलिझम फ्रॉम द कॅपिटॅलिस्ट' हा ग्रंथ प्रसिद्ध झाला. शिकागो विद्यापीठातील बूथ स्कूल ऑफ बिझनेसमधील त्यांचे सहकारी प्रोफेसर लुईगी झिंगेल्स हे या ग्रंथाचे सहलेखक आहेत. संपत्तीची निर्मिती करणे आणि संधींचा विस्तार करण्याच्या दृष्टीने वित्तीय बाजारपेठांच्या अधिकारमुक्तीसाठी हा ग्रंथ त्यांनी लिहिला. अर्थकारणाला हादरा देणाऱ्या बाबींकडे जगाचे लक्ष वेधण्यासाठी रघुराम राजन यांनी 'फॉल्ट लाईन्सः हाऊ हिडन फ्रॅक्चर्स स्टिल थ्रेटन इकॉनॉमी' हा ग्रंथ लिहिला. २०१० साली हा ग्रंथ बाजारात आला. फायनान्शियल टाईम्स आणि गोल्डमन सॅक्स बिझनेस बुक यांच्यातर्फे दिला जाणारा २०१० चा इअर ॲवार्ड या पुस्तकाने पटकावला.

आरबीआयच्या गव्हर्नरपदी असताना त्यांनी वेगवेगळ्या कार्यक्रमांमध्ये दिलेल्या भाषणांचे संकलनरूपी पुस्तक 'आय डू व्हॉट आय डू' २०१७ मध्ये प्रकाशित झाले. हार्पर कोलिन्स यांनी हे पुस्तक संपादित केलं आहे. 'द ट्रू लेसन्स ऑफ द रिसेशन : द वेस्ट कान्ट बॉरो ॲन्ड स्पेन्ड इट्स वे टू रिकव्हरी' हा त्यांचा ग्रंथ मे/जून २०१२ मध्ये बाराजात आला. ' द थर्ड पिलर : हाऊ द स्टेट ॲन्ड मार्केट्स आर लिव्हिंग कम्युनिटीज बिहाइंड' या ग्रंथाचे मार्चच्या शेवटच्या आठवड्यात प्रकाशन झाले.

गव्हर्नरपदी असताना रघुराम राजन यांचे अनेक दर्जेदार लेख आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या पत्रिकांमध्ये प्रसिद्ध झाले. यामध्ये अमेरिकन इकॉनॉमिक रिव्ह्यू, इकॉनॉमिक पर्सपेक्टीव्हज, पॉलिटिकल इकॉनॉमी, फायनान्शियल इकॉनॉमिक्स आणि फायनान्स ॲन्ड ऑक्सफर्ड रिव्ह्यू ऑफ इकॉनॉमिक पॉलिसी या पत्रिकांचा प्रामुख्याने समावेश आहे.

**रघुराम राजन यांना मिळालेले पुरस्कार :** आपल्या अलौकिक बुद्धिमत्तेच्या बळावर आर्थिक क्षेत्रात बजावलेल्या कामगिरीबद्दल रघुराम राजन यांना अनेक पुरस्कारांनी गौरवण्यात आले. वित्तीय व्यवस्थेचा सिद्धांत आणि प्रघात यासाठी दिलेल्या योगदानाबद्दल अमेरिकन फायनान्स असोसिएशनतर्फे ४० वर्षांखालील अर्थतज्ज्ञाला दिले जाणारे पहिले फिशर ब्लॅक प्राईझ २००३ मध्ये त्यांना प्रदान करण्यात आले. फेब्रुवारी २०१० मध्ये ७ व्या वार्षिक वैश्विक नेतृत्त्व पुरस्कार सोहळ्यात नॅसकॉमच्या वतीने त्यांना ग्लोबल इंडियनचे नामांकन मिळाले होते. 'फायनान्शियल टाईम्स ॲन्ड मॅकिन्से बिझनेस बुक ऑफ द इअर' हा पुरस्कार त्यांना २०१० मध्ये प्रदान करण्यात आला. वित्तीय विकास ते आर्थिक वृद्धीसाठीच्या योगदानाचं विश्लेषण कार्याबद्दल इन्फोसिस पुरस्कार नोव्हेंबर २०११ मध्ये मिळाला.

जगभरातील वित्तीय आणि स्थूल आर्थिक धोरण प्रभावित करणारे अद्वितीय असे संशोधन केल्याबद्दल वित्तीय अर्थशास्त्रातील पाचवे 'डॉच बँक पारितोषिक' २०१३ मध्ये राजन यांना प्रदान करण्यात आले. २०१४ मध्ये 'गव्हर्नर ऑफ द इअर ॲवार्ड २०१४' ने त्यांना सन्मानित करण्यात आले. सेंट्रल बँकिंग या लंडनस्थित वित्तविषयक पत्रिकेच्या वतीने हा सन्मान त्यांना प्राप्त झाला. आर्थिक विकासात दिलेल्या योगदानाबद्दल मार्च २०१९ मध्ये त्यांना २०१८ चा यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्कार प्रदान करण्यात आला.

**'निश्चलनीकरणासंदर्भात सरकारने माझ्याशी केवळ चर्चा केली होती' :** सप्टेंबर २०१७ मध्ये दिलेल्या एका मुलाखतीत राजन यांनी सांगितले होते की, मी रिझर्व्ह बँकेचा गव्हर्नर असताना भारत सरकारने निश्चलनीकरणाच्या मुद्यावर माझ्याशी चर्चा केली होती; परंतु तसा निर्णय घेण्यास मात्र सांगितले नव्हते.

मी नोटाबंदीच्या निर्णयाच्या विरोधात होतो आणि त्याच्या संभाव्य नकारात्मक परिणामांबद्दल सरकारला इशाराही दिला होता, असेही राजन यांनी त्यावेळच्या मुलाखतीत सांगितले होते. चलनी नोटांवर बंदी घालून आर्थिक यश मिळवलं, असं कुणीही म्हणू शकत नाही, असं ठोस प्रतिपादनही त्यांनी केलं होतं. ●●●

## वैयक्तिक जीवन


**आयआयएम अहमदाबादमध्ये एमबीए करीत असतांना ओळख झालेल्या राधिका पुरीशी त्यांचे लग्न झाले. त्यांना एक मुलगा/एक मुलगी आहे. पत्नी राधिका या शिकागो विद्यापीठात लॉ स्कूलमध्ये अध्यापनाचं कार्य करतात. त्याचबरोबर शिकागो विद्यापीठाच्या बूथ स्कूल ऑफ बिझनेसमध्येही त्या असोसिएट प्रोफेसर आहेत. शाकाहारी असलेल्या राजन यांना टेनिस आणि स्क्वॅश खेळणे आवडते. त्यांना रशियन लेखक टॉलस्टॉय, इंग्लिश साहित्यिक जे.आर.आर. टोकियन आणि भारतीय सनदी सेवेतील अधिकारी असलेले लेखक उपमन्यू चॅटर्जी यांचं साहित्य वाचायला आवडतं. दूरदर्शनवर १९८५ मध्ये प्रक्षेपित झालेल्या क्विझ टाईम्स कार्यक्रमात राजन हे जयंत सिन्हा या आपल्या सहकाऱ्यांसह झळकले होते.**

ग्रंथ परिचय

# श्रीपाल सबनीसांच्या तिसऱ्या भूमिकेचे साहित्यिक वादळ



मिलिंद कसबे, पुणे




'ब्राह्मणी सत्यशोधकाचे अब्राह्मणी सौंदर्यशास्त्र' हा डॉ. श्रीपाल सबनीस यांचा समीक्षाग्रंथ कॉम्रेड शरद पाटील यांच्या अब्राह्मणी साहित्याच्या सौंदर्यशास्त्रीय मांडणीचे खंडन करणारा आहे. पुण्याच्या दिलीपराज प्रकाशनाने २०१३ साली प्रकाशित केलेले हे समीक्षणात्मक पुस्तक मराठी साहित्यात फारसे चर्चेत नसले तरी डॉ. सबनीसांची ही वादळी मांडणी कॉ. शरद पाटील यांनी सूचित केलेल्या अब्राह्मणी विचारप्रवाहाला छेद देणारी आहे.

महाराष्ट्रात दलित,आदिवासी व ग्रामीण साहित्याची चर्चा जोरदार चालू असताना ऐंशीच्या दशकात कॉ.शरद पाटील यांनी पोथीनिस्ट मार्क्सवादाला विरोध केला. यातून त्यांनी मार्क्स-फुले-आंबेडकरवादाच्या समन्वयाची मांडणीही केली. १९७२ साली त्यांनी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचा राजीनामा दिला आणि त्याच सालात त्यांनी 'सत्यशोधक कम्युनिस्ट पक्ष' काढला. 'दासशुद्रांची गुलामगिरी'(दोन खंड,) 'अब्राम्हणी साहित्य व कलांचे सौंदर्यशास्र' तसेच 'मार्क्सवाद, फुले-आंबेडकरवाद' असे ग्रंथ लिहून त्यांनी आपली सैद्धांतिक भूमिका मांडली. याशिवाय सत्यशोधक मार्क्सवादी या आपल्या मुखपत्रात वेळोवेळी लेख लिहून महाराष्ट्रात एक नवा विचार रुजवला. या मांडणीत त्यांनी 'मार्क्सवादी अन्वेषणपद्धतीचा फुले-आंबेडकरवादाशी समन्वय झाला पाहिजे.' अशी अपेक्षा केली, याचे सूत्र त्यांनी १९८८ मध्ये लिहिलेल्या 'अब्राह्मणी साहित्य व कलांचे सौंदर्यशास्त्र' या पुस्तकात मांडले आहे. त्यांच्या मते वर्गीय सामंतशाहीच्या अंतासाठी मार्क्सवाद ज्याप्रमाणे कामगार व शेतकरी वर्गांच्या दोस्तीची व्यूहरचना सांगतो, त्याचप्रमाणे जातीय सामंतशाहीच्या अंतासाठी आंबेडकरवाद अतिशूद्र जाती, जमाती व शुद्र जाती( ओबीसी) यांच्या दोस्तीची व्यूहरचना सांगतो. समाज क्रांतीसाठी प्रबोधनाची क्रांती आंबेडकरांना अत्यावश्यक वाटत असल्याने प्रबोधक अतिशूद्र साहित्य व शूद्र साहित्य यांची दोस्ती असणे अत्यावश्यक आहे. पण ही व्यावहारिक दोस्ती वैचारिक पायावर आधारलेली असली तरच टिकाऊ होते. टिकाऊ साहित्यिक दोस्ती समान सौंदर्यशास्त्राच्या पायावरच होऊ शकते. पण असा पाया शरद पाटलांना दिसत नसल्याने त्यांनी मार्क्स, फुले-आंबेडकरांच्या समन्वयाचे तत्वज्ञान मांडून साहित्यात अब्राम्हणी सौंदर्यशास्त्र मांडले. शरद पाटील यांची ब्राह्मण जातीच्या विरोधी भूमिका होती असेही म्हटले जाते. ते आंबेडकर आणि मार्क्सची सांगड बुद्धाच्या तत्वज्ञानाशी जोडू पहात होते असेही दिसते. पुढे डॉ. रावसाहेब कसबे यांचे 'आंबेडकर आणि मार्क्स' हे पुस्तक १९८५ साली प्रकाशित झाले. रावसाहेबांच्या या पुस्तकाने कॉ. शरद पाटील यांच्या मांडणीला अधिक बळ दिले. रावसाहेब कसबे यांच्या या ग्रंथावर शरद पाटील यांनी फेब्रुवारी १९८६ च्या परामर्शमध्ये परीक्षण लिहून कसबे यांच्या या समन्वयवादी मांडणीचे समर्थन केले. दलित, आदिवासी, मुस्लिम आणि ब्राम्हणेतर स्पृश्य जाती यांची एकी होणे हे सामाजिक न्यायासाठी किती महत्वाचे आहे हाच या चर्चेचा गाभा होता.अलीकडे उद्धव कांबळे यांच्या २०१८ सालातल्या 'डॉ.आंबेडकर, दलित आणि मार्क्सवाद' या ग्रंथापर्यंत ही चर्चा पुढे गेलेली दिसते.दलित, कम्युनिस्ट, समाजवादी, मुस्लिम, आदिवासी, ओबीसी ,बहुजन आणि वंचित या साऱ्याच घटकांची सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय एकी होण्याच्या अनेक घटना पुढे येत असताना कॉ.शरद पाटील यांनी ग्रंथित केलेल्या मांडणीला जोरदार विरोध करण्याचे काम मे. पुं. रेगे (नवभारत,फेब्रु १०८०). सुधीर बेडेकर ( तात्पर्य ऑक्टो,१९८०),गौतम शिंदे ( नवभारत, जून १९८०)आणि डॉ. श्रीपाल सबनीस,(परामर्ष, व मुलूखमैदान,धुळे,१९८०) यांनी केले.पुढे डॉ. श्रीपाल सबनीस यांनी आपले प्रतिपादन करताना'ब्राह्मणी सत्यशोधक' हा ग्रंथ लिहिला व त्याच्या दुसऱ्या आवृत्तीत शरद पाटील यांच्या अब्राह्मणी साहित्यशास्राच्या

# सबनीसांची तिसरी समन्वयवादी भूमिका

या समीक्षा ग्रंथात डॉ सबनीस पुन:पुन्हा एकाच निष्कर्षावर येऊन साहित्य आणि समाजात 'ब्राह्मणी' आणि 'अब्राह्मणी' अशी थेट विभागणी न करता त्यांच्यातील समन्वयाच्या जागा कशा शोधता येतील याचा प्रयत्न करतात. या प्रयत्नातूनच त्यांची समन्वयवादी तिसरी भूमिका पुढे आलेली दिसते. त्यांच्या मते, अब्राह्मणांतील ब्राह्मण्य व ब्राह्मणांतील ब्राह्मण्य बाजूला काढून जातीशिवाय वर्गीय प्रश्नांकडे पाहिले पाहिजे. या समन्वयातून उभी राहिलेली तिसरी भूमिका समतेकडे जाऊ शकेल. त्यांच्या या तिसऱ्या भूमिकेचे स्वागत करायला हरकत नसले तरी त्यातून नेमके कुणाचे भले होणार आहे, याबद्दल मात्र ते फारसे बोलत नाहीत. भारत हा बहुसांस्कृतिक, बहुभाषी आणि बहू जात- धर्मांच्या सहअस्तित्वाने उभा राहिलेला देश आहे हे खरे आहे; परंतु या देशात नेहमीच वैदिकांचे प्रभुत्व राहिले आहे. त्यामुळे भारताचा सांस्कृतिक विकास हा नेहमी वैदिक परंपरेच्या आश्रयाचा इतिहास बनला आहे. मराठी साहित्याचा मुख्य प्रवाह,त्याचे साहित्यशास्त्र हे या परंपरेपासून सुटले नाही. विशेषतः ग्रामीण साहित्याने स्वीकारलेले सॉफ्ट हिंदुत्व डॉ.सबनीस यांना आवश्यक वाटत असावे.

ग्रामीण आणि आदिवासी स्पृश्य जातींनी वैदिक परंपरेशी द्रोह करून अस्पृश्य विद्रोही दलित जातींनी विकसित केलेल्या दलित साहित्याच्या प्रवाहाकडे आकर्षित होणे सांस्कृतिकदृष्ट्या हिताचे नाही असेही मराठी साहित्यातील अनेक लेखकांना वाटते. अशा अनेक लेखक व समाजसुधारकांचे दाखले देत या पुस्तकातील डॉ. सबनीस यांची ही मांडणी आकर्षक आणि स्फोटक वाटत असली तरी यातून भारताच्या उच्चवर्णीय वैदिक परंपरेचा वर्चस्ववादी सांस्कृतिक अजेंडा साकारणार आहे हेही सबनिसांनी लक्षात घ्यायला हवे. डॉ. सबनीस यांच्या प्रागतिक भूमिका, त्यांचे विचार आणि त्यांच्या चार्वाक, बुद्ध ते आंबेडकरांपर्यंतच्या महापुरुषांप्रती असणारा श्रद्धाभाव नक्कीच स्वागतार्ह आहे .त्यामुळे पुरोगामी चळवळीला आणि साहित्यप्रेमींना त्यांच्याबद्दल आदरभाव आहेच, पण त्यांच्या या समन्वयवादी तळमळीचे फलित काय असेल? हे काळच ठरवेल. सध्या तरी भारतीय समाज प्रचंड विभाजनावर उभा आहे, असे दिसते.भारतात सांस्कृतिक दहशतवाद नवनव्या रूपाने डोके वर काढतो आहे. असहिष्णुता वाढते आहे. अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा प्रश्न अधिक जटील बनला आहे. राजकीय सत्ता आणि धर्मसत्ता एक होत आहेत. जात, वर्ग -वर्चस्व नव्या रुपात पुढे येत आहे. दलितांवरील अन्याय वाढत आहेत. स्त्रियांवरील अत्याचार वाढत आहेत.

भारतातल्या दलित, आदिवासी, ओबीसी आणि ब्राह्मणेतर स्पृश्य जातींचे प्रश्न हे केवळ जातीय राहिले नसून ते वर्गीय बनले आहेत. दलितांमध्ये दारिद्र्याचे प्रमाण वाढत आहे.भेदभाव अधिक आक्रमक बनत आहे. दुसरीकडे, धर्मांची नखे मोठी होत आहेत. जागतिकीकरणात आर्थिक फायदा वरच्या जातींकडे आणि गरिबी मात्र खालच्या जातींकडे जाताना दिसते आहे. अशावेळी कॉ. शरद पाटील यांनी मांडलेली ब्राह्मणी-अब्राह्मणी वर्गांतर्गत प्रश्नांची उकल करणारी मांडणी महत्त्वाची ठरेल की डॉ. श्रीपाल सबनीस यांची समन्वयवादी तिसरी भूमिका महत्त्वाची ठरेल हे येणारा काळच ठरवेल; परंतु अलीकडे वैदिक आणि हिंदुत्ववादी शक्तींचे राजकारण, मराठा, ओबीसी व दलितांच्या आरक्षणासाठीची आंदोलने व बहुजन वंचितांची मुस्लिमांसह राजकीय एकी पाहता सध्या तरी भारतीय समाज समन्वयाच्या मूडमध्ये नाही असे दिसते.

मांडणीचे खंडन करणारे प्रतिपादन वाढवून २०१३ साली ' ब्राह्मणी सत्यशोधकाचे अब्राह्मणी सौंदर्यशास्त्र' या नावाने या ग्रंथाची दुसरी आवृत्ती प्रकाशित केली.कॉ.शरद पाटील आणि त्यांनी टोकदार केलेली मार्क्स-फुले-आंबेडकरवादाची चर्चा आजच्या घडीला पुन्हा व्हायला हवी, या मांडणीच्या स्वागतासह त्याच्या विरोधी मंडणीलाही समजून घेणे आवश्यक वाटले. म्हणून डॉ. श्रीपाल सबनीस यांनी केलेला हा प्रतिवाद वाचकांसमोर ठेवला आहे.या चर्चेतून कोणती बाजू घ्यावी हा प्रश्न वेगळा आहे,पण हा विचारसरणींचा तिढा समजून घेतल्याशिवाय आजच्या धर्मकेंद्रीत राजकीय व सांस्कृतिक वास्तवाला सामोरे जाण्याची संवैधानिक ताकद सर्वसामान्य माणसाला मिळणार नाही, हेही तितकेच महत्त्वाचे आहे. कॉ.शरद पाटील यांच्या तत्वनिष्ठ मांडणीवर महाराष्ट्रातील प्रागतिक विचारविश्व पोसले, गतिमान झाले तसेच डॉ. सबनीस यांच्या विवेचनातील सहमतीच्या तिसऱ्या भूमिकेचे आकर्षणही लोकांमध्ये आहे. म्हणून या दोन्ही विरोधाभासी बाजू वाचकांसमोर ठेवणे एवढाच हेतू या पुस्तकाविषयीच्या चर्चेमागे आहे.

**डॉ. सबनीस यांचा प्रतिवाद :** डॉ.श्रीपाल सबनीस हे मराठी साहित्यात त्यांच्या वादळी लेखनशैलीसाठी आणि तर्कनिष्ठ संभाषणासाठी परिचित आहेत.अ. भा. मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष झाल्यापासून ते अधिक चर्चाकेंद्र बनलेले दिसतात. 'ब्राह्मणी सत्यशोधकाचे अब्राह्मणी सौंदर्यशास्त्र' हे प्रा.डॉ. श्रीपाल सबनीस यांचे पुस्तक एका बाजूला जसे सनसनाटी आरोपांवर बेतलेले आहे तसेच ते दुसऱ्या बाजूला कॉ. शरद पाटील यांच्या ब्राह्मणी-अब्राह्मणी वादाचा प्रतिवाद करणारे आहे. या पुस्तकात डॉ. सबनीस यांनी कॉ. शरद पाटील यांच्या भूमिकेचे त्यांच्या क्षमतेनिशी खंडन केले आहे. याशिवाय शरद पाटील यांच्या विचारांवर उभ्या असलेल्या सत्यशोधक कम्युनिस्ट पक्षाच्या सैद्धांतिक अधिष्ठानावरही त्यांनी वैचारिक प्रहार केले आहेत.

'कॉ.शरद पाटील हे प्राच्यविद्यापंडित होते. त्यांच्या विद्वत्तेबद्दल

शंका नाही परंतु त्यांनी मांडलेला ब्राह्मण विरुद्ध ब्राह्मणेतर हा संघर्ष वर्ण -जात- स्त्रीदास्यविरोधीचा संघर्ष ठरू शकत नाही कारण ब्राह्मणेतरांची भूमिका ही ब्राह्मणविरोधी असली तरी ती वर्णव्यवस्थेच्या आणि जातिव्यवस्थेच्या विरोधी नव्हती, असे डॉ. श्रीपाल सबनीस यांनी म्हटले आहे. 'कॉ. शरद पाटलांचा व्यासंग विकृत नाही त्यांचा उपरोक्त सिद्धांत विकृत आहे म्हणून भारतीय इतिहासाचे विश्लेषण या एकमेव पायावर करणे चूक आहे व ही पद्धतही अयोग्य आहे' अशी डॉ.श्रीपाल सबनीस यांनी भूमिका मांडली आहे.

या ग्रंथात सबनीस यांनी याविषयीच्या प्रतिपादनात कॉ. शरद पाटील यांनी ब्राह्मणशाही म्हणजे जातीव्यवस्थाशाही आणि भांडवलशाही म्हणजे वर्गव्यवस्थाशाही असे जे समीकरण स्वीकारले आहे, त्याबद्दल आक्षेप नोंदविला आहे. सबनिसांच्या मते 'ब्राह्मण्यग्रस्तता' ही उच्च-नीच असा भेदभाव रुजवणारी पण परिवर्तनीय वास्तवता आहे. अर्थात, ती निंद्य व घातक आहे. ही ' ब्राह्मण्यग्रस्तता' जर मानवनिर्मित आहे तर ती नष्टप्राय आहे. 'ब्राह्मणी आणि अब्राह्मणी' या मांडणीमुळे ब्राह्मणी पंथ हाच ब्राह्मण्यग्रस्त असून ही ब्राह्मण्यग्रस्तता अपरिवर्तनीय असल्याचा गैरसमज रुजवला जात आहे, पण वस्तुस्थिती तशी नाहीच (पृ. ४२) असे सांगून सबनीस म्हणतात , ब्राह्मणी प्रवाहात अब्राह्मण असू शकतात ही वास्तवता मान्य केली तर कॉ शरद पाटील यांच्या मांडणीला व वादाला अर्थच उरत नाही डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विधानांचे दाखले देत सबनीस यांनी डॉ आंबेडकरांचा ब्राह्मणांना विरोध नव्हता तर ब्राह्मण्याला विरोध होता याची उदाहरणे दिली आहेत. दलितांमध्ये ब्राह्मणत्व नाही का? असा सवाल करत सबनीस यांनी ब्राह्मण्यग्रस्तता ही दलितच नव्हे तर अनेक ब्राह्मणेतर उच्चजातीत आहे हेही उदाहरणांसह स्पष्ट केले आहे. त्यामुळे ब्राह्मण-ब्राह्मणेतर असा वाद उभा करून नवा जाती संघर्ष उभा करू नये आणि या वादाच्या छायेत महापुरुषांची बेरीज- वजाबाकी करू नये असेही सबनीस यांनी म्हटले आहे.

जात आणि धर्माने प्रभावित झालेल्या समाजव्यवस्थेतील महापुरुषांच्या जन्माला जाती-धर्माचे संदर्भ चिकटलेले असले तरी त्यांच्या काही कृती युक्ती या जात-धर्मातीत असतात. या अर्थाने बुद्ध- फुले- आंबेडकर यांच्या परिवर्तनवादी योगदानाचा विचार करताना लोकहितवादी, न्या रानडे, आगरकर, पं. रमाबाई,महर्षी शिंदे, म. गांधी यांच्याही परिवर्तनवादी कर्तृत्वाचा विचार महत्त्वाचा आहे, म्हणून चिंतनाच्या क्षेत्रात ब्राह्मणी समाजसुधारक आणि अब्राह्मणी समाजसुधारक अशी असत्यनिष्ठ मांडणी धोकादायक असते (पृ. ४१) असे प्रतिपादन करून श्रीपाल सबनीस यांनी सध्या आधुनिक समाजसुधारकांना ब्राह्मणी ठरवून त्यांचे प्रामाणिक आणि परिवर्तनवादी कर्तृत्व वजाबाकीत लोटण्याचा अद्यम्य प्रकार क्रांतीवाद्यांच्या गोटात चालू आहे.या तथाकथित ब्राह्मणी समाजसुधारकांचा विटाळ पोसण्याचे काम शरद पाटलांसारखे अब्राह्मणी विद्वान करत आहेत म्हणून कॉम्.शरद पाटील यांची ही मांडणी पुरोगामी चळवळीच्या पायातली बेडी ठरेल एवढी भयानक आहे, असाही थेट आरोप सबनीस यांनी त्यांच्या या पुस्तकात केला आहे.आपले म्हणणे वाचकांसमोर ठेवताना सबनीस यांनी डॉ आंबेडकरांचे दाखले दिले आहेत. त्यांच्या मते डॉ आंबेडकरांनी ब्राह्मणी आणि अब्राह्मणी ही मोजपट्टी त्यांच्या लेखनात स्वीकारली नाही. त्यांच्या चिंतनात हा घोटाळा नव्हता त्यांना ब्राह्मण्यरहित ब्राह्मण जवळचा वाटत होता तर ब्राह्मण्यग्रस्त मराठा शत्रू वाटत होता, असेही मत सबनीस यांनी महाडच्या सत्याग्रहाचे दाखले देऊन नोंदविले आहे.डॉ. आंबेडकरांची ही भूमिका आणि त्यांची चिंतनशीलता ब्राह्मणी-अब्राह्मणी'या द्वेषमूलक मांडणीत अडकून पडत नाही. ब्राह्मण्यत्व हे फक्त ब्राह्मणातच असते, असे नव्हे तर ते प्रत्येक जातीत असते आणि ही ब्राम्हण्यग्रस्तता झुगारून देणारी माणसं प्रत्येक जातीत असू शकतात. तेव्हा कोणत्याही व्यक्तीमधील ब्राह्मण्यग्रस्त समर्थनीय ठरू शकत नाही, असे सांगून सबनीस यांनी अब्राह्मणी पंथातील मंडळी ब्राह्मण्यग्रस्त नाहीत किंवा नसतात असा दावा शरद पाटील करणार आहेत काय? असा प्रश्न उपस्थित केला आहे .अब्राह्मणातील ब्राह्मण्यग्रस्तता क्रांतिवादी ठरू शकत नाही.ब्राह्मणशाही म्हणजे जातीव्यवस्थाशाही नव्हे. अनेक ब्राह्मणेतर जातींनी जात-धर्म घट्ट करण्याचा अवलंब केला त्याचे काय करायचे. याशिवाय रानडे, आगरकर, महर्षी कर्वे, श्री. म. माटे, महात्मा गांधी यांनी काही प्रमाणात केलेल्या जात-व्यवस्था विरोधी कर्तृत्वाची समाज परिवर्तनाच्या इतिहासातील स्थानाची वजाबाकी करायची का, असे प्रश्न डॉक्टर सबनीस यांनी उपस्थित केले आहेत.

**अब्राह्मणी साहित्यशास्त्राला विरोध :** शरद पाटील यांच्या सिद्धांताचे खंडन करताना डॉ. सबनीस यांनी काही लक्षवेधी शेरे मारले आहेत. शरद पाटलांनी सूचित केल्याप्रमाणे शूद्र व अतिशूद्र हे दुभंगलेले अब्राह्मणी प्रवाह साहित्य व चळवळीत एकवटण्याचा काळ आला आहे,शरद पाटलांचे हे म्हणणे सबनीस मान्य करत नाहीत. ते म्हणतात, ओबीसींचे साहित्य आणि दलितांचे साहित्य हे दोन्ही साहित्य प्रवाह हे अब्राह्मणी असल्याचे गृहीत धरून त्यांची एकजूट करण्यासाठी पाटलांना स्वतंत्र अब्राह्मणी सौंदर्यशास्त्र हवे आहे. पाटलांच्या हेतूबद्दल शंका घेण्याचे कारण नाही. कारण गरीब, उपेक्षित, मागास जातीवर्गाची एकजूट परिवर्तनाच्या प्रवाहात कोणताही पुरोगामी विद्वान समर्थनीयच मानतो. पण त्यासाठी 'अब्राह्मणी' व 'ब्राह्मणी' सारखी मूल्यात्मक भ्रष्टता पेरणारा सिद्धांत समाजात पेरणी कितपत संयुक्तिक? (पृ.१०४) कॉ.शरद पाटील यांचे म्हणणे हिंदू विरुद्ध वैदिक अशा पार्श्वभूमीवर तपासले आणि डॉ. सबनीस यांचे म्हणणे सध्याच्या ग्लोबल व राजकीय घरवापसीच्या पार्शवभूमीवर तपासले तर वाचकांना प्रत्येकाच्या म्हणण्यात काय दडले आहे, हे लक्षात येईल. ●●●

**'ब्राह्मणी' सत्यशोधकाचे 'अब्राह्मणी' सौंदर्यशास्त्र**
**डॉ. श्रीपाल सबनीस**
**दिलीपराज प्रकाशन, पुणे,**
**पृष्ठ: २०६,मूल्य : २२०**

आजकालचे प्रश्न
पंक्चरवाला

# मुलं पळवणाऱ्या टोळ्या

**राजकारणाचं** एक बरं असतं. ते ज्याच्यात मिसळतं त्याच्याच रंगाचं होऊन जातं. 'पानी रे पानी तेरा रंग कैसा, जिस में मिलावो लगे उस जैसा...' नेमकं याचप्रमाणं घडत असतं. मध्यंतरी देशात आणि महाराष्ट्रात मुलं पळवणाऱ्या टोळ्या कार्यरत झाल्या आहेत, अशा अफवा सुटल्या. खरं तर मुलं पळवून नेण्याच्या घटना अधूनमधून घडतच असतात. खंडणीपासून ते सूड घेण्यापर्यंत अनेक कारणं असतात त्यामागं. महाराष्ट्रात गेल्या वर्षीच्या एक जुलैला धुळे जिल्ह्यात राईनपाडा येथे अशीच अफवा फुटली. अफवेचं एक बरं असतं काहीही न करता ती फुटते आणि वाऱ्यासारखी पसरते. राईनपाडामध्ये असंच झालं. मुलं पळवणारी एक टोळी बाजारात आली आहे. तिच्या हालचाली संशयास्पद आहेत. चला चला पकडा तिला अशी अफवा पसरली. जमाव बाजारात गेला. संशयास्पद हालचाली असणाऱ्या पाच जणांना त्यानं पकडलं आणि जागीच ठेचून ठार केलं. नंतर कळलं की या पाच जणांनी एकदाही मुलांना पळवलं नव्हतं. भटक्या जातीतील हे लोक रोजगार शोधण्यासाठी आले होते. कुणीतरी त्यांना टोळी म्हटलं आणि बेधुंद जमावानं त्यांचा बळी घेतला. जेव्हा समाजच सामूहिकरीत्या एखादं कृत्य खोट्या समाजहितासाठी करतो तेव्हा या कृत्याला बेकायदेशीर ठरवणं कठीण जातं. समाजच गुन्हेगार होतो तेव्हा त्याला शिक्षा होण्याची शक्यताही कमी असते. 'गाव करील त्याला कोण काय करील' असा हा प्रकार असतो. नसलेल्या टोळ्या आणि त्यातही मुलं पळवणाऱ्या टोळ्या तेव्हा माध्यमांत खूप गाजल्या.

राईनपाडाच्या घटनेनंतर नऊएक महिन्यांनी लोकसभेच्या निवडणुका जाहीर झाल्या आणि एका नेत्याने कुठून तरी बांग दिली. 'पालकहो, राजकारणात मुलं पळवणाऱ्या टोळ्या आल्या आहेत'. दक्ष! संघ दक्ष!! वगैरे वगैरे. अर्थात, अशी बांग देण्यासाठी काही घडत होतं. भाजपनं वंडरबॉय गिरीश महाजन यांच्या नेतृत्वाखाली एक टोळी तयार केली होती. ही टोळी राधाकृष्ण विखे पाटील, मोहिते पाटील वगैरे गब्बर नेत्यांच्या मुलांसाठी गळ टाकून भाजपमध्ये नेण्याच्या तयारीत आहे, असं सांगितलं गेलं. भाजपनं बरेच गळ टाकले होते. त्यापैकी एका गळाला विखेंचा पोरगा लागला आणि खरंच राजकारणात मुलं पळवणारी टोळी सक्रिय झालीय यावर शिक्कामोर्तब झालं. भाजपच्या गळाला जो पहिला मासा लागला तो सर्वांत गब्बर. निवडून येण्यासाठी ग्राईप बिटको त्याला मोठ्या प्रमाणात मिळालं आहे. पहिला मासा गळाला लागला म्हणून गळवाले



**लोकसभा निवडणुकीचे तिकीट न मिळणाऱ्या मातब्बर राजकारण्यांची मुलं भाजपमध्ये आणण्याची जबाबदारी असलेले मंत्री गिरीश महाजन.**

सोलापूर-उस्मानाबादकडे सरकले. खरं तर हा दुष्काळी पट्टा. पाणी नसताना गळ कसा टाकायचा असा विचार राजकारणात केला जात नाही. उलट गळ कुठंही टाकला जातो. पूर्वी मराठवाड्यात असा गळ टाकून काँग्रेसनिष्ठ निलंगेकर पाटलांच्या मुलाला भाजपनं पळवलं आणि पुढं कमळात घालून रुजवलंही. असंच मोहिते पाटलांच्या पोराचं झालं. ए. टी. पवार यांच्या सुनेचंही असंच झालं. या सर्वांना खाऊ म्हणून लोकसभेची जागा द्यायचं ठरलंय. आता सांगलीत वसंतदादांच्या घरात असा गळ टाकला गेला.

राजकारणात गळ टाकण्याचा खेळ कोणत्याही ऋतूत चालतो. तलाव भरल्यावर आणि आटल्यावरही. आताही तसंच चालू आहे. आपलं बाळ गळाला लागलं की तलावातल्या पालक माशांना वाईट वाटतं; पण माणसांच्या जगात आणि त्यांच्या राजकारणात आनंद असतो. त्याचं कारण म्हणजे ग्राईप बिटकोवाले गुटगुटीत पोरं काही वेळेला स्वतःच गळाच्या शोधात म्हणजे मुलं पळवणाऱ्या टोळ्यांच्या शोधात जातात. गळाला गांडूळ चिकटवला नसला तरी मोठ्या धाडसानं गळ तोंडात घेतात. अशी अनेक लेकरं देशभर सांगता येतील. नव्या राजकारणाचा हा एक नवा सिद्धांत झालाय. इथं कुणाविरुद्ध कुणी फिर्याद करत नाही. पोलिस अदखलपात्र गुन्हाही नोंदवत नाहीत. 'सब का साथ, सब का विकास' असल्यानं काहीही करून मतं मिळवा हे महत्त्वाचं ठरतं. काहीही करून म्हणजे चौकीदार बनून, झाडू मारून, चहा विकून, पाया पडून, रडून आणि झालंच तर पोरं पळवून तरी मतं मिळवाच या खेळाला खूप महत्त्व असतं. शेवटी राजकारण असतं तरी काय? माणसांची आणि मतांची पळवापळवी तर असते राजा! या पळवापळवीच्या खेळात मासे स्वतःच गळाची वाट बघत असतात आणि त्यासाठी घरीच त्यांचं ॲप्रेन्टेशिप झालेलं असतं.

## घराणेशाहीच्या विळख्यात लोकशाही!

भारतीय राजकारणातल्या अनेक नेत्यांना गांडूळासारखी दोन तोंडं असतात. अष्टसुंडीप्रमाणं आठ सोंडं असतात. हे सारं दिव्यशक्तीसारखं त्यांना लाभलेलं असतं. गेली सत्तर वर्षे अनेक नेते सांगत आले, की लोकशाहीला घराणेशाहीपासून मुक्त करा. एक मौलिक सिद्धांत सांगून ते मतं आणि सत्ताही मिळवत आले. प्रत्यक्षात दुसऱ्या बाजूला घराणेशाहीला विरोध करणाऱ्यांचीच घराणेशाही तयार झाली. वर्षानुवर्षे ती चालू राहिली. लोकशाहीची साक्षरता नसलेले लोक घराणेशाहीलाच लोकशाही म्हणू लागले. बापानंतर मुलाला, पतीनंतर पत्नीला, बापानंतर मुलीला, आजोबानंतर नातवाला, सासऱ्यानंतर सुनेला निवडून देणे म्हणजे लोकशाही अशी नवी व्याख्या पुढाऱ्यांनी तयार केली. जुने सरदार, जुने संस्थानिक, जुने मांडलिक, जुने स्वयंघोषित राजे यांना निवडून देणं म्हणजे लोकशाही असं सांगण्यात आलं. ते बिंबवण्यात आलं. रोज गळा फाटेपर्यंत लोकशाहीवर बोलायचं, सामान्य माणसाच्या नावानं गळे काढायचे आणि लोकांना संमोहित करून डॉ. बाबासाहेबांनी त्यांना दिलेली लोकशाही आपल्या घराकडे वळवायची. हे करत असताना पुन्हा व्यक्तिगत स्वातंत्र्याचा आधार घ्यायचा. आपल्या नातेवाईकांनाही निवडून येण्याचा अधिकार आहे. जनताच त्यांना निवडून देते आम्ही काय करणार, नवी पिढी राजकारणात आली पाहिजे असं सांगत नव्या पिढीच्या नावानं चांगभलं म्हटलं जातं. पण नवी पिढी देशभर असते. आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्याच्या घरात, फुटपाथवर राहणाऱ्या मजुरांच्या घरात, नोकरीसाठी वणवण करणाऱ्यांच्या घरात, विशेष म्हणजे चौकीदाराच्या घरातही ती असते. ती का येत नाही राजकारणात किंवा तिच्या नावानं येळकोट का होत नाही? नवी पिढी यांना आपल्याच घरात कशी दिसते? तरुण फक्त यांच्याच घरात कसे जन्माला येतात? बाकीचा सारा उघडा-नागडा समाज वांझ वगैरे आहे की काय? यापैकी कशाचंही उत्तर घराणेशाहीवाले देत नाहीत. आपल्या पोटची पिढी राजकारणात येणं आणि सत्तेत बसणं यालाच हे तरुणशाही म्हणतात. विशेष म्हणजे, या पिढीला जागा देण्यासाठी हे स्वतः पदमुक्त होत नाहीत. शेजारी-शेजारी रेटून बसतात पण सत्ता आपल्या घराणेशाहीतच आणतात. रेटून बसण्याला ते लोकशाही म्हणतात. लोकशाहीवरचा विश्वास उडावा अशा गोष्टी आपल्या देशात लोकशाहीच्या नावानं घडतात किंवा घडवल्या जातात. लोकशाहीचा संकोच होतो. तिची मूळ वस्त्रे गळून पडतात आणि घराणेशाहीची वस्त्रे तिच्यावर चढवली जातात. पंक्चरवाल्यासह सारेच जण तिलाच लोकशाही म्हणू लागतात. एकाधिकारशाही, घराणेशाही, झुंडशाही या साऱ्याच्या कानपाडीत डॉ. बाबासाहेबांच्या लोकशाहीनं आवाज काढण्याचा प्रयत्न केला होता. डॉ. बाबासाहेबांच्या लोकशाहीत लोकांना मालक बनवलं होतं. त्यांच्याच सातबारावर ही मालकी कोरली



गेली आणि आता? छोटे साहेब, बडे साहेब, मोठे साहेब, राजेसाहेब, सरदारसाहेब, नातूसाहेब, कन्या मॅडम यांच्या नावानं जी कुंकू लावते किंवा कुंकू लावणं जिला भाग पाडलं जातं तिला लोकशाही म्हणतात. याला जबाबदार लोक आहेत. आपल्या रक्तातील गुलामी संपवून मालक जागे करायला ते तयार नाहीत. यातल्या काही जणांना घराणेशाहीनं लाभार्थी बनवलंय. दुसऱ्याच्या घराणेशाहीवर बोलायचं आणि स्वतःची घराणेशाही वाढवायची असा हा प्रकार आहे. लोकशाही जेव्हा अशा मगरमिठीत अडकते तेव्हा तिची घुसमट होते. तिला बीपी, डायबेटीस होतो. हे सारं अजून किती वर्षे चालवायचं? घराणेशाहीला रोखायचं की नाही आणि रोखायचं तर कुणी? एकटा बिचारा पंक्चरवाला काय करणार? 'साथी हाथ बढाना' एवढंच तो म्हणू शकतो. हात पुढं करायचा की नाही?

## अन्नाचा दुष्काळ तर पक्षांचा सुकाळ

आपल्या देशात कशाचा दुष्काळ आणि कशाचा सुकाळ असतो हे कोणी नीट पाहत नाही आणि समजून घेत नाही. त्यासाठी असलेलं नियोजन मंडळही कधी आकड्याच्या आणि संगणकावरील छोट्या पडद्यापलीकडं जात नाहीय. बऱ्याच वेळेला खूप मजेशीर गोष्टी घडतात. नोकऱ्यांचा दुष्काळ, अन्नाचा दुष्काळ असतो आणि त्याच वेळेला मल्टीनॅशनल्सचा सुकाळ असतो. लोकशाहीत लोकांसमोर अनेक गोष्टींची म्हणजे जगण्यासाठी लागणाऱ्या अनेक गोष्टींची वानवा असते आणि त्याच वेळेला घोषणांचा, राजकारणाचा, आरोप-प्रत्यारोपांचा सुकाळ असतो. आणि हे सारं घडवून आणणाऱ्या राजकीय पक्षांचा सुकाळ असतो. महापूर असतो. या साऱ्यांची फक्त नावं

वेगळी. रात्रीत उगवलेले नेते वेगळे आणि गोचडीप्रमाणे सत्तेला चिकटून बसलेले नेते वेगळे. पण साऱ्या पक्षांची प्रकृती, आशय आणि आकृती जवळपास सारखीच. रोज नवा पक्ष जन्माला घालणं, जुना सोडणं, अनैतिक समझोते करणे हा इथल्या राजकारणाला लागलेला कॅन्सरसारखा एक रोग आहे. तो रोज पसरतोय. सरकारच्या कोणत्याही वैद्यकीय सोयीसुविधांना ते जुमानत नाही. अगदी महात्मा फुले, संजीवनी वगैरे धोरणाला तो जुमानत नाही. रोग पसरतच राहतो, खालपासून वरपर्यंत.

जेव्हा देशाला स्वातंत्र्य मिळायचं होतं तेव्हापासून पक्ष आणि संघटनांचा जन्म होऊ लागला. सत्ता प्राप्त झाल्यावर पक्षांची संख्या वाढू लागली. पक्षवाढीचं समर्थन करण्यात येऊ लागलं. देशात चारेक हजार जाती, एवढे धर्म, एवढे पंथ आणि एवढी विषमता त्यामुळे पक्ष वाढणारच असं सांगण्यात येऊ लागलं. एका पक्षातून दुसरा, दुसऱ्यातून तिसरा आणि नवा अवतार धारण करणारे पक्ष जन्माला येऊ लागले. या साऱ्या पक्षांचे अजेंडे सारखेच. पक्षरचना सारखी. यांचे देणगीदार सारखे. यांना ऊब देणारी भांडवलशाही सारखीच. यांचे मतं पळवण्याचे मार्गही सारखेच. फक्त लेबल बदललं जातं. जुनी दारू नव्या बाटलीत यासारखं घडत राहतं. कोणत्याही पक्षाला तात्त्विक पाया नाही, जो आहे तो सत्ता कमवण्याचा, तिचे वाटे पाडण्याचा. कोणताही देश कसा आहे, त्याचा विकास कसा होणार, तेथील राजकीय संस्कृती कशी असणार हे पक्षांवरून समजतं. त्यांच्या संख्येवरून, गुणवत्तेवरून ठरतं. राजकारणात मोठ्यांची पोरं पळवण्यासाठी जशा टोळ्या असतात तसं सत्ता पळवण्यासाठी टोळ्यांप्रमाणे हे पक्ष काम करतात. पूर्वी अन्नाच्या शोधात टोळ्या फिरायच्या, आताच्या सत्तेच्या शोधात फिरत असतात.

गेल्या काही वर्षांत आपल्या देशात राजकीय पक्ष आणि एनजीओचे अमाप पीक वाढतं आहे. महापूरच सुरू आहे म्हणा की! एकट्या बीड जिल्ह्यात पाचशे एनजीओ आहेत. खरंच या समाजसेवेसाठी जन्माला आल्या असतील की अन्नाचा शोध घेण्यासाठी, हे आज ना उद्या कळणारच आहे. राजकीय पक्षांचं असंच आहे. आंबेडकरांचं नाव घेऊन आपली वेगवेगळ्या नावानं दुकानं थाटणाऱ्या पक्ष-संघटनांची संख्या एकट्या महाराष्ट्रात शंभरीच्या घरात गेलीय. प्रत्येक संघटना मोठ्या पक्षाच्या पंखाखाली राहून तुकडा मागते. अगदी आम्हाला एक तरी जागा देऊन आमची प्रतिष्ठा वाढवा, आम्हाला कॅबिनेट द्या सारा समाज तुमच्या दारात आणतो, असं निर्लज्जपणे सांगितलं जातं. लोक म्हणजे कुठंही हाकून नेण्याची मेंढरं आहेत. याप्रमाणं सांगितलं जातंय. रोज कुणी तरी नवा पक्ष काढतो. स्वतः अध्यक्ष, बायकोला सचिव आणि देखण्या मेहुणीला उपाध्यक्ष बनवलं जातं. सगळे राष्ट्रीय पक्ष हिंदू, मुस्लिम, दलित, भटके, आदिवासी, ओबीसी, नव्यानं शूद्र झालेले साऱ्यांमध्येच पक्ष स्थापन करण्याची एक स्पर्धा चालू आहे. अति झालं आणि हसू आलं, असं वाटण्यासारखं घडतं आहे.

आता देशात काय चाललंय पाहा. काल-परवापर्यंत भारतात २०१८ पक्ष होते. हा लेख आपल्या हातात पोहोचेपर्यंत कदाचित यांची संख्या पाच हजार झालेली असेल. राष्ट्रीय पक्ष, राज्य पातळीवरील पक्ष आणि मान्यता नसलेले पक्ष आहेत. मान्यता मिळवण्यासाठी विशिष्ट मतं मिळवावी लागतात. विशिष्ट जागा जिंकाव्या लागतात, अन्यथा मान्यता रद्द होते. अशी मान्यता नसलेले पक्ष मोठ्या प्रमाणात वाढतात आणि मोठ्या प्रमाणात विरून जातात. ते कधी जन्माला आले, कधी मेले कधीच कुणाला कळत नाही. त्यांच्या पाऊलखुणा कुणालाच दिसत नाही. निवडणूक काळात दोन-चार महिने ते गाजतात आणि संपतात. त्यांची नावंही मजेशीर. उदा. जय अधिकार पक्ष, भारतीय इंडियन पक्ष, मक्कळ निधी पक्ष, परम दिग्विजय पक्ष, हिंदू सेना, विश्वशक्ती पक्ष, राणी चेन्नमा पक्ष, महिला विकास पक्ष, ऑल इंडिया हिंदुस्थान, स्वराज्य इंडिया पक्ष वगैरे. पक्षीय राजकारणाला आपल्या राज्यघटनेनं मुक्त स्वातंत्र्य दिलं आहे. त्याचं कारण इथं विशिष्ट पक्षांची, समूहाची एकाधिकारशाही तयार होऊ नये म्हणून. पण आता भलतंच घडायला लागलं. पक्ष स्थापन करणं एक राजकीय व्यवसाय झाला आहे. ज्याला काहीच बांधता आलं नाही त्यानं पक्ष बांधावा. ज्याला चेहरा स्वच्छ करून घ्यायचा असतो, काळ्याचा गोरा करायचा असतो त्यानंही पक्ष बांधावा इतक्या सैल नजरेनं पाहिलं जात असंल तर पक्षीय अराजकतेकडेही जाऊ शकतो. पण सत्तेसाठी चांगभलं सुरू असल्याच्या काळात याचा विचार करायला कुणाला वेळ नाही. आपण अशा एका विचित्र राजकीय अवस्थेत पोहोचलो आहोत की केवळ हरण्यासाठी आणि हरणे हा आपला जन्मसिद्ध हक्क आहे असं सांगण्यासाठी काही पक्ष जन्माला येतात. जे हरून जेवढं मिळवतात तेवढं विजयी होणारेही मिळवत नसतील. काही पक्ष जाती जागवून त्यांचा दबावगट करण्यासाठी, काही भाषक भांडणे लावण्यासाठी, काही मूळ कोण आणि उपरा कोण हे सांगण्यासाठी तर काही निवडणुकीत कुणाला देणगी द्यावी लागू नये म्हणूनही जन्माला येतात. कोण पक्ष काढत नाही इथं? बहुतेक सर्व घटक आपले आपले झेंडे मिरवतात. दांडा एकाचा, झेंडा दुसऱ्याचा, रंग तिसऱ्याचा आणि ढंग चौथ्याचा. हे सारे विचित्र घटक एकत्र आले की आघाडी, महाआघाडी, राष्ट्रीय लोकशाही आघाडी समझोता झाले असं म्हणतात. आता तर शंभर-ऐंशी पक्षांची आघाडी-महाआघाडी आहे. एक दुसऱ्याला निर्लज्जपणे मिसळ म्हणतो. महाविघटन म्हणतो. ज्याचं नाक शेंबडानं भरलेलं तो दुसऱ्याचं नाक पुसण्यासाठी तडजोडीत रुमाल मिळवतो. आता यामुळे फायदा कुणाचा होणार? सत्तेचं व्यसन लागलेल्या किंवा लागू पाहणाऱ्यांचाच फायदा होणार हे काही बिचाऱ्या पंक्चरवाल्यानं सांगायला हवं? पंक्चर ट्यूबला परवडतं. लोकशाही मूल्यांना आणि त्यातही बाबासाहेबांच्या लोकशाहीला तर ते अजिबात परवडत नाही. विचारांचा अखंड प्रकाशझोत टाकून हा राजकीय पक्षांचा सुकाळ, महापूर कमी करायलाच हवा. ●●●

# शोधतो आमचे अस्तित्व

विसरलो आमची तत्त्व
हरवले आमचे स्वत्त्व
ह्याच्या त्याच्यात शोधतो आमचे अस्तित्व ।।१।।

कोणत्या प्रवाहात वाहतोय आम्ही
कोणती युक्ती अशी शोधली नामी
की नेहमी दुसऱ्यांच्याच येतो कामी
करतो आम्हीच आमची निलामी ।।२।।

अजूनी उभे आम्ही कोणच्यातरी वळचणीला
कोण किंमत देईना आमच्या हालचालीला
अगणित असूनही आम्ही नगण्य
माणसांत राहुनी आम्ही वन्य ।।३।।

बाबांच्या नावावर दुनया भरते झोळी
पण अजूनही जमेना आम्हास तसली खेळी
एकत्र आम्ही जयंतीच्या दिनी
केवढा मोठा जनसागर महापरिनिर्वाणदिनी ।।४।।


पण येता निवडणूक वाटते रूखधूक
राजकारणातली खलबते, पण कुठे जातात हो आपली मते
एवढी मोठी लोकशाहीची प्रक्रिया
किसने लिया और किसने दिया
आपणास मात्र फुटेज नाही आपण मात्र कुठेच नाही ।।५।।


**– प्रकाश मोरे**

# ग्रेट थॉट्स

मैत्री ही नेहमीच एक गोड जबाबदारी आहे. ती संधी कधीच नसते.


**– खलील जिब्रान**





मुर्खांचा आत्मविश्वास दांडगा असतो आणि बुद्धिमान लोक संशयात वावरत असतात, ही जगाची एक समस्या आहे.


**– बर्ट्रांड रसेल**



सर्वांवर प्रेम करा, काहींवर विश्वास ठेवा आणि कुणाशीही चुकीनं वागू नका. **– विल्यम शेक्सपिअर**



एका मेणबत्तीपासून हजारो मेणबत्त्या पेटवता येतात आणि त्यामुळे मेणबत्तीचं आयुष्य कमी असू शकत नाही. आनंद वाटल्याने कमी होत नाही. **– गौतम बुद्ध**





शक्य होईल तेवढा चांगला दृष्टिकोन, चांगलं मन बनवणं फार महत्वाचं असतं. यामुळं सुख तुमच्यासह इतरांनाही अल्पकाळ आणि दीर्घकाळासाठी मिळू शकतं.

**– दलाई लामा**

प्रामाणिक मतभेद ही नेहमीच प्रगतीची एक चांगली खूण असते.

**– महात्मा गांधी**





जी व्यक्ती ऊठसुठ आपल्या सद्वर्तनाबद्दल बोलते, ती फार कमी वेळा सद्वर्तनी असते.

**– जवाहरलाल नेहरू**



यशामागे असं काही गुपित नसतं. तयारी, कठोर मेहनत आणि अपयशापासून घेतलेला धडा याचं ते फलित असतं. **– कोलिन पॉवेल**

# कोण काय बोलतं...

### राहुल गांधी




कॉंग्रेस सत्तेत आल्यास पाच कोटी गरीब कुटुंबांच्या बँक खात्यात दरवर्षी ७२ हजार रुपये जमा करणार.

### सुब्रमण्यम स्वामी



मी ब्राम्हण आहे. ब्राम्हण कधीच चौकीदार असू शकत नाही. मी चौकीदाराकडून काम करवून घेतो. त्यामुळे स्वतः कधीही चौकीदार म्हणून घेणार नाही.

### शरद पवार



नोकरदारांसह शेतकरी आणि शेतमजूर वर्गाला संपविण्याचे महापातक मोदी सरकारने केले आहे.

### कन्हैयाकुमार



लोकांना पाकिस्तानात पाठविण्याची भाषा करणारे केंद्रीय मंत्री गिरीराजसिंह बेगुसराईमधून लढण्यास तयार नाहीत.


### ॲड.अस्लम मिर्झा

लेखक, अनुवादक



कोणत्याही भाषेला जात किंवा धर्म नसतो. भाषा शिकताना तिच्यावर प्रेम करा, ती तुमच्यावर प्रेम करते.

### देवेंद्र फडणवीस



राष्ट्रवादी कॉंग्रेसने केलेला भ्रष्टाचार ओकायला लावल्याशिवाय मी गप्प बसणार नाही.

### अभिनेत्री ऊर्मिला मातोंडकर

चित्रपट अभिनेत्री



निवडणूक लढविण्यासाठी मी कॉंग्रेसमध्ये आले नाही, तर पक्षाच्या विचारधारेमुळे आपण कॉंग्रेसकडे आकर्षित झालो.

### नागराज मंजुळे



पानतावणे सर म्हणजे, साहित्य क्षेत्रातील बाप माणूस. आंबेडकरी विचारांच्या चळवळीतील ध्येयवेडा माणूस म्हणजे पानतावणे सर.

### युवराज सिंग, भारतीय फलंदाज



ज्यावेळी माझे क्रिकेटवरील प्रेम कमी होईल त्यावेळी सर्वप्रथम निवृत्ती जाहीर करीन.

### इम्रान खान (पाकिस्तानचे पंतप्रधान)



भारतातील रालोआ सरकार पाकिस्तान विरोधात द्वेषाचे राजकारण करून लोकसभेच्या निवडणुका जिंकू पाहत आहे.

### निरंजन टकले (ज्येष्ठ शोधपत्रकार)



शेतकऱ्यांची स्थिती कोणत्याही सरकारच्या काळात बदलत नाही. कारण सरकार केवळ लक्षणांवर उपचार करते, आजारांवर नाही.

### कार्लोस ब्रेथवेट

(वेस्टइंडिजचा अष्टपैलू खेळाडू)



विश्वचषकात वेस्ट इंडिजला कमकुवत मानण्याची चूक कुणीही करू नये.

पाक्षिक

स्वातंत्र्य, समता आणि सामाजिक न्यायासाठी

# द पीपल्स पोस्ट

## वार्षिक वर्गणीदारांना

२०%

## सवलत!

देश आणि राज्यातील सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक, सांस्कृतिक घटनांचा वेध घेणारे निपक्षः निर्भीड पाक्षिक

---

हो, मी **"द पीपल्स पोस्ट"** चा वर्गणीदार बनू इच्छितो!

खाली आपल्या आवडीच्या ऑफरवर निषाण लावून वाचक-वर्गणीदाराचा फॉर्म भरून खालील पत्त्यावर पाठवावा :

कार्यालय : ११ तळमजला, बी ब्लॉक, लक्ष्मी निवास, जे.के. सावंत मार्ग, यशवंत नाट्य मंदीरा समोर, माहीम (वेस्ट), मुंबई- ४०००१६

| टिक करा | अवधि | एकूण अंक | कव्हर किंमत (रू.) | आपल्याला द्यावे लागतील (रू.) | |
|---|---|---|---|---|---|
| ☐ | १ वर्ष | २४ | ६०० | ५०० | |
| ☐ | ६ महिने | १२ | ३०० | ३०० | |
| ☐ | ३ महिने | ६ | १५० | १५० | |

(वार्षिक विशेषांक - ६) / (६ महिने-३)

चेक किंवा डीडी ने पेमेंट

मी 'द पीपल्स पोस्ट' च्या नावाने पाठवत आहे. ---------------------- दिनांक -------- (बँकेचे नाव) ----------------

चेक/डीडी क्र. --------------------.

किंवा माझ्या क्रेडीट कार्ड ने वसूल करा ☐ ☐ VISA ☐ AMERICAN EXPRESS कार्ड नं. ☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐

कार्डधारकाचे नाव : ☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐ कार्ड एक्सपायरी दिनांक : ---- महिना---- वर्ष-----

कार्डधारकाची स्वाक्षरी : -------------------------------- जन्म तारीख : ---------- दिवस----- महिना----- वर्ष-----

नाव : ---------------------------------------------------------पत्ता : ------------------------------

------------------------------------------------------------शहर : ------------------------------

राज्य : ------------------------ पिन कोड : ------------------ फोन नं. (घर) : ------------------------

मो. नं. : ----------------------इ-मेल : ------------------------------------------------

आपण या माध्यमांद्वारेही सबस्क्राईब करू शकता
२९ ऑगस्ट ते १२ सप्टेंबर २०१८

WhatsApp व्हॉट्स अप क्रं. ८८८८५४१८२२ किंवा ७३५००९१५६३ क्र. वर फोन करा:

इ-मेल करा thepeoplespost2014@gmail.com

www लॉग ऑन करा www.thepeoplespost.com

कृपया लक्ष द्या : ही ऑफर मर्यादीत कालावधीसाठी आहे. द पीपल्स पोस्ट यांच्याकडे ह्या ऑफरशी संबंधीत कुठल्याही नियम व अटींना कमी करणे किंवा वाढवण्याचे अधिकार आरक्षित आहेत.

■ POSTAL REGISTRATION NO. ABD/492/2019-21
■ RNI REG. NO. MAHMAR/2018/76460

